# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०३/२००६

आज दि. २०/०३/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १३ दि. ०८/०३/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती, महिला बालकल्याण |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| १०) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ११) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १२) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १३) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १४) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १५) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १६) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १७) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १८) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १९) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २०) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २१) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २२) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २३) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २४) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २६) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २७) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३१) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३२) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३३) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३४) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३५) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३६) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३७) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३८) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३९) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ४०) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ४१) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४२) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४३) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४४) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४५) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४६) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४७) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४८) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४९) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५०) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५१) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सदस्य |
| ५२) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ५३) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५५) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५६) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५७) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५८) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५९) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ६०) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ६१) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ६२) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६३) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६४) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६५) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६६) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६७) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६८) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६९) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७०) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ७१) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ७२) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ७३) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७४) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७५) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ७६) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७८) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७९) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |

वरीलप्रमाणे महासभेकरिता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार दि. २०/०३/२००६ ची ही मा. महासभा महानगरपालिकेच्या सभागृहात उपस्थित असलेले या शहराचे उपमहापौर चंद्रकांत वैतीजी, आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे साहेब, महिला व बालकल्याण समिती सभापती सौ. सुरेखा गायकवाड मॅडम, सभागृह नेता श्री. हॅरल बोर्जीसजी, मा. विरोधी पक्षनेते श्री. परशुराम पाटील साहेब, परिवहन सेवा समिती सभापती शांताराम ठाकुरजी व सर्व गटनेते, सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, महानगरपालिकेचे सचिव हरेश पाटील साहेब, सर्व सन्मा. उपायुक्त, संबंधित खात्याचे अधिकारी, सर्व वृत्तपत्राचे प्रतिनिधी व प्रेक्षक गॅलरीत असलेले नागरीक बंधु आणि भगीनींनो. मा. आयुक्त साहेब ह्यांनी स्थायी समितीसमोर सन २००५-०६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक सादर केले आणि त्या अंदाजपत्रकावर सखोल अभ्यास करून स्थायी समितीने आपल्यासमोर शहरातील अंदाजपत्रक सादर केले. आपल्यासमोर शहरातील नागरीकांना कोणत्याही प्रकारची करवाढ न लागता मुळ अंदाजपत्रक सादर केले आहे. या अर्थसंकल्पावर आपण सर्व सन्मा. सदस्यांनी सखोल चर्चा करून आवश्यक त्या शिफारशीसह ते मंजुर करु. मिरा भाईंदर शहराचा विकास करणे व नागरीकांना मुलभुत सोयीसुविधा पुरवणे. प्रशासन व जनता ह्यांच्यात समन्वय प्रस्तावित करणे. या सखोल जबाबदाऱ्या नागरीकांचे प्रतिनिधी म्हणून आपल्यावर आहे. शहरवासियांनी आपल्यावर दाखविलेला विश्वास सार्थक ठरविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. त्याकरिता अंदाजपत्रक मुलभुत पाया आहे. याव्दारे आपण संपुर्ण वर्षभरात नागरीकांना प्राधान्य देणे, आवश्यक असणाऱ्या कामांचा योग्यप्रकारे नियोजन केले. जसे सदर अर्थसंकल्पात विकास आराखडा, आरक्षण, अंमलबजावणी, महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकीय शिक्षण, शहराच्या भविष्याची वाढीव पाण्याची गरज पाहता मोर्वे धरण यासारख्या महत्वाच्या बाबी अर्थसंकल्पात तरतुद करुन एक प्रगत मिरा भाईंदरची प्रगती करुन याकरिता आपल्या सर्वांचे मोलाचे सहकार्य अपेक्षित आहे. सर्वांना आपले बहुमुल्य मार्गदर्शन करण्याची संधी देण्यांत येईल. आपण देखील अर्थसंकल्पाचा साधक बाधक विचार करुन एक आदर्श असा सन २००५-०६ चे सन २००६-०७ चे लोकभिमुख अर्थसंकल्प तयार करुया. आपण सुचविलेल्या प्रस्तावावर विचार करून त्याची दखल घेतली जाईल. परंतु, आपल्या जवळ असलेल्या जमा निधीमध्ये सर्व कामे होणार नाहीत तरी आवश्यक तातडीच्या प्रस्तावांना प्राधान्य देण्याचा आपण सर्व सहमतीने प्रयत्न करुया सर्व मिरा भाईंदर शहरवासियांना गुडीपाडव्याच्या निमित्त हार्दिक शुभेच्छा. आजची मा. महासभा अर्थसंकल्पावरिल विषयावर चर्चा करुन, निर्णय घेउ व सदरची मा. महासभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी सर्व सन्मा. सहकाऱ्यांकडून सहकार्याची अपेक्षा करते. धन्यवाद. सचिवजी सभेच्या कामकाजाला सुरूवात करावी.

(महापालिका सचिव ह्यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**एस्. ए. खान :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, तसेच मी विनंती ही करतो की, मी बोलत असताना मधे कोणीही बोलू नये. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरा रोड नावाची एक वस्ती आहे आणि त्या मिरा रोड विभागात पावणे दोन लाख लोकांची लोकसंख्या आहे. पण या डायरीमध्ये मिरा रोडच्या नावाचा कुठेही उल्लेख नाही. या कॅलेंडरमध्ये मिरा रोडचा फोटो दिलेला नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला स्थगन प्रस्ताव मांडायचा आहे. आम्ही प्रस्ताव मांडल्यानंतर तो फेटाळा किंवा काय करायचा ते करा पण पहिले आम्हाला बोलू द्या.

**हंसुकुमार पांन्डे :-**

आम्हाला पहिले बोलू द्या.

**चंद्रकांत मोदी :-**

मिरा रोड से लाखो रुपया टॅक्स वसुली किया जाता है।

**हंसुकुमार पांन्डे :-**

आमचा विषय झाल्यानंतर आपण बोला ना. आम्ही तुम्हाला कुठे नाही म्हणून बोललो आहोत. आम्हाला एकदा बोलू द्या. आम्ही बोलायला घेतले आहे तर आम्हाला बोलू द्या ना. आमचा विषय होउ द्या.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, मी अशी सुचना दिलेली आहे. पण ह्या कॅलेंडर आणि डायरीमध्ये नाव का नाही?

**चंद्रकांत मोदी :-**

मिरा रोड से लाखो रुपया टॅक्स वसुली किया जाता है और यह कॅलेंडर मे मिरा रोड का किधर नाम नही है।

**सुरेखा गायकवाड :-**

मिरा रोडचा कुठेही उल्लेख केलेला नाही. आपण असा भेदभाव का केला.

**चंद्रकांत मोदी :-**

कॅलेंडर मे मिरा रोड का कही भी नाम नही है।

**सुरेखा गायकवाड :-**

कोणत्या अधिकाऱ्याने ही डायरी आणि कॅलेंडर बनविलेले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

उस अधिकारी को मा. महासभा के सामने खडा किया जाए।

**एस. ए. खान :-**

कुठल्या अधिकाऱ्याने कॅलेंडर आणि डायरी छापलेली आहे त्यांचे नाव जाहिर करा.

**हंसुकुमार पान्डे :-**

मा. महापौर मॅडम, कमिशनर साहेब मी तुम्हाला एक प्रश्न विचारू इच्छितो की, हमारे मिरा रोड से सबसे ज्यादा हाउस टॅक्स आता है। लेकिन उसमे मिरा रोड करके क्यो नही लिखा गया मिरा क्यो लिखा गया? मिरा रोड एक स्टेशन है। जहाँ दो अढाई लाख लोक रहते है।

**एस. ए. खान :-**

मिरा रोडची एलर्जी का? मिरा रोड बद्दल एवढी जळण का? सर्वात जास्त टॅक्स मिरा रोडमधुन येत आहे. ह्याची जळण का? एलर्जी का? मिरा रोडचे नाव छापायला मिरा रोडची तस्वीर छापायला.

**सुरेखा गायकवाड :-**

साहेब, मिरा रोडमध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन ह्यांच्यासाठी मोठे स्मशान बांधले आहेत त्याचासुद्धा कोठे उल्लेख केलेला नाही.

**हंसुकुमार पान्डे :-**

उल्लेख किया है लेकिन उसमे ऐसा नही लिखा है की, मेन्टेन बाय मुझफ्फर हूसैनजी डेव्हलोपर्स ॲण्ड मेंन्टेन्ड बाय महानगरपालिका का नाम लिखा है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सत्ताधारी के राज मे सत्ताधारीयोकी नही सुनी जाती है। शेम शेम शेम

**चंद्रकांत मोदी :-**

अढाई करोड रुपया जो व्यक्तीने खर्च किया है उसका नामोनिशान भी नही है। साहब, सभी स्मशान का फोटो है। अपना मिरा रोड का फोटो है लेकिन सिर्फ मंदिर लिया है। मंदिर दिखता है लेकिन स्मशान नही दिखता है।

**हंसुकुमार पान्डे :-**

सिनरी भी कुछ दिखाई नही देती है। क्यो, आखिर इतना जलन क्यो? और इसमे जो भी है। कमिशनर साहब आपसे विनंती है की, जो भी इन्सान ने यह डायरी बनाई है। उसका नाम आप सभागृह के सामने बताईए। उस अधिकारी को सबके सामने खडा किया जाए। उसपे ॲक्शन लिया जाए और वापस से यह डायरी और कॅलेंडर छापा जाए। मुझफ्फर हुसैन साहब यह मिरा रोडके पहिले आमदार है। प्रथम आमदार है। उनका फोटो छापने के लिए भी बिनती करनी पडती है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सत्ताधारी के राज मे सत्ताधारीयोकी सुनवाई नही होती है। शेम, शेम, शेम.

**हंसुकुमार पान्डे :-**

यह किसकी कालाकांडी है, यह आपको सामने लाना पडेगा।

**सुरेखा गायकवाड :-**

उपमहापौर साहेब, आपण कोण अधिकारी आहेत त्यांना सभेसमोर आणावे आणि त्यांना विचारावे की, आपण असा भेदभाव का केला?

**चंद्रकांत मोदी :-**

कमिशनर साहब को विनंती करता हुँ की, संबंधित अधिकारी को सजा दी जाए।

**रिटा शहा :-**

मा. उपमहापौर साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिकातर्फे आपण डायरी बनवली आहे. ज्याने केले ते आपले सर्व ऑफीसर. हे आपण स्थानिक स्थानिक करुन नगरसेवक म्हणुन आपण त्यांच्यासाठी झटतो. ही डायरी मेन्टेन स्थानिक कर्मचाऱ्याने बनवली आहे. त्याच्यावर स्थानिक ऑफीसरच होता आणि आपल्या मिरा भाईंदर शहराचे आमदार नेमके आठवण राहीले नाही. मिरा भाईंदर शहराचा जो प्रथम आमदार आहे त्यांनी प्रथमच स्वतःची निधी मिरा भाईदर शहरासाठी दिली असे हे प्रथम आमदार आहेत. परंतु, हे सर्व त्यांना विसरले. जो माणुस स्थानिक कर्मचाऱ्यांसाठी झटला. त्यांच्या प्रमोशनसाठी, त्यांच्या नोकरीसाठी झटला त्या माणसाचे नाव हे लोक विसरले. ही एक दुःखाची गोष्ट आहे.

**हंसुकुमार पान्डे :-**

जिन्होने अढाई करोड रुपया लगाके मिरा भाईंदर शहर को इतना खुबसुरत बनाया। अपने जेब का पैसा लगाने वाले आदमी का नाम नही है।

**एस. ए. खान :-**

त्यांनी स्वतः पैसे खर्च केलेले आहे. ढाई करो रुपये स्वतः खर्च करून हे काम केलेले आहे.

**हंसुकुमार पान्डे :-**

कमिशनर साहब, हमलोग पॉलिटीशन लोग पॉलिटीक्स करते है वह देखने मे आता है। लेकिन महानगरपालिका हमलोगोसे पॉलिटीक्स करती है यह भी आज इधर देखने मे आ रहा है। यह पॉलिटीक्स किसकी है हमको यह दिखाना आपको जरुरी है। नही तो हमलोग सभे मे बैठने वाले नही है। यह कॅलेंडर और डायरी कॅन्सल करो और नया कॅलेंडर और डायरी छपाओ।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नया डायरी छपाओ।

**सुरेखा गायकवाड :-**

नविन डायरी आणि कॅलेंडर ताबडतोब छापण्यात याव्यात.

**प्रेमनाथ पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण ह्या डायऱ्या किती हजार छापल्या आहेत?

**एस. ए. खान :-**

नविन डायरी आणि कॅलेंडर पुन्हा छापण्यात याव्यात.

**सुरेखा गायकवाड :-**

डायरी आणि कॅलेंडर छापल्या त्याला एकुण किती खर्च झाला?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नया डायरी छापनेके लिए हमारा अनुमोदन है। महापालिकेने नविन डायरी छापावी.

**हंसुकुमार पांडे :-**

यह जो डायरी और कॅलेन्डर दिया है वह कॅन्सल किया जाए। वापस से नया डायरी और कॅलेन्डर बनाना पडेगा। तभी हम लोग मा. महासभा चलने देंगे, नही तो नही चलने देंगे।

**चंद्रकांत मोदी :-**

आयुक्त साहब, संबंधित अधिकारी को सामने खडा किया जाए। संबंधित अधिकारी को सामने खडा नही किया जायेगा, तो सभा चलने नही देंगे।

**केशव घरत :-**

मा. उपमहापौर साहेब, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत घोडबंदरचा ऐतिहासिक किल्ला आहे. ह्या किल्याचा सुद्धा यावेळेला फोटो दिलेला नाही. ह्याचे कारण काय? म्हणजे प्रत्येक वास्तुचा सगळा विसर पडत चालला आहे का? जर अशा अक्षम्य चुका होत असतील व त्याची किंमत नसेल तर...........

**एस्. ए. खान :-**

मा. उपमहापौर साहेब, गेल्या वर्षी ॲडव्होकेटचे डॉक्टर केले होते आणि ह्या वर्षीही डॉक्टर लिहिलेले आहे. एवढा हलगर्जीपणा चालतो, हे काय आहे?

**धनराज अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहब, यह बजेट की सभा है।

**केशव घरत :-**

आयुक्त साहेब, मी विचारलेल्या प्रश्नाचे मला उत्तर मिळू शकेल का?

**रतन पाटील :-**

सत्ताधारी असून आपली ही परिस्थिती.

**चंद्रकांत मोदी :-**

संबंधित अधिकारी को सामने खडा किया जाए, नही तो सभा चलने नही देंगे। मिरा रोड का स्मशानभूमी लिखा है और सिर्फ मंदिर का फोटो दिखता है।

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, ज्या वेळेला कोणतेही कागदपत्र प्रेसमधून छापतांना आयुक्त साहेब, मा. महापौर साहेब किंवा स्थायी समिती सभापती ह्यांना ज्यावेळेला कागद छापायचे असते त्यावेळेला त्यांच्याकडे आपण कच्चा प्रुफ मागतो. तो प्रुफ आपण मागवला होता का? आणि जर प्रुफ मागवला असतांना त्याच्यामध्ये कोणत्याही चुका किंवा कोणाचे नांव आहे किंवा कोणाचे नांव नाही, फोटो आहे, काय आहे तसा आपण तो प्रुफ बघितला पाहिजे आणि तो प्रुफ बघितल्यानंतरच छपाई होते आणि त्या पद्धतीची छपाई झालेली नाही. तर आत्ता ह्या नगरसेवकांचे म्हणणे आहे, त्याच पद्धतीने ह्या नविन डायऱ्या आहेत आणि आत्ता २००६ चालू

आहे व या गोष्टीला तीन महिने होऊन गेले. तरी डायऱ्या आत्ता बनवल्या. तीन महिने होऊन गेले व ह्या डायऱ्या आत्ता लोकांच्या, नगरसेवकांच्या हाती पडतात. ह्याचा फायदा काय? आपण ते आम्हांला सांगा.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, गए सालभी मिरा रोडका नाम कॅलेन्डर मे नही आया था।

**मा. उपमहापौर :-**

कृपया शांतता ठेवा.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, हम लोग शांत नही होनेवाले है। आज हम लोग मा. महासभा चलने नही देंगे। आप संबंधित अधिकारी को सामने खडा करो।

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

मै डायरी के बारे मे ही कह रहाँ हॅं। कृपया शांतता रखिए।

**शुभांगी नाईक :-**

साहेब, एक मिनिट थांबा. आपण ह्या ज्या बॅगा आणल्या आहेत त्या चोर बाजारातून आणल्या की, सेकंन्ड हॅण्डच्या आहेत. हे बघा, बॅगांचा हा प्रकार काय? ह्या बॅगा कुठून आणल्या? ह्या अशा बॅगा आम्हांला नगरसेवकांना देत आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्या आपण कृपया खाली बसावे. सन्मा. सदस्य मोदीजी आपण खाली बसा. डायरीच्या विषयात बोलतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माध्यमातून भांडारपालांकडून या डायरीसाठी जी छायाचित्र जमा केली गेली. ती कुठून केली आणि किती डायऱ्या छापल्या या विषयाचे निवेदन भांडारपालांकडून होणार आहे. सभागृहात आत्तापर्यंत ज्या डायऱ्या बनवल्या जातात ह्या डायऱ्या साधारणपणे कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून एखादा दुसरा लोकप्रतिनिधी जो जास्त इंटरेस्टेड असतो त्यांच्या सुचना घेतल्या जातात. परंतु, यामुळे दरवेळेला सगळ्याच सदस्यांच्या मनात एक गोष्ट असते की, या शहरात असलेली ऐतिहासिक वास्तु किंवा ज्याची नोंद कोणीतरी घेतली पाहिजे किंवा नाविन्यपुर्ण असा अभिनव असा उपक्रम महापालिकेने राबविला असेल, त्या त्या ठिकाणचे फोटो असले पाहिजे. प्रशासनाने जी चांगली कामे केलेली आहेत. त्यांच्या नोंदी त्या डायरीध्ये आल्या पाहिजेत. या शहराचे महत्वाचे जे प्रकल्प आहेत किंवा सर्व नगरसेवक, अधिकारी किंवा शहरातील इतर महत्वाचे ठिकाण ह्याचे प्रत्येक ठिकाणी फोटो आले पाहिजेत हा उद्देश होता. आपण डायरी पाहतो तेव्हा सर्व नगरसेवकांचे एकदा फोटो आल्यानंतर पुन्हा विविध प्रभाग समित्यांमध्ये फोटो आले. सगळीकडे आले. जर हे फोटो एकदाच आले असते तर अधिक चांगले झाले असते आणि त्याऐवजी आपण या शहरातील ऐतिहासीक वास्तु किंवा महापालिकेने विकसित केलेल्या किंवा एखाद्या दानशुर व्यक्तीने विकसित केलेल्या वास्तु आहेत त्याचा फोटो दिला असता तर अधिक संयुक्तिक झाले असते. यापुढे डायरी बनवताना महापालिकेने तशी एक समिती बनवावी आणि त्या समितीच्या शिफारशीनुसार नाहीतर एखादा इंटरेस्टेड असलेला नगरसेवक किंवा पदाधिकारी स्वतःला वाटेल तिथे त्या फोटोग्राफरला घेउन जाणार. आम्ही डायरी बनताना ही गोष्ट पाहिली आहे की, कित्येक नगरसेवकांना फोटो मागण्यासाठी आपल्याकडे कर्मचारी ॲप्रोच झाले. आपल्याला फोटो द्यायला देखिल वेळ नसतो. डायरी बनणार आहे हे माहित असताना आपण आपल्या सुचना दिल्या असत्या तर अधिक सकारात्मक काम करता आले असते. आता जे झालेले आहे, स्थायी समितीच्या माध्यमातुन ह्या डायरीवर शक्य तो अंकुश ठेवला जातो. परंतु, ह्याच्यापुढे डायरी बनवताना भांडारपालाने लोकप्रतिनिधीमधुनच एक समिती नियुक्त केली पाहिजे किंवा निदान जेवढे गटनेते आहेत त्या गटनेत्यांनी ती डायरी बनवताना लक्ष घातले पाहिजे ही माझी सुचना आहे. याच्याही उपर जाउन ज्या गोष्टीसाठी कॉंग्रेसच्या सदस्यांनी ज्या जोरात आपली भुमिका मांडली. त्यांची भुमिका रास्त आहे. महानगरपालिकेच्या या सदनामध्ये असलेले सदस्य मुझफ्फर हुसैनजी हे उपमहापौर होते आणि आता विद्यमान विधानपरिषद सदस्य आहेत. त्यांनी स्वतःच्या खिशातुन कॉन्ट्रीब्युशन काय असावे ह्याचे एक चांगले उदाहरण संपुर्ण भारत वर्षाला दिलेले आहे आणि अतिशय आधुनिक पद्धतीने स्मशानभुमी, बरेग्राउन्ड आणि कब्रस्तान बांधलेले आहे. वास्तविक त्याचा फोटो यायला पाहिजे होता. ट्रेनमधुन जाताना देखिल प्रवाशी चर्चा करतात की, ही बघा ही एक चांगली वास्तु येथे दिसते. सगळ्यांना 'हम सब एक है' चा नारा देणाऱ्याचा फोटो लागलाच पाहिजे होता. सदस्यांची मागणी आहे की, ह्याचा उल्लेख डायरीत व्हायला पाहिजे होता त्यानंतर आमदार फंडातुन हॉस्पीटल, मडरुम, ब्लड बॅंक, लायब्ररी हे बनवण्याचा आराखडा देखिल देता आला असता पण तो दिला नाही. का दिला नाही? कोणत्या अधिकाऱ्याची चुक आहे? त्याबाबत भांडारपालाने खुलासा करावा. किती डायऱ्या छापल्या आणि जर ह्या सभागृहाचे मत असेल तर आपण पुनःश्च आयुक्त साहेब डायऱ्या छापण्याची परवानगी द्यावी आणि आजची ही सभा आहे तर आपल्याला कोणाला काय म्हणायचे असेल डायरीच्या विषयात तर भांडारपालाच्या खुलाशानंतर थोडक्यात सांगावे आणि सभेचे कामकाज पुढे चालू करावे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर साहेबा, पुनःश्च या डायऱ्या छापल्यानतर या डायऱ्यांचा खर्च कोण बघणार? पुनःश्च जर या डायऱ्या छापल्या तर ह्या डायऱ्यांचा खर्च कोण झेपणार का महानगरपालिकेवरच पडणार.

**हंसुकुमार पांडे :-**

यह डायरी किसके प्रेशर मे आके बनाया गया?

**मा. उपमहापौर :-**

आपल्याला एवढी घाई नको आपण सभागृहाचे मत मागवले आहे. भांडारपालांना याबाबत खुलासा करु द्या.

**प्रकाश दुबोले :-**

पिठासीन अधिकारी म्हणून आपण आयुक्त साहेबांना सांगितले की, डायऱ्या छापा असे.

**मा. उपमहापौर :-**

याबाबत भांडारपालांना खुलासा करु द्या.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, आपण पिठासीन अधिकारी म्हणून आयुक्त साहेबांना सरळ सांगितले की, नविन डायऱ्या छापाव्यात असे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य दुबोलेजी आपण जरा जास्त जागरूक आहात.

**प्रकाश दुबोले :-**

जागरुक नाही, तुम्ही या सभागृहात......

**मा. उपमहापौर :-**

मी असे सांगितले की, सभागृहाचे जर मत असेल तर आयुक्तांच्या मताने तसे करता येईल का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही अनुमोदन दिलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

नविन डायरी छापा म्हणून सांगितलेले नाही.

**प्रकाश दुबोले :-**

नविन डायरी छापा म्हणून तुम्ही बोललात. कॅसेट ऐकून बघा आपण काय बोललात. आपण डबल डबल खर्च कशाला करायला लावता? अगोदर तुम्ही पादाधिकारी लोकांनी लक्ष दिले नाही.

**सुरेखा गायकवाड :-**

हे सगळे पहिले अगोदर व्यवस्थित बघायला पाहिजे होते.

**प्रकाश दुबोले :-**

हे सर्व आपण अगोदर बघायला पाहिजे होते. तुम्ही अधिकाऱ्यांकडे लक्ष देउन बघायला पाहिजे होते. तेव्हा दुर्लक्ष केले आणि आता नविन डायरीसाठी भांडता.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, यह विषय आनेपर मा. महापौर मॅडम भी बाहर चले गये।

**हंसुकुमार पांडे :-**

महापौर मॅडम बाहर चले गए, बाकी और भी बहूत से लोग बाहर चले गए।

**चंद्रकांत मोदी :-**

संबंधित अधिकारी को महापौर मॅडम मिले हूए है, इसका मतलब यह हुआ महापौर मॅडम भी बाहर चले गए।

**सुरेखा गायकवाड :-**

एवढा महत्वाचा विषय चालू असताना महापौर मॅडम सभागृहातुन उठून गेल्या आणि कोणत्या कामासाठी बाहेर गेल्या?

**हंसुकुमार पांडे :-**

कमिशनर साहब, आप इसका जवाब दिजीए की, किसके प्रेशर मे आके डायरी छापी गयी और यह कॅलेंडर छापा गया। इसका हमलोगो को जवाब चाहीए।

**एस. ए. खान :-**

कुठले अधिकारी आहेत? त्यांचे नाव जाहीर करावे.

**चंद्रकांत मोदी :-**

संबंधित अधिकारी को सभागृह के सामने खडा किया जाए।

**धनराज अग्रवाल :-**

अध्यक्ष महोदय, यह बजेट की सभा है या डायरी के बारे मे मिटींग चालू है।

**एस. ए. खान :-**

पहिले डायरी और कॅलेंडर पर चर्चा चल रही है।

**धनराज अग्रवाल :-**

अध्यक्ष महोदय, बजेट की सभा चालू होने से पहले मुझे एक स्थगन प्रस्ताव मांडनेका है।

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. आयुक्त साहेब, सभागृहामध्ये अंदाजपत्रकावर चर्चा व्हायच्या अगोदरच डायरीचा विषय सभागृहामध्ये जोरदार चर्चेला आला. मला वाटते सभागृहाच्या वतीने मी आपल्याला विनंती करतो की, आपण आपल्या खात्याचे जे संबंधित अधिकारी आहेत त्यांना सभागृहामध्ये त्या पद्धतीचा खुलासा करू द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आजची सभा बजेटच्या विषयावर आहे. डायरीच्या विषयावर सभा नाही. आपण या विषयावर नंतर खुलासा करा.

**हंसुकुमार पांडे :-**

आम्हाला आत्ताच खुलासा पाहिजे.

**एस. ए. खान :-**

आम्हाला खुलासा पाहिजे त्याच्यासाठी आम्ही जमलो. खुलासा पाहिजे नाहीतर आम्ही सभा चालू करू देणार नाही. अगोदर खुलासा द्या व नंतर सभा चालू करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपल्याला जर खुलासा पाहिजे तर आपण आयुक्त साहेबांच्या डिपार्टमेंटला जाउन खुलासा द्या.

**एस. ए. खान :-**

आम्हाला सभागृहामध्ये खुलासा पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही बजेटची सभा आहे आणि आपल्याला जर खुलासा पाहिजे तर आपण आयुक्त साहेबांच्या दालनामध्ये जा आणि खुलासा घ्या.

**एस. ए. खान :-**

पहिले खुलासा पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बजेटच्या विषयावर चर्चा झाली पाहिजे.

**एस. ए. खान :-**

सभागृहामध्ये खुलासा पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेबांच्या दालनात जा आणि खुलासा घ्या.

**सुरेखा गायकवाड :-**

खुलासा दिल्याशिवाय बजेटच्या विषयाची चर्चा होणार नाही आणि तोपर्यंत आम्ही सभा चालवू देणार नाही.

**एस. ए. खान :-**

आम्हाला खुलासा पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या सभेमध्ये डायरीबद्दल खुलासा होणार नाही. या विषयामध्ये हा विषय नाही. आपली तर बजेटमध्ये काही चुकी असेल तर त्याचा आपण खुलासा मागा. पण बजेटचा विषय आहे तर आपण त्याच्यावरच चर्चा करा.

**एस. ए. खान :-**

जो पर्यंत खुलासा देणार नाही तोपर्यंत आम्ही सभा चालू देणार नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. प्रकाश परांजपे इनका नाम नही लिआ इसलिए कितनी बडी चर्चा की थी और हमारे पक्ष आमदार के बारे मे बोल रहे है तो आपको तकलीफ हो रही है क्या?

(सभागृहात गोंधळ)

**मुक्ता रांजणकर :-**

अध्यक्ष महोदय, हे डायरीच्या विषयाला विरोध करत आहेत तर मला असे वाटते की, डायरी बनवताना त्यांचाही हात होता का? म्हणून त्यांना त्यांचा विरोध पत्करत नाही. डायरी बनवताना त्यांचा त्याच्यामध्ये हात होता का? म्हणून डायरीचा विषय काढल्यानंतर त्यांना सहन होत नाही का?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सर्व सदस्यांना विनंती करतो की, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी ह्यांनी सांगितले की, ही बजेटची सभा आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, बरोबर आहे. ही बजेटची सभा आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

बजेटची सभा आहे हे बरोबर आहे, साहेब पण ह्या विषयावर बोलले पाहिजे ना.

**मा. उपमहापौर :-**

ही बजेटची सभा आहे. या विषयात आपण बजेटच्या विषयानंतर चर्चा केली तर अधिक उत्तम राहिल हे माझे मत आहे. कृपया, आपण शांत बसावे आणि आता पर्यंत डायरी बनवताना अधिकाऱ्यांनी जे ठरवले तसे झाले आता आपण सुचना केलेली आहे की, सर्व गटनेत्यांनी.....

**हंसुकुमार पांडे :-**

सर, आज तक गटनेते को कोई पुछता नही है। एक कॅबिन दिया है वह भी मुतारी के बाजु मे है। हम तेवीस नगरसेवको का गटनेता है उसको कॅबिन इतनासा है। सर हमको बोलने दिजीए, आप बुरा मत मानिए।

**मा. उपमहापौर :-**

आपका क्या बुरा माननेका। आप भी शांत हो जाओ। गटनेता की अभीतक समिती नही बनाई थी। अभी बनाने का ऐसा मै बोल रहा हूँ।

**हंसुकुमार पांडे :-**

बनाना ही नही चाहिए।

**मा. उपमहापौर :-**

अभी बनाने के विषय मे मै ऐसी सूचना कर रहा हूँ। आप समझ के बात करो ना।

**हंसुकुमार पांडे :-**

सर, हमको केबिन दिया है वह भी मुतारी के बाजू मे।

**मा. उपमहापौर :-**

दुसरी केबिन भी जॉईन्ट कर रहे है।

**हंसुकुमार पांडे :-**

हमलोगो को केबिन देने के लिए इतने बडे महापालिका मे जगह नही है क्या?

**मा. उपमहापौर :-**

दुसरी केबिन भी उसमे समाविष्ट की जा रही है।

**हंसुकुमार पांडे :-**

दुसरी केबिन समाविष्ट की जा रही है यह बरोबर है। मै यह बात को मानता हूँ।

**दिनेश नलावडे :-**

अध्यक्ष साहेब, आपण संबंधित अधिकाऱ्यांना बोलवा आणि त्यांच्याकडून आम्हाला खुलासा द्या.

**सुरेखा गायकवाड :-**

खुलासा करावा.

**एस. ए. खान :-**

आयुक्त साहेब, आपण आम्हाला उत्तर द्या.

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, ही बजेटची सभा आहे. आपण बजेटच्या विषयाला सुरूवात करावी. आजचा विषय डायरीचा नाही.

**दिनेश नलावडे :-**

आपण संबंधित अधिकाऱ्यांना सभेसमोर बोलवून घ्या.

**परशुराम पाटील :-**

कमिशनर साहेब, येथे संबंधित अधिकाऱ्याचा विषय नाही. ही बजेटची स्पेशल सभा आहे. बजेटच्या विषयावरची सभा चालू करावी अशी अपल्याला विनंती करतो.

**हंसुकुमार पांडे :-**

विरोधी पक्ष नेते, आम्हाला अधिकाऱ्याला सभेसमोर बोलवू द्या.

**चंद्रकांत मोदी :-**

संबंधित अधिकारी इधर सामने खडे रहकर माफी मांगेगा तब हमलोग निचे बैठेंगे।

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, आपण आपला निर्णय द्या. हे काय लावले आहे. विषय नसताना हा विषय घेता. बजेटचा विषय चालू करण्यात यावा.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडेजी जब संबंधित अधिकारी खुलासा करनेके लिए बोल रहे थे तब आपने बोलने से उनको मना किया।

**हंसुकुमार पांडे :-**

नही, हमने नही मना किया। हमको बताव के किसके प्रेशर मे आके डायरी छापी गई है। किसके प्रेशर मे आके कॅलेंडर छापा गया।

**प्रेमनाथ पाटील :-**

डायऱ्याच्या किती प्रती छापल्या त्याचाही खुलासा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, आजची सभा बजेटची आहे आणि ह्यांना सदर विषयामध्ये जो खुलासा पाहिजे त्याबाबत त्यांनी आयुक्त साहेबांच्या कॅबिनमध्ये, महापौराच्या कॅबिनमध्ये जाउन खुलासा घ्यावा.

**एस. ए. खान :-**

आम्हाला येथेच खुलासा पाहिजे, डायरीचा आणि कॅलेंडरचा, अन्यथा आम्ही सभा चालू देणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण नविन डायरी छापा त्याला आमचे पुर्ण समर्थन आहे. लेकिन खुलासा इस बात का इस मा. महासभा मे नही होगा।

**एस. ए. खान :-**

आम्हाला खुलासा पाहिजे.

**चंद्रकांत मोदी :-**

खुलासा मा. महासभा मे ही होगा।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आप नया डायरी छापो उसके लिए हमारा समर्थन है। पण बजेटच्या सभेमध्ये खुलासा होणार नाही. आपण नविन डायरी छापा ना, आम्ही अनुमोदन देतो. नविन डायरी छापा पण खुलासा नाही.

**मा. आयुक्त :-**

अध्यक्षांच्या परवानगीने बोलतोय की, मा. महासभेमध्ये दैनंदिनीचा विषय उपस्थित केलेला आहे. या दैनंदिनीच्या बाबतीमध्ये मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आपण याठिकाणी जी मा. महासभा आयोजित केलेली आहे ती अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी आणि अंदाजपत्रक मंजुरीसाठी ही सभा बोलावलेली आहे. परंतु, सभा सुरू होण्यापुर्वी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या मुद्याबाबत सन्मा. सदस्यांना विनंती करु इच्छितो की, दैनंदिनीच्या बाबतीमध्ये आपल्या ज्या काही तक्रारी असतील किंवा ज्या काही सुचना असतील त्याबाबतीमध्ये आपण मा. महापौरांच्या दालनामध्ये बसुन आपण त्याच्यावर एकत्र बसून विचार विनिमय करुया आणि त्याच्यातुन आपण काहीतरी मार्ग काढू या. ज्या त्रुटी प्रशासनाकडून राहिल्या असतील किंवा अन्य कोणाकडून राहिलेल्या असतील त्याची पूर्तता कशा पद्धतीने करता येईल याबाबत आपण सकारात्मक दृष्टीकोन ठेवून त्यावर निर्णय घेउ. सन्मा. सदस्यांना माझी विनंती राहीन की, ज्या कारणासाठी आपण ही मा. महासभा आयोजित केलेली आहे. त्याबाबत विचार विनिमय करायला सुरूवात करावी अशी मी मा. महापौरांच्यावतीने आपल्याला विनंती करतो.

**एस. ए. खान :-**

साहेब आपण संबंधित अधिकाऱ्यांना बोलवा.

**दिनेश नलावडे :-**

कमिशनर साहेब, ज्या अधिकाऱ्याकडून चूक झालेली आहे व त्याच्यावर आज सभागृहामध्ये एवढी चर्चा होते. ते अधिकारी अजुन याठिकाणी आलेले नाही फक्त टिळा लावला म्हणजे झाले का? त्यांच्यावर आज चर्चा होत आहे? त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे त्या अधिकाऱ्याला आपण स्टेजवर बोलवा.

**एस. ए. खान :-**

संबंधित अधिकाऱ्याला सभेसमोर बोलवा नाहीतर आम्ही सभा चालू देणार नाही.

**दिनेश नलावडे :-**

यापुढे असे झाले नाही पाहिजे आपण संबंधित अधिकाऱ्यांना बोलवा.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, गए साल भी ऐसा ही हूआ था और बोला था की चुक झाली तो यह साल भी चुक झाली. हमेशा चुक होती है।

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, डायरीमध्ये कोणाचा फोटो ठेवावा आणि कोणाचा फोटो ठेवू नये. आपण जर डायरी बघितली असेल तर आपण संपूर्ण मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये शहराचे शासन म्हणून बॉडी म्हणून आम्ही निवडून आलो तेव्हापासुन आमचे प्रथम लाडके नगराध्यक्ष मा. गिल्बर्ट मेंन्डोंन्सा साहेब, प्रथम मा. महापौर मा. मायरा मेंन्डोंन्सा साहेबा आणि आताचे मा. महापौर, मा. उपमहापौर, स्थायी समितीचे अध्यक्ष वगैरे सर्वांचे आपण फोटो लावले. नेमके या शहरामध्ये छोट्याशा वयामध्ये जो माणूस महाराष्ट्रामध्ये युवक काँग्रेस अध्यक्ष झाला. एक छोटासा नगरसेवक झाला आणि त्याच्यावरून ते उपमहापौर पदावर आले व उपमहापौर पद हे ह्या फर्ममध्ये भूषविले आहे आणि आताची जी बॉडी महाराष्ट्र स्टेटवर आहे त्याच्यावर ते आमदार म्हणून आहेत आणि त्याचे फोटो न टाकणे म्हणजे ही खरोखर दुःखाची गोष्ट आहे. ह्याच्यामध्ये वादावाद होत आहे. साहेब, काँग्रेस पक्षाचे राज्य आहे आणि आम्ही वादावाद करतो की, आमच्या आमदाराचा फोटो का नाही? साहेब, आमच्या आमदारांनी ह्या मिरा भाईंदर शहराला स्वतःचा निधी दिला त्याचा उल्लेखसुद्धा त्याच्यामध्ये केलेला नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, स्मशानभुमी का फोटो है लेकिन सिर्फ मंदिर दिखाई देता है।

**हंसुकुमार पांडे :-**

हमारी यह विनंती है की, नई डायरी और कॅलेंडर छापी जाए और उसमे मिरा भाईंदर मे जो जो बडे महत्वपूर्ण काम है उसको उस कॅलेंडर और डायरी मे फोटोग्राफ्स लिए जाए।

**रिटा शहा :-**

डायरी और कॅलेंडर नया छापा जाए और इसपर ध्यान देनेवाला जो ऑफीसर है उसकी गलती की वजह से ऐसी डायरी छापी गई है इसलिये उसके गलती की उसको सजा करके उसका खाता उसके पास से वापस लिया जाए।

**चंद्रकांत मोदी :-**

लाखो करोडो रूपया मिरा रोड से टॅक्स वसूल किया जाता है। और मिरा रोड मिरा भाईंदर की यह डायरी और कॅलेंडर मे नामोनिशाण नही रखा है। सिर्फ मिरा लिखा है।

**एस. ए. खान :-**

मिरा रोडलाच का? असे मिरा रोडवर जळण आहे का?

**चंद्रकांत मोदी :-**

उत्तन, राई-मुर्धा सब दिया है सिर्फ मिरा रोड का नाम नही दिया है। आप लोग मिरा रोड का ही नाम भुल गए है।

**हंसुकुमार पांडे :-**

कमिशनर साहेब, यह जो डायरी निकालनेवाला संबंधित अधिकारी है उसका आप हमलोगो को चेहरा दिखाईए।

**चंद्रकांत मोदी :-**

संबंधित अधिकारी को सामने लाया जाए।

**एस. ए. खान :-**

एवढा करोड रुपयाचा हाउस टॅक्स आपण मिरारोडमधून वसूल करतो आणि पुर्ण मिरा भाईंदर शहर त्याच्यावर चालते. एवढ्या मोठ्या प्रमाणात हाउस टॅक्स तेथून येत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

इतना सुंदर मिरा रोड है और उसका कहीपर भी नामोनिशाण नही है।

**एस. ए. खान :-**

आपल्याकडे सर्व खाते आहेत आणि जेवढी आवक आहे ती सर्व अधिक मिरा रोडमधून आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

संबंधित अधिकारी का आप हमलोगो को चेहरा दिखाईए।

**एस. ए. खान :-**

साहेब, आपण रिपोर्ट मागवा मिरा रोडमधून किती टॅक्स येतो?

**सुरेखा गायकवाड :-**

आयुक्त साहेब, आपण संबंधित अधिकाऱ्यांना बोलवा आणि विचारा की तुमच्याकडून अशा चुका कशा झाल्या?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, पिठासीन अधिकारी आता ह्यांनी जो नविन डायरी छापायचा प्रस्ताव मांडलेला आहे तर आपण नविन डायरी छापायला आमचे सहमत आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, हमारे सभी सदस्य को विनंती है की, सिर्फ संबंधित अधिकारी को सामने लाया जाए। हमको नाम मालूम पडना चाहिए।

**हंसुकुमार पांडे :-**

कमिशनर साहेब, संबंधित अधिकाऱ्यांना आपण बोलवा. आम्हाला त्यांचा चेहरा बघायचा आहे.

**एस. ए. खान :-**

साहेब, ह्यांच्यापुढे मिरा रोडचे नाव विसरु नका. हे लक्षात ठेवा आणि जर नाव विसरले तर त्याचा परिणाम भोगायला लागेल.

**हंसुकुमार पांडे :-**

मै ठराव मांड रहा हू की, डायरी और कॅलेंडर नयी छापी जाए।

**सुरेखा गायकवाड :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मै भी अनुमोदन देता हू।

**शरद पाटील :-**

आयुक्त साहेब, ह्या डायरीमध्ये कुठले फोटो आहेत ते आम्हाला माहित नाही आम्हाला अजून डायरी मिळालेली नाही. हे काय चालले आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

प्रभाग क्र. १४ मध्ये साईबाबा मंदिर आहे. ते फार मोठे आहे. त्या साई बाबा मंदिराचा आपण कुठे उल्लेख केलेला नाही.

**एस. ए. खान :-**

डायरीमध्ये माझ्या नावासमोर डॉक्टर केले आहे. त्याचे ॲडव्होकेट म्हणून सुधारणा करावी. गेल्या वर्षीही डॉक्टर लिहले होते आणि ह्यावर्षीही डॉक्टर लिहीले आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य आपण आता बसून घ्या आणि सभेच्या कामकाजाला सुरुवात होऊ द्या.

**दिनेश नलावडे :-**

कमीशनर साहेब, डायरी व कॅलेन्डरच्या विषयी ही जी संपूर्ण चर्चा झाली तर यापुढे असे अधिकारी जर आपल्या महानगरपालिकेमध्ये बसले तर अशीच वादावादी होईल. ह्यांच्यावर आपण खरोखरच कार्यवाही करा आणि त्यांना ही जबाबदारी देऊ नका. मी आपल्याला सांगतो, आपण या ठिकाणी खुलासा काय करता जी आज येथे चर्चा झाली तर कॅलेन्डर आणि डायरी नविन छापण्यासाठी ठराव केलेला आहे. तो ठराव कुठपर्यंत, केव्हापर्यंत ह्या डायऱ्या आणि कॅलेन्डर मिळतील ह्याचा फक्त आम्हाला खुलासा द्या.

**सुनिता पाटील :-**

कमीशनर साहेब, याठिकाणी मी तुम्हाला सांगु इच्छिते की, मी महिला व बालकल्याण समितीची सदस्या आहे. तरी डायरीमध्ये माझे नावसुध्दा नाही, फोटोसुध्दा नाही.

**परशुराम पाटील :-**

साहेब, अशी काही नावे डायरीमध्ये नाही म्हणून मला ज्या डायऱ्या दिल्या त्या डायऱ्या मी वाटपही केलेल्या नाहीत. स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे साहेब आहेत. त्यांनी ते बघायला पाहिजे होते की, कोणाचे नाव आहे आणि कोणाचे नाही. हे सर्व बघून नंतर छपाई करायला पाहिजे होती.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे साहेब, आपल्या निर्देशनाखाली, आपल्या देखरेखीखाली डायरी छापली गेली होती. त्याच्यामध्ये काही सदस्यांचे फोटो आलेले नाहीत. मात्र ह्याच्यापुढे आता तुर्तास सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे साहेबांनी सांगितले की डायऱ्या छापू नयेत. परंतु, डायऱ्या छापायची जेव्हा वेळ येईल तेव्हा सर्व गटनेत्यांची एक समिती त्यांनी पारित केलेली, त्यांनी ठरविलेल्या गोष्टींचा समावेश त्याच्यामध्ये करावा, केला जावा. अन्यथा एखाद्या सदस्याने स्वतःची प्रतिष्ठा करुन हा फोटो लागूच नये किंवा हाच फोटो लागला पाहिजे. अशा खोट्या प्रतिष्ठा करु नये. या शहरातील प्रमुख कार्यालयांमध्ये, प्रतिष्ठीत नागरिकांकडे, लोकप्रतिनिधींकडे अशा अनेक ठिकाणी या डायऱ्या जात असतात. तर त्याच्यामध्ये आपल्या शहराचे महत्वाचे काय आहे ते त्या डायरीच्या निमित्ताने लोकांपर्यंत पोहचले पाहिजे असा दृष्टीकोन ठेवा आणि आपण सभेच्या पुढील कामकाजाला सुरुवात करावी अशी सचिवांना मी विनंती करतो.

**दिनेश नलावडे :-**

फक्त आम्हाला खुलासा द्या की, कुठंपर्यंत डायऱ्या मिळतील आणि नविन डायऱ्या मिळतील की नाही? आणि केव्हापर्यंत बनतील? आम्हाला फक्त एवढेच सांगा आणि सभेच्या कामकाजाला सुरुवात करा.

**मा. उपमहापौर :-**

या विषयी आयुक्त साहेबांबरोबर मा. महापौर यांच्या दालनात बसून या विषयामध्ये योग्य तो निर्णय घेऊ.

**धनराज अग्रवाल :-**

अध्यक्ष महोदय, बजेट की सभा का डिस्कशन होने से पहिले मै स्थगन प्रस्ताव मांड रहा हूँ।

**मा. नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, सन २००५-०६ चे सुधारीत व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समिती सभापती हे मा. महापौरांना सादर करीत आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

अध्यक्ष महोदय, अभी जो आपको बजेट का कॉपी प्रस्तुत किया गया है। उसमे गलतीया है इसके लिए मै स्थगन प्रस्ताव यहाँपर मांड रहा हूँ।

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल साहेब, आताच स्थायी समितीचे सभापती मा. तुळशीदास म्हात्रे ह्यांनी बजेटची कॉपी आपल्याला सादर केलेली आहे आणि स्थायी समितीच्या सभापतींचे त्याच्यावर मनोगत अगोदर मांडू दे. म्हणजे रितसर बजेट सादर केल्यासारखे होईल.

**धनराज अग्रवाल :-**

आम्हाला ते ऐकायचेच नाही. ते चुकीचे आहे. सादर केलेले सन २००५-०६ चे सुधारीत व २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणे..........

**लिओ कोलासो :-**

आमचा ह्यांच्यावर आक्षेप आहे. अद्याप बजेट सादर झालले नाही. बजेटचे प्रास्ताविक वाचलेले नाही आणि आपण स्थगन प्रस्ताव मांडता. अगोदर बजेट मांडू दे ना. बजेट मांडल्यानंतर बजेटवर चर्चा करताना आपण स्थगन प्रस्ताव आणा.

**धनराज अग्रवाल :-**

बजेट सादर झालेले आहे. मुळ अंदाजपत्रकास मान्यता देण्याच्या संदर्भात मा. स्थायी समिती ठराव क्र. २७० दि. ०३/०३/२००६ रोजी मा. स्थायी समितीने मंजुर केलेला अर्थसंकल्पीय ठरावामध्ये श्री. गजानन भोईर ह्यांनी अनुमोदन दिलेले नव्हते.

**प्रेमनाथ पाटील / ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी अनुमोदन दिलेले होते.

(सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल यांनी सभेसमोर स्थगन प्रस्तावाचे वाचन केले.)

**शिवप्रकाश भुदेका :-**

यह स्थगन प्रस्तावको मेरा अनुमोदन है।

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, स्थायी समितीमध्ये ज्यावेळेला अंदाजपत्रक मंजुर झाले त्यावेळेला सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांचे टेपिंगमध्ये आवाज रेकॉर्ड झालेला आहे. जरी ह्याच्यावर त्यांची सही नसली तरी टेपींगमध्ये त्यांनी अनुमोदन दिल्याचे क्लिअर आहे.

**जोजफ घोन्सालवीस / शिवप्रकाश भुदेका :-**

आम्हाला त्या ठरावाची प्रत दाखवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर प्रत्यक्ष सभेला हजर आहेत आणि प्रत्यक्षाला प्रमाण नको.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एकेकाने बोला. सभागृह नेते बोलत आहेत त्यांचे बोलणे पूर्ण झाल्यानंतर आपण बोला.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, स्थगन प्रस्तावाबाबत नियमाप्रमाणे दोन तास आधी आपल्याकडे स्थगन प्रस्ताव सादर व्हायला पाहिजे होते. परंतु, तो नियमाप्रमाणे सादर झालेला नाही. त्यामुळे हा स्थगन प्रस्ताव कृपया आपण फेटाळून लावावा.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतोय, ज्यावेळेस शेवटची सभा बजेटच्या बाबतीत झाली. त्यावेळेस आम्ही बाहेर निघत होतो. सन्मा. सदस्य मोहन पाटील बाहेर निघतेवेळी त्यांना आठवण आली की, हा ठराव मांडायचा आहे. त्यांनी तो ठराव मांडला. त्यावेळेला आम्ही बाहेर जात होतो. त्या टेपींगमध्ये सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांचे स्पष्ट म्हणणे आहे की, मी या ठरावाला सुचक म्हणून आहे आणि अनुमोदनाचे

तुम्ही बघून घ्या. त्यावेळेला सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी सरळ सांगितलेले आहे की, गजानन भोईर ह्यांचे अनुमोदन घ्या आणि त्यावेळेला सभा संपली होती आणि आम्ही बाहेर निघत होतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ज्यावेळी आम्ही हे असे म्हटले त्यावेळी त्यांनी अनुमोदन दिले नाही. नंतर त्यांनी अनुमोदन दिले.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझे अनुमोदन असे टेपिंगमध्ये स्पष्ट आवाज आहे. सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांनी अनुमोदन दिलेले आहे.

**गजानन भोईर :-**

त्यावेळेस आम्ही बाहेर निघत होतो आणि माझी ठरावावर सिग्नेचर घेतलेली नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सिग्नेचर घेतली नसेल तरी टेपिंगमध्ये या ठरावाला माझे अनुमोदन आहे असा स्पष्ट आवाज आहे.

**जेम्स कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, हे सभागृह चालते ते फक्त ध्वनिफितीवर चालते का? जो ठराव झालेला आहे त्या ठरावाची कॉपी आपण आम्हाला सादर करावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सहीसकट ठरावाची कॉपी दाखवा.

**गजानन भोईर :-**

ज्यावेळेस सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांनी ठराव मांडला त्यावेळेस सभा संपली होती आणि आम्ही बाहेर निघत होतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभा संपलेली नव्हती. सभा चालू होती आणि त्यांनी ठराव मांडला. आपण टेप वाजवावी.

**जेम्स कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, हे सभागृहसमोर ध्वनिफितवर चालत नाही. जो ठराव झालेला आहे त्या ठरावाला अनुमोदक म्हणून ज्याची सही आहे तो ठराव आम्हाला सादर करावा.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीची सभा अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी २७ तारखेपासून १ तारखेपर्यंत सभागृहात चालू होती आणि स्थायी समितीच्या सभेमध्ये सर्वपक्षीय सदस्य तिथे हजर होते. कोणीही त्यावेळेस गैरहजर नव्हते. सर्व पक्षीय होते. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये चार दिवसामध्ये आम्ही स्थायी समितीचा अंदाजपत्रक तयार केले. अंदाजपत्रक तयार झाल्यानंतर शेवटच्या दिवशी सभा परिवार करण्यासाठी सर्व सदस्य एका ठिकाणी अरेन्जमेन्ट केले होते, थकल्यामुळे तिथे सगळे गेले. म्हणजे बीजेपी, शिवसेना, कॉंग्रेस, कुठल्याही तऱ्हेचा भेदभाव नसताना आणि या शहराचे अनेक प्रकल्प राबविण्यासाठी सुधारणा करण्यासाठी सर्वांनी अतिशय चांगल्यातऱ्हेने सहकार्य केले आणि जवळजवळ सगळेच ठराव एकमताने पास झाले. त्या काळात संपूर्ण वेळ मी सभागृहात होतो. ठरावावर सही घेतली नसेल तर ती तांत्रिक बाब झाली. परंतु, टेपमध्ये आवाज............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण सत्ताधारी पक्षाची सही घेऊ शकता ना. आमच्याच सदस्याची आपण सही का घेतली. तुमच्या सत्ताधारी सदस्याची सही घ्या ना.

**(सभागृहात गोंधळ)**

**धनराज अग्रवाल :-**

जाणून बुजून ह्यांचे नाव टाकलेले आहे. ही तांत्रिक बाब नाही.

**जयंत पाटील :-**

भारतीय जनता पक्षाचे माझे परममित्र, मी बोलत असताना...........

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण टेप ऐकूण पहिली भाषा बघा.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर आता माघार घेत आहेत. स्थायी समितीमध्ये तेच बोलले आणि आता सभागृहात नाही बोलतात.

**मा. उपमहापौर :-**

कृपया सदस्यांनी शांतता राख.

**गजानन भोईर :-**

आवाज कोणाचा हे आकलनच होत नाही.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर हे सभागृहाची दिशाभूल करत आहेत.

**नितीन ठाकूर :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर साहेबांना प्रोटेक्शन द्या. ते घाबरत आहेत.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, मेरा आपसे निवेदन है की, सन्मा. सदस्य गजानन भोईर अपना बयान बदल रहे है।

(सभागृहात गोंधळ )

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य जयंत पाटील (दादा) हे सत्य बोलत आहेत. त्यांना बोलू द्या.

**मा. उपमहापौर :-**

एका सदस्यांने आपले मनोगत व्यक्त केल्यानंतर आपल्याला मनोगत व्यक्त करण्यासाठी संधी मिळणार आहे. सन्मा. सदस्य गजानन भोईर साहेब ज्या विषयासाठी आपण सांगता की, मी अनुमोदन दिले नाही. या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बजेट सादर करतोय, चुकीचे काहीच करत नाही. आणि या शहराच्या विकासात तुमचा हात लागला तर त्यात काय चुकीचे होणार आहे का?

**गजानन भोईर :-**

कुठे सांगतोय?

**मा. उपमहापौर :-**

कृपया सदस्यांना बोलू द्या.

**जयंत पाटील :-**

बजेट सादर केल्यानंतर, बजेट तयार झाल्यानंतरसुध्दा कालची आमची स्थायी समितीची सभा झाली. त्यात देखील तो विषय आल्यानंतर तो विषय तिथेच संपला.

**गजानन भोईर :-**

मी तिथे विषय काढला होता.

**जयंत पाटील :-**

जर बजेटमध्ये काही तांत्रिक चुका असतील, बजेटमध्ये काही वाढ करायची असेल तर ती वाढ आपण ह्या मा. महासभेमध्ये करु शकतो. मा. महासभेमध्ये बजेट दुरुस्त होऊ शकते. परंतु, मी अनुमोदन दिले नाही. हे कारण होऊ शकणार नाही. सभागृहात आम्ही सर्व सदस्य असताना मंजुरी मिळालेली होती. तेव्हा आपण कुठल्याही तऱ्हेने विरोध केलेला नाही. तर आता आपण बदल करण्याचे कारण नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, जर शहराच्या विकासाचा प्रश्न आहे. अंदाजपत्रकावर शहराचा विकास आधारित असतो. आणि अशा विषयावर सभापती म्हणून आपण मॅरेथॉन चर्चा घडवून आणली. ज्या-ज्यावेळी आपल्याला प्रश्नाच्या समाधानाकरीता अधिकाऱ्यांची गरज लागली त्या-त्यावेळी आपण अधिकाऱ्यांना उपलब्ध केले आणि त्या सर्वांना मिळून बजेटवर चर्चा झाली आणि ज्या ठराविक अमाऊंट ठेवायच्या आहेत. का ठेवली पाहिजे? का ठेवली नाही? अशी सर्वांनी मिळून चर्चा केलेली आहे. शिवसेनेचे सदस्य आहेत, बीजेपीचे सदस्य आहेत. त्यांना आम्ही विरोधी पक्ष न बोलता त्यांना आम्ही सहकारी पक्ष असे बोलतो. आणि त्यांच्याबरोबर आम्ही वावरतो आणि त्यांनीही ते एक्सेप्ट केले आहे. त्याच्यामुळे आम्ही त्यांना विरोधी म्हणून दाखवलेले नाही आणि जर त्या विषयावर स्थगन प्रस्ताव येत असेल, त्या विषयावर स्थगन प्रस्ताव जर आणत असेल तर मग त्यांना शहराच्या विकासाची किती काळजी आहे हा प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकत नाही का? होऊ शकतो ना आणि म्हणूनच जर तुम्हाला विकास होऊ द्या. शहराचे अनेक महत्वाचे प्रश्न आहेत. त्या प्रस्तावात स्थगन प्रस्ताव आले पाहिजे. मान्य आहे. तो सदस्यांचा मुलभुत हक्क आहे. त्या हक्कावर आपण गदा आणूही नये. या मताशी मी आहे. परंतु, त्याला कायद्यानुसार स्थगन प्रस्ताव कधी दिला पाहिजे हा विषय नंतरचा आहे. ही कायद्याची बाब मा. महापौर किंवा सचिवांनी पडताळून पहावे हा भाग नंतरचा आहे. परंतु, अंदाजपत्रकासारख्या विषयावर स्थगन प्रस्ताव आणणे चुकीचे आहे. सन्मा. सदस्य जयंत पाटीलजी हे आपल्याला बोलले की, आपण याच्यासाठी स्थायी समितीमध्ये तरतुद केलेली आहे आणि मा. महासभेमध्ये तरतुदीचा कॉलम रिकामा आहे. त्याच्यात आपण तरतुद करु शकतो परंतु जर विकास कामाला स्थगन प्रस्ताव आणण्यासारखा, अंदाजपत्रकाच्या सभेवर होऊ शकते आणि म्हणून मी तुम्हाला सांगतो की, या विषयावर स्थगन प्रस्ताव आणणे म्हणजें आमच्या सहकारी पक्षाने कुठेतरी नैतिकता गमावलेली आहे. विकास कामाच्या बाबतीमध्ये मिरा भाईंदर शहराची ........

**जोजफ घोन्सालवीस :-**

हा प्रस्ताव विकास कामावर नाही हा प्रस्ताव राजकीय कार्यपध्दतीवर आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य आम्हाला बोलू द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपले बोलणे टेक्नीकल पाहिजे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, आम्हाला या ठिकाणी असे सांगायचे आहे की, सर्व सन्मा. सदस्यांनी, स्थायी समिती सदस्यांनी जेव्हा अंदाजपत्रक आले त्या अंदाजपत्रकाला सर्वांच्या सुचना नमुद केलेल्या आहेत. ठिक आहे, ज्या सुचना आम्हाला त्यावेळी आठवल्या नसतील त्या सुचना आम्हाला द्यायला पाहिजे आणि त्या सुचना आता आम्ही या वेळेस देऊ शकतो. मा. महासभेचा एक रकाना अजुन बाकी आहे. परंतु, विकास कामाच्या गोष्टीवर जर आमच्या सहकारी पक्षाने स्थगन प्रस्ताव आणला तर त्यांनी आत्मपरिक्षण केले पाहिजे. ही विकासाची बाब आहे. मी तुमच्याकडून सहकार्याची अपेक्षा मागतो. आम्ही तुमच्याकडून सहाकार्याची अपेक्षा मागतो. आपण जरुर सांगा की याच्यामध्ये ह्या त्रुटी राहिल्या आहेत हे करायला पाहिजे आणि आपण हे केलेही पाहिजे. पण निव्वळ हा जो प्रस्ताव या ठिकाणी सत्ताधारी पक्ष कॉंग्रेस किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेस असेल आणि त्यांना आम्हाला निव्वळ विरोध करायचा असेल तर तो विरोध या प्रस्तावावर नको. आपण विरोध करा, जरुर विरोध करा. आपल्याला विरोधकाची भुमिका दिलेली आहे. परंतु, अंदाजपत्रकाच्या विषयावर कृपया आपण स्थगन प्रस्ताव आणू नका. आपले जे प्रस्ताव असतील ते आपण करा. या ठिकाणी सोळा सदस्य आपण उभे केले तर सोळा मधील पंधरा सदस्य काय बोलतील की, आपण अनुमोदन दिले असे बोलतील. ते असे का बोलतील तर आपण ते प्रत्यक्ष कृत्य केले आहे. म्हणून आपण जी केलेली कृती आहे ती कृती लपवण्यासाठी जी काही त्रुटी राहीली आहे ते आपण त्रुटीच्या रुपाने सांगा. ही कृती आपल्याला या ठिकाणी पाहीजे. आमचा हा प्रस्ताव बाकी आहे तो आम्हाला मांडायचा आहे. परंतु, पूर्णपणे सभापती महोदयाने बीजेपीला, शिवसेनेला किंवा कॉंग्रेस किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या लोकांना सगळयांना त्यांनी मुभा दिली आहे की, तुम्ही तुमचे प्रस्ताव मांडा. तुंम्ही तुमचे मत मांडा. आपण आपली मते नोंदवलेली आहेत. त्या त्या वेळी आयुक्त, उपायुक्त हे सर्व खात्याच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यांनी तो प्रस्ताव हया ठिकाणी आणलेला आहे. कृपया सदनापुढे आमच्या सहकारी पक्षाला विनंती करतो की, स्थगन प्रस्ताव आणून आपण एक वेगळा संदेश जनतेला देऊ नका. कारण हा विषय राजकीय नाही. हा विषय विकासाचा आहे आणि विकास झाला पाहीजे. शहराचा विकास झाला पाहीजे. त्याचा जो मूलभूत आधार आहे तो अंदाजपत्रकावर संपूर्णपणे आहे आणि अंदाजपत्रकावर स्थगन प्रस्ताव कसा, कोणी आणले आहे का? दाखवा तुम्ही अंदाजपत्रकावर कोणी स्थगन प्रस्ताव आणले असेल. धन्यवाद.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्यांचे अनुमोदन काढून टाका. आपले सत्ताधारी पक्षातील सदस्य अनुमोदन देतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे काढता येत नाही.

**एस. ए. खान :-**

अनुमोदन काढुन टाका. विकासाच्या कामासाठी हे बजेट आहे आणि ते असे नाव का मागे घेतात?

**मिलन पाटील :-**

मा.महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, आमचे सहकारी पक्ष भारतीय जनता पार्टी, त्यांनी मान्य केलेले आहे सहकारी पक्ष म्हणून. मॅडम, आज स्थायी समितीला आम्ही सदस्य आहोत त्याला जवळ जवळ पावनेदोन वर्ष झाली आणि त्याच्यानंतर आमच्या एकसुध्दा ठरावाला ह्या भारतीय जनता पार्टीने विरोध केलेला नाही आणि एकसुध्दा सभेमध्ये त्यांनी कधी सभात्याग केलेला नाही.

**लिओ कोलासो :-**

कारण आमचे ठराव चांगले असतात म्हणून ते विरोध करु शकत नाही. आमचे ठराव फार चांगले असतात.

**मिलन पाटील :-**

प्रत्येक वेळेला ते आमच्या बरोबर खेळीमेळीने प्रत्येक विभागामध्ये असतात. आम्ही जेवायलासुध्दा एकत्र असतो. परंतु, सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांच्यावर काहीतरी दडपण आहे. म्हणून ते त्या दडपणापोटी असे वागत आहेत व त्यांनी अनुमोदन दिलेले आहे ही सत्य परिस्थिती आहे आणि ते आपण टेप वाजवून बघा. परंतु, त्यांच्यावर दडपण आहे ते दडपणाखाली आहेत म्हणून आज ते विरोध करत आहेत.

**गजानन भोईर :-**

मी कोणाच्याही दडपणखाली नाही.

**मिलन पाटील :-**

ह्यांना पुढच्या सभेलाही आम्हाला सहकार्य करायचे आहे तर त्यांनी असे काही चूक करु नये आणि त्यांनी चांगले बजेट ह्या गावाच्या विकासाकरीता समर्थन करायला पाहीजे आणि इतके उत्कृष्ठ बजेट बनवलेले आहे आणि त्यांनीसुध्दा मान्य केलेले आहे.

**गजानन भोईर :-**

बजेटला आमचा विरोध नाही. आमच्या मिरा-भाईंदर शहराचा विकास झाला पाहीजे पण बजेट करीता जे अनुमोदन घेतलेले आहे ते चूकीचे घेतलेले आहे. एखाद्या सत्ताधारी पक्षाच्या सदस्याच्या अनुमोदन घ्या.

**मिलन पाटील :-**

आज स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे साहेबांच्या कारकीर्दीमध्ये इतके उत्कृष्ठ बजेट झालेले आहे आणि सार्वभौम सर्वांचा विचार घेऊन, आम्ही त्यांनासुध्दा विचारले तुमचे काय प्रश्न असतील, तुमच्या काही अडी-अडचणी आहेत ते आपण मांडा आणि त्यांच्या अडी-अडचणींचे जे सुझाव असतील ते सुझाव घेऊनच आम्ही हे सर्व मान्य केलेले आहे आणि ऐवढे खेळीमेळीचे वातावरण असताना सन्मा. सदस्य गजानन भोईर हे एकदम कोलाटणी मारतील हे आम्हाला माहीत नव्हते.

**गजानन भोईर :-**

कोलाटणी मारणार नाही. कोलाटणी मारण्याचा आमचा कुठेही विचार नाही. शहराच्या विकासाला आमचा कुठेही विरोध नाही. पण जी पध्दत आणलेली आहे ती चूकीची आहे.

**मिलन पाटील :-**

आम्हाला आतापर्यंत त्यांच्यावर भरपूर विश्वास आहे आणि आजसुध्दा भरोसा आहे. त्यांना तुम्ही वेगळे घ्या. ते आज दडपणाखाली आहे हे जरुर आहे. गावाच्या विकासाकरीता आपण अजिबात ह्याच्यावर खो घालु नका. हे चांगले बजेट आहे आणि तुमच्या सुचना आम्ही मान्य केलेल्या आहेत आणि तुमच्या सुचना मान्य करुन बजेटमध्ये तरतुदी करुन, होऊन हे बजेट इतके सुंदर बनवलेले असताना आपण कालीमा लावू नका.

**गजानन भोईर :-**

अनुमोदन म्हणून आमचे नाव घेऊ नका. ह्यांची नावे घ्या.

**मिलन पाटील :-**

गावामध्ये ह्याचा संदेश वेगळा जाईल. तर आपण गावाच्या विकासाच्या आड आहात. गावात हा मॅसेज वेगळा जाईल ह्याची तुम्ही दखल घ्या. आणि सन्मा. सदस्य गजानन भोईर आपल्याला पुन्हा एकदा विनंती करतो की, ह्याच्यावर आपण पूर्ण विचार करा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य, सन्मा. स्थायी समिती सभापतींनी अंदाजपत्रक सादर करताना कृपया त्यांचे निवेदनाकरीता ते वक्तव्य करत आहेत. त्यांना आपण कृपया संधी द्यावी. त्यांनी अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

**महेंद्रसिंग चव्हाण :-**

मा. महापौर मॅडम, हमे बोलनेका मौका दिजीए यह आम सभा है। महापौर महोदया स्थायी समितीने पास किया हुआ बजेट आज आम सभा मे रखा गया है। हम नगरसेवको को बोलनेका मौका दिया जाए। स्थायी समितीकी लढाई यहा करनेके बाद........

**जोजफ घोन्यालवीस :-**

मा. महापौर साहेबा, बजेट जेव्हा बेकायदेशीर ठरते तेव्हा अशी भाषा करण्याची गरज नाही. पहिले आमचा स्थगन प्रस्ताव आहे तो घेण्यात यावा. ह्याच्यावर चर्चा करण्याची काही एक गरज नाही. हे बेकायदेशीर बजेट आहे असे आमचे मत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब जे बोलले त्याचा खुलासा करु द्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, हा एवढा विषय सुचक आणि अनुमोदनासाठी आपण घेत आहोत. पण विषयावर अजुन चर्चा बाकी आहे. आपण ह्याच्यावर निर्णय घ्या आणि विषयाला पुढे सुरुवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा आम्ही तुमच्याकडे स्थगन प्रस्ताव ठेवायची मागणी केली तर आपण मागणी का ऐकत नाही.

(स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे ह्यांनी निवेदनाचे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या स्थगन प्रस्तावाचे काय झाले? त्याला पहिले आपण उत्तर द्या. नंतर पुढची कामे सुरु करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्थायी समितीचे सभापती जे निवेदन वाचत आहेत ते चुकीचे आहे. ठरावाला अजुन अनुमोदन झालेले नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सभागृहामध्ये सन्मा. स्थायी समितीचे सभापती वगळून कृपया सदस्यांनी खाली बसावे. स्थायी समिती सभापती हे त्यांचे मनोगत व्यक्त करीत आहेत. कृपया संबंधित सदस्यांनी खाली बसावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्हाला दोन मिनिटे बोलू द्या. आम्हाला बोलायचा मौका द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य आपके स्थगन प्रस्ताव के बारेमे मा. महापौर मॅडम रुलिंग देंगे तब तक आप स्थायी समिति के सभापती सभागृह मे मनोगत व्यक्त करेंगे.

**मा. उपमहापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, आपण जो स्थगन प्रस्ताव सादर केलेला आहे, तो सन्मा. सदस्य रोहीदास पाटील साहेब ह्यांच्या पत्रावर सादर केलेला आहे. सन्मा. सदस्य रोहीदास पाटील साहेब येथे उपस्थित नाहीत. स्थगन प्रस्तावाच्या बाबतीत उपलब्ध असलेला नियम आपल्याला सांगतोय तो ऐका आणि मग आपले पुढील निवेदन करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही दुसरी सही केलेली आहे. खाली सही केलेली आहे. आम्ही सही केलेली आहे अनुमोदक आणि सुचक म्हणून. तसे नाही.

**मा. उपमहापौर :-**

परवानगी घेण्याची वेळ व कार्य करता नियम २(ट) अन्वये प्रस्ताव मांडण्याची........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण दुसरा नियम वाचा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य आपण ऐकून घ्या. पिठासीन अधिकारी म्हणून मी बोलत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही खोटं लिहीलेले आहे. अनुमोदक खोट लिहले आहे त्याचा अगोदर खुलासा करा. तुम्ही अनुमोदन देऊन खुलासा करा. तुम्ही खोट लिहीले आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपण फार हुषार आहात, आपल्याला बोलायची संधी मिळेल तेव्हा आपण बोला. आपण स्थगन प्रस्तावाचे नियम ऐका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण सांगा आमचा स्थगन प्रस्ताव घ्यायचा नाही, तर घेऊ नका.

**मा. उपमहापौर :-**

स्थगन प्रस्तावात स्पेसिफिक नियम आहे. महानगरपालिकेची परवानगी घ्यावयाची असेल त्या सभेत प्रारंभ होण्याच्या कमीतकमी दोन तास आधी लेखी निवेदन महापौर, आयुक्त व महापालिका सचिव ह्यांच्याकडे सुपुर्द करुन व सभेस प्रारंभ होण्यापूर्वी नियोजित.......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कोणाताही स्थगन प्रस्ताव सभा सुरु होण्यापूर्वी सभागृहात मांडता येतो.

**मा. उपमहापौर :-**

आपल्याला जर असे वाटते का, स्थायी समितीमध्ये अनुमोदन देण्यासाठी आपल्या पक्षाच्या सदस्याशिवाय दुसरा कोणताही सदस्य नव्हता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा, नव्हता. म्हणून अनुमोदन दिले नाही.

**मा. उपमहापौर :-**

शहराच्या हितामध्ये तुमचा हात असला पाहिजे असे वाटत नाही का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

फसवणूक केलेली आहे.

**गजानन भोईर :-**

आमच्या पत्राचे उत्तरही दिले नव्हते. मी तीन दिवस झाल्यापासून.....

**मा. उपमहापौर :-**

एवढी फसवणूक करण्यासारखे त्याच्यात चुकीचे काहीही नाही. हे सर्व कागदपत्र छापलेले आहे. याच्यामध्ये काही चुक आहे का? आपण कसला हट्ट करतोय याची जाणीव ठेवा. कोणत्या विषयाकरीता लढाई करतो, या शहराच्या विकासाच्या बजेटवर आपण लढाई करता. म्हणजे विकासात आपले योगदान काहीच नाही का?

**जेम्स कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौर यांनी ज्या सुचना केल्या, जे तंतोतंत कायद्यावर बोट ठेवून आम्हाला कायदे शिकवण्याचा प्रयत्न केला. मी सभागृहाला असे विचारतो की, जर स्थायी समितीने बजेटची पुर्तता केली नसेल. जो मंजूरीचा ठराव आलेला आहे त्याच्यावर अनुमोदन म्हणून सही नसेल तर ती पुर्तता अपूर्ण आहे. हा सुध्दा कायदा आहे. तुम्ही आम्हाला जो कायदा शिकवता की, दोन तास आधी.......

**लिओ कोलासो :-**

टाळ्या वाजवण्याचे कारण नाही. मा. महापौर साहेबा मी आपल्या परवानगीने बोलू इच्छितो.

**जेम्स कोलासो :-**

आम्हाला त्या ठरावाची प्रत दाखववी. त्या ठरावावर अनुमोदन म्हणून कोणाची सही आहे. ठरावावर सही झालेली नाही. म्हणजे स्थायी समितीने तो प्रस्ताव मंजूर केलेला नाही.

**लिओ कोलासो :-**

सत्तारुढ पक्षाला या विषयावर बोलू द्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सत्ताधारी हमेशा बोलते है। मगर इनकी सही बात तो सुनो।

**जेम्स कोलासो :-**

ज्या अर्थी ठरावावर सही झालेली नाही. त्या अर्थी हे बेकायदेशीर आहे.

**लिओ कोलासो :-**

हे जे बोलले आहेत त्यावर आम्हाला आता सत्ताधारी पक्षाला तोंड उघडावे लागणार आहे. म्हणून मा. महापौर साहेबा आम्हाला बोलण्याची परवानगी द्यावी.

**जेम्स कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, ज्या ठरावाची पुर्तता झाली नाही......

**महेंद्रसिंग चव्हाण :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्य गजानन भोईर स्वेच्छा से ऐसा कर रहे है या किसीके दबाव मे आके कर रहे है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी दिलेला स्थगन प्रस्ताव सभेच्या अगोदर देण्याचे नियमात असतानाही वेळे अभावी आल्यामुळे हा ठराव फेटाळण्यात येत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही सर्व सभात्याग करीत आहोत.

**लिओ कोलासो :-**

आता हे सदस्य वॉक आऊट करत आहेत. कारण ह्या बजेटमध्ये चांगल्या चांगल्या गोष्टी आहेत ते ह्या सदस्यांना नको आहे. म्हणून हे लोक वॉक आऊट करणार होते हे शनिवारीच जाहिर झाले होते.

**शरद पाटील :-**

ही सभा कायदेशीर नसल्यामुळे आम्ही सभात्याग करत आहोत.

(बीजेपीच्या सर्व सदस्यांनी दुपारी ठिक १२:३० वाजता सभात्याग केला.)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. सदर स्थायी समितीच्या बजेटच्या सभेमध्ये झालेल्या काही चर्चेच्या संदर्भात बऱ्याचश्या सन्मा. सदस्यांनी ह्याच्यावर आपली मते मांडलेली आहेत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, एक औचित्याचा मुद्दा आहे की, कॉंग्रेसची संख्या वाढलेली आहे. आपण विचार करत नाही. आपण आता तिघे जणच सभागृहामध्ये राहिलेले आहोत.

(सन्मा. स्थायी समिती सभापती ह्यांनी निवेदनाचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदरच्या शहरासाठी या नागरिकांना मला काही द्यायचे ते बोलायला देत नाही म्हणून मी ह्या झालेल्या बाबींचा निषेध करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, बजेटला आमचे समर्थन आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आपल्या परवानगीने आम्हाला बोलण्याची संधी मिळावी. मी ह्यासाठीच बोलतो की, सन्मा. सदस्य रतन पाटील, स्थायी समिती सभापती हे आमचे नेते, आगरी समाजाचे नेते, मिरा भाईंदर शहराचे नेते हे बोलत असताना सन्मा. गावकरी विरोध करीत आहेत. त्यांना बोलू देत नाहीत हे मोठे आश्चर्यकारक आहे. मी मुद्दामहून, मला बजेटवर बोलायचे होते पण विरोधी पक्षही निघून गेलेला आहे. त्यामुळे बजेट शंभर टक्के पास होणार आहे. फक्त मी मा. तुळशीदास म्हात्रे साहेबांचे अभिनंदन करतो ते ह्यासाठी की, शहराच्या जडणघडणीमध्ये, या शहराच्या उभारणीमध्ये काँग्रेस पक्षाचे नेते आणि आमचे सहकारी म्हणून म्हात्रे साहेबांनी या शहरासाठी भरपुर केलेले आहे आणि एक चांगले बजेट या शहराला दिलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानुन अभिनंदन करतो.

**तुळशीदास म्हात्रे :-**

धन्यवाद.

**मा. नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, हे सगळे विषय बजेट संदर्भात आहेत म्हणून मी एकत्रीत वाचन करीत आहे.

(मा. नगरसचिवांनी प्रकरण क्र. १००, १०१, १०२, १०३, १०४ व १०५ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, बजेटवर आपली बरीचशी चर्चा झालेली आहे. त्याचेसुध्दा ठराव आपण घ्या. कारण आपण स्थायी समितीमध्ये चर्चा करताना महापालिकेचे उत्पन्न कशापध्दतीने वाढावे अशापध्दतीने आपली जी चर्चा झालेली आहे. त्याचासुध्दा ठराव आपण घ्या आणि ह्याच्यामध्ये नमुद करुन घ्या की, मिरा भाईंदरचे उत्पन्न वाढवणाऱ्या बाबींवर लक्ष द्या. तसे त्याच्यात नमुद करा. फक्त हे तर आहेतच त्याच्यबरोबर आपण चर्चेअंती जे झालेले आहे व ज्या विषयावर चर्चा केलेली आहे तेसुध्दा ह्याच्यात नमुद व्हायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. महापौर महोदया, मिरा भाईंदर महापालिकेचा अर्थसंकल्प सन्मा. सभापती तुळशीदास म्हात्रे साहेब ह्यांनी याठिकाणी सर्वसाधारण सभेसमोर मांडलेले आहे. सभापती ह्या नात्याने सर्व स्थायी समिती सदस्यांना एकत्र घेऊन त्यांनी आपले सर्व प्रस्ताव ह्याच्यामध्ये नमुद करुन घेतलेले आहे. विशेष करुन या शहरामध्ये अतिशय महत्वाचा प्रश्न होता भुमिगत गटार योजना. कारण त्यादिवशी सन्मा. आदरणीय महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील (आबा) या ठिकाणी आले होते. आल्यानंतर त्यांनी या शहरामध्ये एका कारणामुळे हॉस्पीटलमध्ये गेले. बालमजुराचे प्रकरण येथे झाले होते. त्या पाहणीसाठी ते हॉस्पीटलला गेले होते. त्यावेळी अशी चर्चा झाली की, या शहराची लोकसंख्या किती आहे? कारण या शहरामध्ये जो मच्छरांचा प्रादुर्भाव जाणवला आहे. मच्छर अतिशय प्रमाणात जाणवते. तर त्यांनी सांगितले की, ह्या शहराची लोकसंख्या किती आहे? तर या शहराची अंदाजित लोकसंख्या साडेसात लाख धरली आणि एवढे साडेसात लाख लोकसंख्येचे शहर असताना या ठिकाणी ओपन गटार आपल्याकडे आहे आणि भुमिगत गटार योजना नाही. तसे असतानासुध्दा आपण या शहराचा कारभार कोणत्या पध्दतीने करता? आम्ही त्यांना सांगितले की आमच्याकडे बजेटचा अभाव आहे. आमच्याकडे बजेट नाही आणि त्यामुळे आमचे जे मुळ स्त्रोत्र आहे ते आमच्या कर विभागातुन आम्हाला येते आणि ह्या सदनापुढे आम्हाला ज्यापध्दतीने लॉटरी लागली म्हणून सांगितले तरी चालेल. कारण आम्हाला जवळजवळ चाळीस कोटीचा जो जकात त्या जकातीचे आम्हाला साठ कोटी रुपये मिळाले. ते दुसऱ्या स्त्रोत्रामध्ये आम्हाला वीस कोटी रुपयाचा फायदा हा शहरवासियांना झाला. त्याच्यापरिने जे आम्हाला काही विकास कामे करायची असतील तर आम्हाला कर्ज उभारणी करुन करावे लागतात. जर ह्या शहराचे उपमुख्यमंत्री येऊन सांगत असतील तर भुमिगत गटार योजना नसतानासुध्दा या शहराची आपण आरोग्याच्या बाबतीत जी निगा ठेवतो. आपण किती चांगले काम करता असे त्यांनी नमुद केले आणि ह्यावेळी आमचे आदरणीय सभापती महोदयांनी यासाठी विशेष तरतुद ही ठेवली. मागच्या वेळेला मागच्या समितीमध्ये आपण सर्व्हेक्षण केले आणि ते सर्व्हेक्षण पूर्ण झाले. त्याच्यानंतर आपण एक अंदाजित रक्कम धरली आणि भुमिगत गटार योजनेचे काम आपण सुरु करत आहोत. त्याकरीता आपण कर्ज उभारणी आणि आपले पैसे असे दोन्ही मिळून आपण याठिकाणी भुमिगत गटार योजनेचे काम सुरु करत आहोत. म्हणजे ह्या शहरामध्ये जर सत्ताधारी पक्ष म्हणून काम करत असताना, या शहरामध्ये बजेटचा अभाव असतानासुध्दा आपण एवढी मोठी भली योजना आणण्याचा प्रयत्न केला. सब-वे ही आपण करत आहोत. नविन पाईप लाईन टाकण्याचा प्रस्ताव ही आपण केलेला आहे. नविन पाण्याची योजना आखण्याकरीता आपण त्या ठिकाणी तरतुद ठेवलेली आहे आणि जमेची बाजु अशी असताना विकास काम जे हाती घेतलेले आहे आणि सभापती महोदयांनी सर्वोतपरी सर्व सन्मा. सदस्यांना एकत्र घेऊन त्यांनी प्रत्येकाची सुचना ह्यामध्ये नमुद केलेली आहे आणि अशा पध्दतीने ह्या बजेटमध्ये कोणत्याही विकास कामाचा अभाव दिसत नाही. तत्वतः पैशाचा आभाव आहे. कारण आमच्या समोर आमचे येणारे स्त्रोत कमी आहेत. ह्याच्यामध्ये विशेष कर आम्ही या ठिकाणी

लावला. मार्गस्थ फी लावली. जे ह्या शहरातुन गाड्या जाणार आहेत. मालवाहतुक जाणार आहे. महाराष्ट्र बॉर्डर ओलांडून गुजरातच्या गाड्या ह्या ठिकाणी येत आहेत. परत येथे ठाणा सिटी आहे. तिथे ह्या गाड्या जात आहेत. त्यापोटी आपण ४ कोटी ७५ लाखाचा निधी उभा केलेला आहे. अशा पध्दतीने स्थायी समितीने परिपूर्ण सखोल अभ्यास करुन हे बजेट आपल्या समोर आणलेले आहे. त्यासाठी मी सन्मा. सभापतींचे ह्या ठिकाणी माझ्या गटाच्यावतीने मी अतिशय चांगल्या पध्दतीने माझ्या सुचना या ठिकाणी मांडलेल्या आहेत. आपण जरुर त्याचा ठराव मांडणार आहोत. जे ठराव आपल्याला मांडायला पाहिजे. आपण मार्गस्थ फी चा ही ठराव मांडणार आहोत. त्याचबरोबर विकास आकारामध्ये जमिनीमध्ये आपण जी वाढ दर्शविलेली आहे. ती आपल्याला मांडायची आहे. असे चार ते पाच ठराव आपण मांडणार आहोत. परंतु, चांगल्या पध्दतीने हे बजेट आपल्या समोर सभापती महोदयांनी आणले त्याकरीता मी सन्मा. स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे ह्यांचा या ठिकाणी बजेटकरीता अभिनंदनाचा ठराव मी मांडत आहे.

**दिनेश नलावडे :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**अभिनंदन ठराव क्र. ९२(अ) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बजेट चांगल्या पध्दतीने मा. महासभेसमोर मा. स्थायी समिती सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे ह्यांनी सादर केले. त्याकरीता मा. स्थायी समिती सभापती श्री. तुळशीदास म्हात्रे ह्यांचे ही मा. महासभा अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदया, जिस तरहसे बजेट २००६-०७ का २००५-०६ की अपेक्षा ७० करोड का अधिका दिया गया है। पुरे मिरा भाईंदर के सर्वांगीण विकास को ध्यान मे रखते हुए यह एक अपने आप मे अच्छा बजेट है। एक दो जगह मे सुझाव देना चाहता हूँ, जैसे के आपके भाषण मे बजेट है। एक-दो जगह ऐसी चुक गए। जिस मे सुधारनेकी आपसे अपेक्षा रखता हूँ। आपका स्थायी समिती का एक ठराव प्रकरण है २२१ जिसमे मालमत्ता कर जो ट्रान्सफर करनेका था। ५०० से १००० और १००० से १५०० रु. बढाया गया है। एक तरहसे यह गलत भी है ५०० का १००० किया तो ठिक है। १००० का २००० होना चाहिए। लेकीन यह वाढ अपेक्षित नही है। काफी दिनो से आपका हस्तांतरण करनेकी जो प्रक्रिया है वह बंद पडी हुई है। कम से कम उस प्रक्रिया को चालु रखे। जैसा के अभी ठाणा महानगरपालिका है। बिना किसी ऑब्जेक्शन के सारी जिम्मेदारी जो ट्रान्सफर करता है उसके उपर देके अगर ट्रान्सफर करती है तो ऐसे इतने मॅटर आपके पास पडे हुए है, इससे आपको जो इन्कम होगी वह आपके पेन्डीग पडे हुए है। जितने भी हस्तांतरण करने के मॅटर पडे हुए है उनसे आपकी इनकम हो जाएगी। तो मेरा निवेदन है की, स्थायी समिती के चेअरमनसे कृपया इसको सुधार करे ५०० रु. की जगह ५०० रु. ही रखे और १००० रु. की जगह १००० रु. ही रखे। यह मेरा सुझाव है। उम्मीद है की आप इसे ध्यान मे रखेंगे। दुसरा आपने जहा जहा भी जमा की बाजु जो भी सुझाया है उसके बारे मे मै कहना चाहता हू की, कारखाने, दुकाने इन सब का चार साल से हम लोग जो इस तरहसे पिछे थे की, उन कारखानदारो को टॅक्स लगाए। यह ठराव क्र.२२१ है। यह जो एक ठराव होना था वह ठराव अभी तक पेन्डीग है लेकिन यह अभी आप जो पास कर रहे है और उस तरह का परवाना हस्तांतरण करनेका अभी तक ठराव नही आया है। मेरा आपसे सुझाव है की, कारखाने, दुकान, आर्किटेक्ट फी सब तरह के परवाने जहा आयुक्त महोदयने २५ करोड ही सुझाया है। उसकी जगह २०० करोड रुपयों का जो लक्ष रखा गया है उसे इमानदारीसे अगर किया जाए, ढंग से इन्डेपेन्डीग डिपार्टमेन्ट रखा जाए तो मार्च महिने से पहिले पहिले इस तरह के कारखानदार या आर्किटेक्ट इनसे फी वसुल करके जो आपने १७५ करोड की वाढ दिखाई है यह अपेक्षित है। इससे ज्यादा भी हो सकती है। क्योंकी यह पहलीबार काम हुआ है। कही एक दो जगह ही जहॉ आयुक्त महोदयने सुझाया उसमे आपने कम दिखाया है। बाकी सारी जगह आपकी जो वाढ है वह मुझे लगता है की, सही माने मे वाढ है। इसीतरह से खर्च के मदत से जो भुयारी गटार योजना है वह अभी तक लागू नही हूई है। उसके लिए पिछले तीन साल से लगातार नियमित बजेट का प्रोव्हिजन होता रहा है। लेकिन भुयारी गटार की जगह तीन तरह के गटर बनाने के लिए अलग से पैसा रखा गया है। वह क्या है? अगर इस सबको रोक दिया जाए और भुयारी गटर बनाने के पिछे लग जाए तो मुझे लगता है की, ५०० करोड रुपया जो अन्य गटर बनाने की बात है उसको रिपेअर करना, उनको दुबारा तोडना, दुबारा बनाना इस तरह का काम है। मुझे लगता है की, आयुक्त महोदय अगर आप कृपया उसपर

ध्यान देंगे तो जो हदे है, मद दी है तीन जगह गटर की अलग अलग वह मुझे लगा तिन्हो का टोटल लगाऐंगे तो साडे तीनसो, चारसो करोड रुपया होता है। वह सारा का सारा भुयारी गटर योजना मे लगा दिया जाए। अभी सन्मा. सदस्य मोहन पाटील साहबने बताया की, उपमुख्यमंत्री ने कहॉ की भुयारी गटर यहॉ होना चाहिए लेकिन पिछ्चे पाच साल से ऐसा मुझे लगता है की, कही कुछ हुआ नही है। दुसरा अपने शहर को तरह तरह के योजनाओसे सुंदरीकरण हो रहा है लेकिन मै फिर कहूँगा की, आयुक्त साहब ठिक है यह बजेट की वजह से यहॉपर मुझे लगता है की, इतनी सक्ती आप नही करते। बजेट बहुत कम है इसलिए वही जो पुराना ढरा है अपना, जो मुख्य अधिकारी के जमानेका वही ढरा चल रहा है। आपकी क्वॉलिटी, क्वॉंटिटी आप बढाते हो लेकिन क्वॉलिटी मे कही भी कोई भी फरक नही है। आप के ६ महिने पहिले पडे हुए स्लॅब कही जगह खाली सलिया दिखाई देते है। मुझे लगता है आपको जो डिपार्टमेन्ट है बांधकाम, इसतरफ जरासा भी कही ध्यान नही देता है, की काम कैसा है। आप तो काम नही करते, कॉन्ट्रॅक्टर के उपर क्वॉलिटी देनेवाला मुझे लगता है की, एक भी अधिकारी सक्षम नही है जो जाके घडी घडी मैने आपको पिछे बैठे हुए अपने सिटी इंजिनियरोंको कितनी बार बोला की, कमसे कम आप जाकर देखिए।मै सही बोलता हू या गलत बोलता हू? तीन महिने पहिले कितनी जगहपर गटर का स्लॅब पडा हुआ है, और वहॉ सलिया के अलावा दुसरा कुछ नही है। मिस्टर सिटी इंजिनियरने जवाब दिया की, आप मुझे घडी घडी जाने को क्यों कहते हो। तो आप एकबार तो भी जाकर देखिए की असलियत मैने क्वॉलिटी के उपर बोल रहॉ हू या गलत बोल रहॉ हू। लेकिन कही भी कुछ भी हुआ नही है। मै चाहता हू की बजेट यह चौथे साल का बजेट है। इतना सुंदर बजेट है अगर इस ढंग से अक्षर अच्छा काम किया जाए तो मुझे लगता नही की, जो अपोझिशनवाले अभी बाहर गये है इन्होने इतनी बाते सुझाई वह सब बाते आपने इसमे सम्मलित की है। उसके बावजुद भी वह अकेला आदमी गजानन भोईर जो सब लोगोने बताया स्थायी समिती मे बराबर खाते-पिते है, चाय भी बराबर पिते है। यहॉपर आकर मैने अभी कहा के सुरक्षा दिजिए। अगर उसे अलग बिठाके आप बात करते तो वह सही कहते की, मेरी आवाज टेप मे है। मैने स्वेच्छा से इसमे अनुमोदन दिया है। लेकिन इन लोगो के दबाव मे आके इन्हे एक अपनी पॉलिसी है की विरोध करीए। काम भी होने दिजीए। विरोध भी करीए। अभी चार दिन पहिले एक मोर्चा आपके सामने आया था। आप पिछले पंधरा साल से देख रहे है इनकी संख्या हमेशा निरंतर निचे की तरफ बढ रही है। लेकिन विरोध करनेका तरीका वही है। खाऐंगे-पिऐंगे सबकुछ करेंगे, हमारे साथ उठेंगे-बैठेंगे और विरोध इस तरहसे करते है जैसे उनको इनसे क्या ले लिया आपने, अनुमोदन लिया। इस ठराव के सुचक सन्मा. सदस्य मोहन पाटील है और अनुमोदक सन्मा. सदस्य गजानन भोईर है। कल तक बोल रहे थे की, ठिक है मैने अनुमोदन दिया है वह अच्छा है मेरा नाम इस जगह आया। लेकिन आज उन लोगोके दबाव मे आके इस तरह ऐसा करते है। यह गलत प्रक्रिया है। मेरा बोलने का मतलब यह है की, बजेट के विषय मे बोलना, शहर मे एक ही बार तो बजेट देते है और जब बजेट नही होता है, तो कितने बार बहुतसी विकास के कामो को हम बोलते है की बजेट मे प्रोव्हिजन नही है। बजेट मे लोकेशन हम करते है किसमे ज्यादा मत मे काम हो गया, किसमे कम हुआ। मेरा कहनेका तात्पर्य यह है की, शहर मे फिलहाल दो साल से कोईभी नया विकास का बडा काम नही हुआ है। दो साल से बडा काम वही हुआ है। आपका फ्लायओव्हर बननेसे आपकी जो ख्याती बढी है यह इन सारे शहरो मे वह आपने आप मे एक अलग अस्तित्व रखती है। मै चाहता हू की, सब पार्टीयोवालोने शिवसेना वालोनेही बोला है की, यहॉ से लेके मिरा रोड तक रोड बनना चाहिए। हमलोग उस बातो मे सब एक जगह है। आपको १०० एम.एल.डी. पाणी मिलना चाहीए। ५० एम.एल.डी. पाणी मिला और १०० एम.एल.डी. पाणी मिलना चाहिए। यहॉ पर जनता दरबार बराबर लगता है। जनता दरबार का काम १०० एम.एल.डी. पाणी इस शहर को नही मिलेगा। इस गर्मीमे तो चलेगा लेकिन अगले गर्मी मे आप को तकलीफ हो जाएगी। मेरा कहने का तात्पर्य यह है की, १०० एम.एल.डी. पाणी के पिछे इस बजेट मे सबसे पहले प्रायोरीटी होनी चाहिए की किसीभी तरह यह अक्टूबर तक १०० एम.एल.डी. पाणी मिले। दुसरा जो आपके लिंक रोड जो पडे है जो ईस्ट मे घोडबंदर तक का रोड है। भाईंदर वेस्ट मे मिरा रोड स्टेशन तक कम से कम रोड को आप डेव्हलप करीए। स्टेशन का बायपास इधर मिलाईये यह जो तीन रोड हमलोगो ने इलेक्शन होने से पूर्व सभी पार्टीयोने आने अपने भाषण मे बोला था की, हम यह करके देंगे लेकिन उस तरफ किसी का ध्यान नही है। बजेट आपका जरुर है। साडेसातसौ करोड रुपये बांधकाम मे देते है। आयुक्त महोदय, बांधकाम मे ऐसा मेला लगा रहता है कम से कम आप उसपर ध्यान दिजिए। मुझे लगा आप शिर्डी से आए है। शिर्डी मे एकबार देखा था सब रोड चौडी कर दी गई है। लेकिन मुझे लगता है की यहॉपर काई भी चमत्कार अभीतक कमिशनर साहबने किया नही। मै आपसे निवेदन करना चाहता हू की, इस शहर को यह जो गलत काम हो रहा है इनको अंबार न लग जाए। यह उल्हानगर न बन जाए। यह कही कोई दुसरी भिवंडी न बन जाए। इसलिए मेहरबानी करके आप अपने पद का उपयोग करीए और यहा जो गलत काम जो एफ.एस.आय. फ्लटींग हो रही है। जो दुनिया का काम हो रहा है। एफ.एस.आय. थोडी है। तीन माले की बिल्डीग है वहॉ सात माले की बिल्डींग बनाई जा रही है। वहॉ पे बोर्ड लगा दिये जा रहे है। इधर बाजु मे छोडना है सोला फिट या नौ फिट इधर दिखा दिया नकाशे मे बारा फिट उधर दुसरी तरफ काम चालु है। इस तरह टाऊन प्लानिंग (टी.पी.) आपका झिरो है। टाऊन प्लानिंग का कोई भी काम नही है।

कही भी एफ.एस.आय. रोकते नही। आप बजेट मे सौ करोड रुपये टाऊन प्लानिंग का आप रखेंगे तो मुझे लगता है की, साल मे आपका यह काम भी रुक जाएगा। अनधिकृत बांधकाम रुक जाएगा और शहर सुंदर बन जाएगा। लेकिन ऐसा कुछ भी नही हो रहा है। आर.एन.पी. देखीए दुसरी तरफ देखीए जहॉ कही भी देखेंगे, गावठण मे देखीए तीन-तीन माले की बिल्डींग, चार-चार माले की बिल्डींग बन रही है। सुविधा देना अलग चीज है लेकिन गलत काम को संरक्षण देना अलग है। कल को ऐसा नही है की, आपका नाम नही होगा, आपका नाम भी याद किया जाएगा की श्री. सुदामराव गायकवाड थे तब वह बडे शांतप्रीय थे। कभी किसको उन्होने चेक नही किया। जो हो रहा है वह होने दिया। ऐसा न हो। मै आप पर आक्षेप नही करता। यहॉ के अधिकारी कभी-कभी चेतते है। चेतते है तो अच्छा काम भी करते है और अच्छे काम का नतीजा यह है की, मिरा भाईंदर मे जितने लोग ऑब्जेक्शन करते है, मै कहुंगा आज मिरा रोड का मैने खुद काम देखा, मुझे जरासा भी हिचक नही है के मा. मुझफ्फर हुसैनजी ने इतना बढीया काम किया। एक स्मशान बना दिया गया। सारे बाहर के लोग देखते है। यह कौनसा आदमी है जिसने यह स्मशान बनाया है। सारे लोग सात नही आठ-आठ, नौ-नौ स्मशान बनाए। चाहे विधायक फंड लगाया, चाहे कुछ भी लगाया, चाहे महानगरपालिका देखते है लेकिन वह ऐसा काम कर दिया। उस आदमी ने और अपना और अपना नाम अमर कर लिया। ऐसे बहुत से काम है। ऐसे बहुतसे नगरसेवक काम करना चाहते है। आदरणीय गिल्बर्टजी मेन्डोंसा साहबजीने भी इस शहर मे इतना काम किया। जरुरत से ज्यादा काम किया। आज हर आदमी उनके नाम को याद करता है। बशर्त है की, यहा के आयुक्त महोदय पहिले मुख्याधिकारी थे और आज आयुक्त के पद पर है। आयुक्त के पद की गर्मा कितनी होती है। यह हमने अभी ठाणा महानगरपालिका मे जो आयुक्त आये थे उन्हके कलापोसे देखा है। मै आक्षेप नही करना चाहता हू। मै यह बताना नही चाहता था लेकिन बजेट एक ऐसा मौका होता है सालभर मे एक बार आता है। आज स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रेजी है उन्होने सत्तर करोड रुपये एकदम बढा दिए। बढानेके जो तरीके है वह भी सुझाए है, वह भी काई गलत नही है। होन चाहीए। आज रोडपे हमने करोडो रुपये लगाके सडक बनाई है और दुसरे लोग इसका वापर कर रहे है। उनसे हम टॅक्स नही ले रहे है। क्यो टॅक्स नही ले रहे है? यह गलत है। हमको टॅक्स लेना चाहिए। उससे हमारे शहर की इनकम हो। ऐसी बहुतसी मद है जिनसे आपने जो बढानेका सुझाव दिए है वही सही है। आपके कारखाने, सारे के सारे पडे है उनसे कोई फी नही ली जा रही है। उनसे कोई टॅक्स रिन्ह्युवल बारा महिने मे नही होता है। अगर उनको आप विधवत रुपसे बढाऐंगे तो उनको तकलीफ भी नही होगी और वह ऐसा भी अपने यहा इकठ्ठा हो जाएगा। यह एक साल का बजेट और अंतिम होगा। अंतिम बजेट से पहिले पहिले यह तीन काम इस शहर को आपने दे दिए। चौपाटी का सुंदरीकरण पेन्डीग पडा है। सन २००२ से एकसो करोड मिट्टी डालने का पास किया लेकिन आजतक टाऊन प्लानिंग उसकी क्लीअरन्स नही ले पाया। वह टेन्डर वैसे के वैसा पडा हुआ है। मेरे कहनेका मतलब यह है की, शहर को आप दिखाऐंगे नही तो यह आपका ३५२ करोड का ३५३ करोड करोड का बजेट है वह किस काम का? खाली गटर मे पैसा डालनेका। मैने तो एकबार कहा था की, नगरसेवक निधी - अगर नगरसेवक चाहे तो हर चीज एक मोनोमेन्ट अपने अपने एरिया मे बनाए। लेकिन वह भी सब गटर मे या रोड मे पैसा डाल देते है। मेरा एक सुझाव था, की सब एक-एक मोनोमेन्ट बनाईए तो कम से कम बोलेंगे की, यह कौनसे साहब है। सन्मा. सदस्य नरेंद्र मेहताजी ने एक बढीया सी चीज बनाई आपका नाम लोग याद करेंगे। मैने यह भी सुझाव दिया था की, मा. महापौर मॅडम के केबिन मे एक-एक मोनोमेन्ट ला के टांगीए की, आपने नगरसेवक निधी से क्या काम किया? लेकिन नगरसेवक निधी गटर मे डाल दी जाती है।

**आसिफ शेख :-**

वह स्वेच्छा निधी है ना।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मै क्या गलत बोल रहा हू? ऐसा नही है, नगरसेवक निधी से अपने वॉर्ड को सुंदर करनेके लिए अच्छा कोईभी आयटम बनानेका काम है। चाहे हो गार्डन हो, चाहे फव्वारा लगाईए, चाहे प्याऊ लगाईए, चाहे इस तरहका काम करिए। लेकिन ऐसा इस शहर मे नही हो रहा है और कही तरह से आप लोग अधिकारी भी आँखे बंद कर लेते है की, ठिक है हो रहा है। उन साहब का नगरसेवक निधी है। ठिक है, जाने दिजीए, वह अपना काम कर लेंगे। ऐस नही होता है। सरकार का पैसा है। विधायक कही पैसा लगाता, आमदार पैसा लगाता है, सांसद पैसा लगाता है कितना हंगामा वह चल रहा है की, सांसद कहा पैसे वापरते है? इस तरहका काम न हो। यहापर आयुक्त महोदय इस तरहसे आँख मुंध लेनेसे शहर का विकास नही होता है। कुछ करना पडता है। कही बार हम लोग नाम लेते है श्री. शिवमुर्ती नाईक का वह नाम गलत नही लेते है। कभी-कभी याद करते है। कही ना कही वह कडक थे। कही जो फैसले थे वहा हम लोगोको भी बोलते की, यह तो मुझे करना है, टॅक्स वसुल करना है हमने दिया। मुझे डर लगता था की, पहिले टॅक्स दु उसके बाद मे डिस्कशन करु। ऐसी बहुतसी चीजे है। शहरको आप जब तक कुछ देंगे नही तो शहर आपको कभी भी याद नही करेगा। मेरा निवेदन है की बजेट का ढाचा काफी अच्छा है। बहुत अच्छा है। सबके लिए मौका है। मुझे लगता है की बहुतसे नगरसेवकोंके पास तो काम ही नही बचा। मै सच बताता हू मेरा वॉर्ड मे ऐसा कोई

काम नही है। सन्मा. सदस्या रिटा शाहजी सभा मे है। सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील, रिटा शाह और मै हम सबने इतने काम करा लिए है की कोई काम हमारे वॉर्ड मे बचा नही है। मै बता रहा हू हम तीन नगरसेवक को खडा करिए। सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील, सन्मा. सदस्या रिटा शाह को पुछीए। हमारे सारे काम पुरे हो गये है। सन्मा. सदस्या रिटा शाह को पुछीए की कितने काम उनके वॉर्ड के हुए है। सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील साहबको पुछीए कितने काम हुए है। हम तीन लोगोने मिलके अपने वॉर्ड के पुरा काम करालिए है। हमारे वॉर्ड के गार्डन आके देखीए मै आपको इनव्हाईट करता हु की, आप हमारे यहाके गार्डन देखीए। कभी भी आईए आपको वहा चाय-पानी मिलेगी और देखीए कैसा विकास हुआ है। आयुक्त महोदय मेरा अपसे निवेदन है की, आयुक्त जैसी गर्मा होनी चाहीए। मेरे बोलनेका यह मतलब है की, अगर मेरे बोलनेसे कही काई काम बनाते हो तो अच्छी बात है। अगर आप कही भुल कर रहे हो, आज मुझे लगा की बजेट अच्छा बना। क्यो अच्छा बना? आज हमे आगे बढना है। आज शहरका विकास है। आज यह ५०० करोड या ८०० करोड बजेट नही होगा तो अगलेबार आप चुनके आओगे। आप को सात हजार की तनखा नही मिलेगी। बजेट के उपर आपको फायदा है। बजेट के उपर बहुतसी सुविधा मिलती है। अभी डायरी की बात निकली सच बताता हु, मुझे पता भी नही की डायरी महानगरपालिका मे छपी है या नही। मेरे जैसा नगरसेवक जो १९८४ से यहा निरंतर आता है। और मुझे पता नही डायरी कहा है? किसके पास डायरी है? अभी तक मुझे डायरी नही मिली है। मुझे पुछा भी नही गया। डायरी कैसी होती है मै नही जानता। मेरा बोलनेका तात्पर्य यही है की, हम ज्यादा से ज्यादा लोगो की तारीफ सुने, शहर का काम अच्छा हो और आज शहर की तारीफ होती है। कम से कम श्रेय किसको जाता है। आप सबको जाता है। गालिया पडती है, बोलते है वह सब नगरसेवक बेकार है। उसमे मै भी आता हु।

**परशुराम पाटील :-**

चांगलेपण करतोय आणि गाली पण खातो.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आज कुछ भी हो, अधिकारी तो खाने चीज है और वह खाऐंगे ही। लेकिन खाने के साथ काम भी अच्छा करे। कही ना कही तो हम उनको रोके। आज मै बताऊ शुरु मे यहा के बहुत अच्छी स्कीम लगाई थी, जिसमे आपके बजेट का प्रायोजन था। कुत्तो को पकडके उनको सलाईज करना लेकिन मुझे लगता है वह स्कीम बराबर नही चल रही है। आयुक्त महोदय, कही ना कही गडबड-झंजट मे पडी फेल हो गई है। आज कुत्ते डबल दुसरे एरिया के भी लाकर छोड दिए गये। सबसे ज्यादा मैने बोला लकिन मेरे ही एरिया मे कुत्ते ज्यादा भर दिये है। लेकिन कोई भी काम अच्छा नही हुआ। मुझे बोलते हुए ठिक नही लगता है। एक बार बोलना चाहीए। दस बार बोलु तो अच्छा लगता। आपकी दवाईका प्रोव्हिजन आपने लिखा है दो का एक करोड, वहा तीन करोड बढा लिया है। आप चेक करिए आप मच्छरोको पालने के लिए दवाई मंगा रहे है? एक बार अच्छा काम करिए। एक बार यहा पर पिछले चार महिने पहिले दवाई एक बार अच्छी तरह छिडकी गई। सारे गटर के कॉक्रज जाके रोड पर मरे। सारी पब्लिक ने कहा की, चौहाण साहब वह दवाई बहुत अच्छी है। वह दवाई दुबारा आयी नही। कर्मचारी बोलता है की, साहब हम क्या करे? हमे यही मिलता है। केरोसिन मिलता है, दवाई नही मिलती, दवाई मिलाता है पानी मे। यह पुरे भाईंदर की बात है। सन्मा. सदस्य आप विरोधी पक्ष से हो, आप क्या करते हो? बोलिये ना? आप चुप बैठे रहोगे, आप शहर के साथ गलत कर रहे हो, आप कुछ बोलिए। कुछ काम करिए ना। अच्छा काम करोगे तो दुनिया याद करेगी। नही तो बोलेंगे की, विरोधी पक्ष रहे, आप रहे पक्ष मे लेकिन विरोधी रहे। लेकिन कहनेका मतलब आज अधिकारीयोंके तारीफ के बिना मै नही रह सकता हु। जहा जहा वह लोग काम करते है, वहा अच्छा करते है। एक्स चेकर उनके उपर रहता है। मेरे जैसे के साथ अच्छे है। आप गलत है तो आप के साथ गलत भी है। अच्छा बनके अधिकारीयोंके पास जाईए, अधिकारी आपको अच्छी तरह ट्रीट करेंगे और काम भी करेंगे। मुझे तो अधिकारीयों से काई भी शिकायत नही है। मेरे आदमीयोंको भी अधिकारीयों से शिकायत नही है। अधिकारी अच्छा काम करते है। लेकिन आयुक्त महोदय इस ढिलाई से काम इस शहर मे नही चलनेवाला है। आप का बजेट ३५२ करोड का है। आप इस शहर को कुछ देके जाईए। कोई सुंदर चीज के लिए मैने तीन प्रपोझल दिए। शिवार गार्डन तीन टेन्डर पास हुए लेकिन आज तक शिवार गार्डन मे काम चालु नही हुआ।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण किती, कोणाला वेळ देणार? मागच्या वेळेला प्रत्येक पक्षाला तुम्ही वेळ दिला होता. ही जर सभा अशी चालवायची असेल तर १.०० वाजेपर्यंत आपला अर्धा दिवस गेलेला आहे. प्रत्येक पक्षाला बोलायला आपण वेळ द्यायचा आहे. आमचा एकही सदस्य स्थायी समितीमध्ये नाही. हे आपण लक्षात घ्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह जनरल बॉडी सभा है। यहा नगरसेवक को अपना मत देना का अधिकार है।

**मिलन म्हात्रे :-**

प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकाला आपण बोलायला ठराविक वेळ दिलेला आहे. आम्ही गप्प बसलो ह्याचा अर्थ असा नाही की, कोणीही उठून बडबड करायची. ह्याच्या भाषणाला काय अर्थ आहे का? एकीकडे टिका करतात आणि एकीकडे अधिकाऱ्यांची स्तुती करतात.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

बजेट अपने आप मे पूर्ण बजेट है।

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, बाकीच्या सदस्यांनाही बोलायचे आहे. अर्धा अर्धा तास आपण बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

एकीकडे काम झालेले नाही असे बोलता. एकीकडे खराब झाले असे बोलतात. शुध्द आहे की नाही की, होळीची भांग अजून उतरली नाही?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

बजेट अपने आप मे पूर्ण बजेट है। मै स्थायी समिती सभापती तुळशीदास म्हात्रे साहब को नाम से धन्यवाद देता हू। आपने बजेट बना दिया इसकी मद का ग्यारह महिने ते आप ध्यान रखिए। अक्षर अक्षर उन्ही मदो मे काम हो, सुधार हो। शहर मे दिखाई देके यहा यह काम हुआ है। इन शब्दो के साथ धन्यवाद।

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, दोन मिनीटे आम्हालाही बोलायला द्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण प्रत्येक पक्षाच्या सदस्याला बोलायला देणार आहात की नाही? मग हे चालले आहे? प्रत्येक लेखा शिर्षकावर आपण बोलायला दिले पाहिजे.

**शुभांगी नाईक :-**

सन २००२ ते २००३, २००३ ते २००४ आणि २००५ या वर्षामध्ये सर्वसाधारण कर .....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या शुभांगह नाईक आपण बसून घ्या. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांना बोलू द्या. नंतर आपण बोला.

**मिलन म्हात्रे :-**

आपण दरवर्षीची शिस्त माडू नका.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, पण मी ह्यांच्या अगोदर पासून उभी आहे.

**मा. महापौर :-**

आपले मत मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

हे बजेट कसे बनले आहे? काय बनले आहे? ह्याची आपआपली मत आहेत. प्रत्येक पक्षाचा, प्रत्येक वर्षी असे असते. आपण सभागृहामध्ये होता. फक्त आयुक्त साहेब बदललेले आहेत व डी.एम.सी बदललेले आहेत. प्रत्येक पक्षाला तुमच्या त्या त्या लेखा शिर्षकावर बोलायला द्यायचे. उद्या जर ते बोलायला गेले तर त्यांनी पूर्ण दिवसच बोलायचे आहे. आम्हाला कॉल कशाला केला? असे नसते, तुम्ही वेळ द्या ना. सचिव तुम्हाला माहित नाही का? नियम प्रत्येक सभेला बदलतात का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला बोलायची संधी दिलेली आहे. आपण आपल्या सुचना मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

सभेच्या पहिल्या पानापासून आपण सुरु करा. आयुक्त साहेबांच्या भाषणापासून सुरुवात करा म्हणजे काम लवकर आटोपेल आणि आम्हाला आमच्या सुचना प्रत्येक पानावर पटापट मांडायच्या आहेत. बजेटमध्ये ८० करोडचे जे फुगवले आहे ते आम्हाला मांडायचे आहे. मघाशी विरोधी पक्षनेते आणि सन्मा. सदस्य जयंत पाटील बोलले आणि स्थायी समितीमध्ये आमचा सदस्य नाही. सर्व पक्षीय हा जो शब्द वापरला आहे तो कृपया मागे घ्या. तुमचे हे जे काही झाले असेल त्यात आमच्या पक्षाचा सदस्य सामील नाही आणि जे काय आम्हाला बोलायचे आहे ते आज बोलायचे आहे. आमचाही तो अधिकार आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह दुर्भाग्य है की आप बजेट मे नही हो।

**मिलन म्हात्रे :-**

दुर्भाग्य की बात छोडो। फालतु बाते आप मत करो।

**मोहन पाटील :-**

साहेब, ह्याच्यात फालतु गोष्ट कुठे आली?

**मिलन म्हात्रे :-**

मग काय बरोबर आहे. आपण त्यांच्या भाषणात काय ऐकले? भाषण काय होते ते सांगा ना. एकदा बोलतात दोन वर्षामध्ये काहीही झालेले नाही आणि परत अधिकाऱ्यांची स्तुती करतात. परत बोलतात गटारे तुटली आहेत. ह्याला काही अर्थ आहे की नाही. काहीतरी एक बोला ना. डबल ढोलकी वाजवायची राष्ट्रवादीची सवयच आहे. आणि तुम्ही तुमच्या मंत्र्यांचे बोलता तर तुमच्या पक्षाचे मंत्री आले होते तर ते तुमच्या जवळच येणार.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह दुर्भाग्य है की, यह स्थायी समिती मे सदस्य होके नही आए। जब तक यह स्थायी समिती मे थे, तब तक इन्होने क्या किया?

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे मंत्री तुमच्यावर टिका का करतात? मघाशी आयुक्त साहेबांचे जे भाषण झालेले आहे. त्यात आयुक्त साहेबांच्या भाषणामध्ये जो स्थायी समितीला ठराव दिला आणि स्थायी समितीमधुन मा. महासभेला विषय आला. तर हे संपूर्ण बजेटच फुगवून दिलेला आहे. आपण पुढच्या सभेमध्ये होणारी जी प्रोसिजर आहे ती प्रोसिजर सरळ सरळ पुढच्या सभेमध्ये करता यावी आणि केलेली आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांच्या वाक्याला आमचा आक्षेप आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अगोदर ऐका आणि नंतर आक्षेप घ्या.

**लिओ कोलासो :-**

८३ करोड रुपयांचे कर्ज आहे असे आपण सांगितलेले आहे. हे महापालिकेच्या परिसराच्या विकासासाठी आपण खर्च करणार आहोत. आपण असे बोलता तर आपण आपले शब्द मागे घ्या. आम्ही अशा स्वरुपाचा आशय सत्ताधारी पक्ष स्विकारणार नाही. आजच्या आज ठराव करुन घ्या आणि ठराव पास करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

पुरावे तुम्हाला स्विकारावेच लागणार. गेल्या दहा-बारा वर्षात आपण काय-काय केले ते सगळं आले आहे हे कागदपत्र सांगतात, मी नाही. शासनाचे आदेश होते.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, ह्यांनी आपल्याला घाबरुन सोडल होत. २८ च्या २८ नगरसेवक बरबाद होतील.

**मिलन म्हात्रे :-**

होतील, अजुनही होतील.

**लिओ कोलासो :-**

त्यांची मेंबरशीप रद्द होतील. पण ह्यांच्यानी काहीही झालेले नाही. उगाच सभागृहामध्ये काम करण्याचा आणि दम भरण्याचा प्रयत्न करतात. ह्यांच्याकडे आपण दुर्लक्ष करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

दुर्लक्ष करायला पाहिजे मग मिटींगच बंद करा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, इनको बोलनेका तरीका सिखाईए, शिस्त सिखाईए। यह बोलनेका तरीका नही है। आप इनको ऐसी परमिशन मत दिजीए।

**मिलन म्हात्रे :-**

हमे सिखानेकी जरुरत नही है।

**नयना म्हात्रे :-**

चौहाणजी आप बिघडे हुए हो। आप पहिले शिस्त सिखके आओ।

**लिओ कोलासो :-**

हे काय एवढ्या मोठी गोष्टी सांगतात. भ्रष्टाचार ह्यांच्या वार्डामध्ये आहे. त्यांच्या वार्डामध्ये किती झोपडपट्टया वाढल्या आहेत त्या बघा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेजी आपल्याला ज्या सुचना मांडायच्या आहेत त्या पान व्हाईज सुचना मांडा आणि बोलताना कोणावरही टिका करु नका.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या येथे जे अतिक्रमण झालेले आहे त्याच्यावर तुम्ही आहात. सी.आर.झेड.ची सगळी वाट तुम्ही लावलेली आहे. तुम्ही उत्तनच्या जागा विकल्या आहेत. सरकारी जागा विकली, माती विकली, दगड विकले. तुम्ही लोकांनी सगळे धंदे केले आहेत.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, परमिशन दिजीए की, कम से कम.....

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे अशा पध्दतीने बोलत असतील तर......

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी बोलत असताना आपण असे कोणालाही मधे बोलायला देऊ नका.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इनके हात मे क्या है?

**मिलन म्हात्रे :-**

है वो दिखाते है ना. आप डरते क्यो हो?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा बाकीचे सदस्य बोलायला लागल्यावर तुम्ही सगळ्यांना गप्प केले आणि आता आम्ही बोलत आहोत तर आपण त्यांना खाली बसवा.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्याकडे पुरावे आहेत. मी आपल्याला पुरावे देतो. पुराव्यानुसार बोलू या. आपण ह्यांना खाली बसवा. माझे भाषण चालू आहे. मी मधे कोणालाही बोलू देणार नाही. मी अजूनपर्यंत माझी सुचना मांडलेली नाही. आम्ही स्थायी समितीमध्ये नाही. आम्हाला सभागृहामध्ये बोलायला दिले पाहिजे. आपण ह्या दोन्ही सदस्यांना खाली बसवा. ह्यांचे बोलणे झालेले आहे. मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेबांनी हे जे पहिल्या पानावर दिलेले आहे. त्याच्यामध्ये आयुक्त साहेबांनी ज्या चर्चा केलेल्या आहेत. संपूर्णपणे भाषण यामध्ये दुसऱ्या पानामध्ये संगणकीकरणामुळे लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी नागरी सुविधा केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे लोकाभिमुख प्रशासनाची गती झपाट्याने वाढेल हे काळाच्या ओघात सर्वांच्या लक्षात येईल. आम्हाला एवढे लक्षात आलेले आहे की, संपूर्ण महाराष्ट्र राज्यशासनाच्या आपल्या व्यतिरिक्त जेवढ्या महानगरपालिका आहेत या राज्यशासनाच्या वेबसाईडवर आलेल्या आहेत आणि जवळजवळ सहा नगरपरिषद आहेत ज्या आपल्योक्षा कमी दर्जाच्या आहेत. अशा नगरपरिषद नागरी सुविधा केंद्राच्या बाबतीत महाराष्ट्र राज्यशासनाच्या संकेतस्थळ ज्याला वेबसाईड बोलतो त्याच्यावर ह्या महापालिका आलेल्या आहेत. कारण त्यांच्या कार्याचा लेख हा फार उच्च आहे. आता माझे जेवढे सहकारी बोलत होते, ह्यांची ही जी प्रगती आहे ही प्रश्नरुप संपूर्णपणे महाराष्ट्र राज्यशासनाच्या संकेतस्थळावर जाण्याकरीता गेल्या दोन आयुक्तांनी आपल्याकडे जो ढींढोरा पिटला. प्रत्येक बजेटमध्ये मोठमोठ्या गोष्टी केल्या. परंतु, आपली मिरा भाईंदर महानगरपालिका राज्यशासनाच्या संकेतस्थळावर जाऊ शकली नाही. हे आपले दुर्दैव आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मेरा आक्षेप है, ऐसा ढींढोरा दो साल मे कुछ भी नही पिटा है। शहर मे काई ढींढोरा पिटाया नही, शहर को काम करके दिखाया। यह गलत आक्षेप है। महापौरजी ऐसा बोलनेका मौका मत दिजीए। कोई ढींढोरा नही पिटा।

**मिलन म्हात्रे :-**

आप बैठो।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हम बैठे है। मा. महापौर मॅडम, आप ऐसे बोलनेकी परमिशन मत दिजीए।

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम, आपण ह्यांना गप्प बसवा. सगळ्यांच्या मधे बोलण्याचा त्यांनी ठेका घेतला आहे का?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

दो साल मे हर एक तरह का काम करके बताया है।

(सभागृहात गोंधळ)

**मिलन म्हात्रे :-**

आप लोकशाही के बारेमे बोलो। उसमे करप्शन कितना हुआ है वो बोलो ना। पंधरा लाख रुपया कल्याण-डोंबिवली महानगरपालिका खा गई उसके बारेमे बोलो ना। अपना पंधरा लाख का नुकसान हो गया है वह बोलो ना।

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य ज्यापध्दतीने बोलत आहेत तर सन्मा. सदस्य चौहाण साहेब हे त्यांच्या वडलांच्या जागी असतील.

**मिलन म्हात्रे :-**

कमिशनर का उसमे शेअर था वह बोलो ना। आपके लिडर का उसमे शेअर था वह बोलो ना। फालतु बकबक मत करो।

(सभागृहात गोधळ)

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आमचे सदस्य बोलत असताना ह्यांना कृपया खाली बसवा.

**मिलन म्हात्रे :-**

माझ्याकडे माहितीच्या अधिकाराचा कायदा आहे.

**मोहन पाटील :-**

आपल्याला आपल्या ज्या सुचना मांडायच्या आहेत त्या सुचना आपण.....

**नयना म्हात्रे :-**

ऐका ताकद असेल तर डावलता कशाला?

**मोहन पाटील :-**

आपण चुकीचे करतोय असे म्हणू नका ना. तुम्ही सुचना मांडा. आपण सुचना मांडताना हे असे मांडू नका. तुम्हाला काय मांडायचे असेल ते आपण मांडा. आपण हे नाही केले, आपण ते नाही केले तर अमुक झाले, हे कशाला पाहिजे? मा. महापौर महोदया आपण सदस्यांना असे बोलण्याची मुभा देऊ नका.

**मिलन म्हात्रे :-**

मी कायदेशीर बोलतोय.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह जो ऐसे बोल रहे है उसपर कम से कम रोक लगाईए।

**मोहन पाटील :-**

आपण आपल्य सुचना मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हालाच सर्व अधिकार दिले आहेत का? आमची सुचना आहे. आपण खाली बसा. सहन करायची ताकद ठेवा. तुम्ही सत्ताधारी आहात ना तर हे सहन करण्याची तुम्ही ताकद ठेवा.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

नियम से बोलिए ना।

**मिलन म्हात्रे :-**

मी नियमानुसारच बोलत आहे. आपण खाली बसा. मा. महापौर मॅडम, संपूर्णपणे नागरी सुविधा केंद्रामध्ये माहितीचा अधिकार आहे. हा महितीचा अधिकार केंद्राने मंजूर केलेला आहे. याचे सेक्शन ४ या चार सेक्शनमध्ये माहितीचा अधिनियम झाल्यापासुन १२० दिवसाच्या आतमध्ये सर्व महानगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत, राज्यशासन सगळ्यांनी अंमलात आणायचा आहे. या मानगरपालिकेच्या ह्या कायद्याची आपण अंमलबजावणी करायची आहे असे या विषयामध्ये स्पष्टपणे 'ग' चा ख(२) यामध्ये माहिती मिळवण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीतकमी आधार घ्यावा लागत आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर महोदया, विषयांतर होत आहे. सदस्यांना आपण विषयावर बोलायला सांगावे.

**मिलन म्हात्रे :-**

लोकांना इंटरनेट संपर्काच्या विनिसाधानातुन स्वतःहुन माहिती पुरविण्यासाठी पोटकलम १चा खंड (ख) आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशिल राहील. ह्या नियमामध्ये ही तरतुद असताना आपल्या नागरी सुविधा केंद्रामध्ये ह्याचा कुठेही उल्लेख नाही. आपले माहिती अधिकारी कोण? ह्याची नागरी सेवा केंद्रामध्ये कसलीही माहिती नाही. नामफलकसुध्दा नाही. हे जे आपले अपयश आहे. नियमानुसार जिकडे आपण कमी पडलेलो आहोत, तिथे तुम्ही ह्याच्यात काय सुधार करत असाल तर करा. नाहीतर ह्याच्यामध्ये अपील अधिकारी भरपुर आहेत. आम्ही तुमच्याकडून काय मागतोय ह्याची आपण वाट बघू नका. नसेल करायचे तर नका करु. उद्या आम्ही कमिशनरच्या विरोधात सेंट्रलच्या सचिवांकडे जाऊन तक्रार करु. काय व्हायची पनीशमेन्ट ती त्यांना होईल. शेवटी सेंट्रलचा कायदा आहे. आज संपूर्णपणे आयुक्त साहेबांनी जे भाषण दिलेले आहे ह्याच्यामध्ये प्राधान्य ज्याचे त्याला दिले आहे. घनकचरा व्यवस्थापनाचा कुठेही उल्लेख नाही. डास निर्मुलन ह्या संबंधात त्यांनी जे जे दिलेले आहे यामध्ये त्यांनी संपूर्णपणे जी माहिती दिलेली आहे. ठिक आहे, गेल्यावर्षीही हेच टिपीकल भाषण होते. ह्याच्यात काही बदल नाही आणि बदल असेल तर त्यांनी सांगावे. आमच्या संगणकीकरणामध्ये चारही वॉर्डला अजूनपर्यंत कुठलीही कनेक्टीव्हीटी नाही. ह्यात आपण अगदी यशस्वी आहोत. हे चांगले काम आहे. आता प्रभाग समिती होऊन वर्ष होत आले आहे. पण ह्या प्रभाग समितीची कार्यालये व तिथले जे काही कामकाज आहे ते आपल्या इथल्या नागरी सुविधा केंद्राला अजून कनेक्टीव्हीटी दिलेली नाही. आम्हाला आजही मिरा रोडला जावे लागते आणि मिरा रोडच्या लोकांना येथे यावे लागते. भाईंदरच्या जेवढ्या प्रभाग समित्या आहेत त्यांच्या त्या प्रभाग अध्यक्षाला आणि प्रभाग अधिकाऱ्याला जाऊन भेटावे लागत आहे. ही आपली ह्याच्यामधली ॲचीव्हमेन्ट आहे. आपण फार चांगले काम केलेले आहे. हे नागरी सुविधा केंद्र कल्याण-डोबिंवली महानगरपालिकेने

आपल्याकडून पंधरा लाख रुपये मेन्टेनन्स घेतले. ते पंधरा लाख रुपये कुठे गेले? आयुक्त म्हणतात की, झाला खर्च होऊन गेला. आता काय विचारायचे? त्यावेळचे ॲग्रीमेन्ट कोण बघणार? ही बजेटची सभा आहे. या बजेटच्या सभेमध्ये पंधरा लाख रुपये मेन्टेनन्सच्या पोटी दिले त्यचे काय झाले? हा खर्च आमच्या पैशातला आहे, करदाते नागरिकांचा आहे. त्याचे काय केले? त्याचे कमिशनर साहेबांनी उत्तर द्यायला पाहिजे आणि आता ह्याच्यापुढचे मेन्टेनन्स कोणी करायचे? ही जी वेबसाईट आपण आता बसवणार आहोत की नाही? राज्यशासनाच्या वेबसाईटवर आपली महानगरपालिका का गेली नाही? सर्व सन्मा. सदस्यांनी आता मोठमोठ्याने बोलले की, फार चांगले आहे. आम्ही भाषण वाचतो. फोटो चांगले रंगीबेरंगी काढले आहेत. पण आपली ही वेबसाईड राज्यशासनाच्या वेबसाईटवर का गेली नाही? ह्याचा प्रश्न स्थायी समितीपासून कोणी आतापर्यंत विचारला का? अजुन विचारलेला नाही. हे आमचे विचारण्याचे काम आहे. आपण कमिशनर साहेबांना याबाबत विचारावे, आपण कुठे कमी पडतोय? माझ्या वार्डामध्ये काय कामं झाली ते सोडून द्या, महापालिकेचे काय झालं ते बघा. ह्या येथे पहिल्या भाषणावर माझा स्पष्टपणे आक्षेप आहे. आयुक्त साहेबांनी ह्याचे उत्तर दिले पाहिजे. माहितीच्या अधिकाराचा ह्यामध्ये उल्लेख का नाही? आणि या सभेमध्ये आपण अंतर निर्माण का केले नाही? आणि दुसरी गोष्ट, हे जे आपले सर्व वॉर्ड ऑफिसेस आहेत. आपण जर विकास करायला बसलो तर अगदी पूर्णपणे केला पाहिजे. वॉर्ड ऑफिसर, आपल्याकडे कनेक्टीव्हीटी का झाली नाही? आम्ही तुम्हाला निधी कमी दिला आहे का? तर नाही. परंतु, हे ना ते कारण. वॉर्ड ऑफिसरचे साधे फोन नंबरसुध्दा कोणाला माहिती नाही. हा दुसरा भाग. सभापती साहेबांनी जे पुढे दुसरे भाषण दिलेले आहे त्यांच्या भाषणामध्ये अंदाजपत्रक (ब) परिवहन सेवा सुरु ठेवणेसाठी दोन कोटी रुपयाची सबसिडी देण्यात आलेली आहे. मला जरा सचिव किंवा या अंदाजपत्रकाचे तुमचे जे अधिकारी जिम्मेदार आहेत ह्यांनी, सभापतींनी सबसिडी ही दोन कोटीची सबसिडी बोललेले आहेत. तर जरा सबसिडीचा अर्थ काय आहे? तो अर्थ संपूर्णपणे समजावून सांगावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे. नंतर मी जो काही अर्थ काढलेला आहे तो सांगायला तयार आहे. सबसिडीचा अर्थ काय?

**लिओ कोलासो :-**

आपणच सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य कोलासो साहेब, मेहरबानी करुन माझ्या भाषणात तुम्ही टिंगल टवाळी करु नका.

**लिओ कोलासो :-**

हा टिंगल टवाळीचा प्रश्न नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा मी मान करतो. तुमच्या वयाचा मान करतो.

**लिओ कोलासो :-**

आम्हीसुध्दा तुमचा मान करतो.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा आपण लक्षात घ्या. मी जे बोलतोय ......

**लिओ कोलासो :-**

आम्हीसुध्दा तुमचा मान करतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुमची इच्छा आहे का, आपली महानगरपालिका शासनाच्या वेबसाईडवर जाऊ नये. असे तुमचे म्हणणे आहे का ते बोला. एस ऑर नो. कशाला आपण टिंगळ करता? तुम्हाला जे करता येत नाही ते आम्ही सांगतोय तरी. तुमची हिम्मत पण नाही तेवढे बोलायचे. लगेच तुम्हाला ॲन्टीचेंबरमध्ये पाठीत फटके पडतील. आपण आम्हाला बोलू द्या. मेहरबानी करुन टिंगल करु नका.

**लिओ कोलासो :-**

आपण हे सत्ताहीन असे बोलू नका. काहीही बोलू नका.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, येथे चुकीचे वक्तव्य चालले आहे. फटके पडणार असे बोलतात म्हणजे काय चालले आहे. बजेटची सभा चालू आहे का, काय चालू आहे?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, यह बोलना नही जानते है। इन्हे सिखाईए की कैसे बोलना चाहिए।

**मिलन म्हात्रे :-**

मला बोलू द्या. मी बोलताना मला कोणी डिस्टब करु नका. मला कोणी शिकवण्याची गरज नाही. मी जे विचारतो त्याबाबत हे जे डायसवर बसलेले आहेत ते सक्षम आहेत. ते स्थायी समितीचे सभापती आहेत. त्यांचे हे भाषण आहे. मी नाही बोलणार. पहिले त्यांनी बोलायचे मग मी बोलेल. सभागृहाचे नियम मला तुम्हाला सांगायला नको.

**लिओ कोलासो :-**

आम्हीसुध्दा सभागृहात वाट्टेल तसे ऐकणार नाही. आमच्या उपस्थितीलाही महत्व आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग आपण मधे बोलायला सुरुवात कशी केली? अन्यथा हा विषय निघाला नसता. आपण मधे मधे बडबड करु नका.

**लिओ कोलासो :-**

आपण जे बोलतात आम्ही त्याला हरकत घेत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब डायसवर बसले आहेत त्यांना अर्थ सांगावा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम चुकीचे चालले आहे. सभागृहामध्ये तुम्हाला तिथे बोलवून फटके मारणार. तर फटके मारणार कोण? आणि फटके खाणारे कोण आहेत? ते अगोदर त्यांनी सांगावे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याबाबत मला जास्ती काही बोलायचे नाही. मी जे बोलतोय तर मेहरबानी करुन माझ्यामधे कोणी बोलू नये.

**रिटा शाह :-**

जास्त का नको? तुम्ही जास्त बोलता. तुम्ही बोललात.

**लिओ कोलासो :-**

सभागृहामध्ये तुम्हाला असे जास्त बोलता येणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण बसून घ्या. आपल्याला ज्याकाही सुचना मांडायच्या आहेत त्या योग्य पध्दतीने मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

माझे भाषण चालू असताना मधे कोणालाही बोलू देऊ नका. मी कोणाला बोलत नाही.

**लिओ कोलासो :-**

हे बोलले म्हणून मी मधे बोललो.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इनपर बहिष्कार करिए। निकालनेकी बात करिए।

**मिलन म्हात्रे :-**

आपली भांडणं चालु होती तेव्हा मी काही बोलत होतो का? मी गप्प होतो. केवल एका डायरीवरुन सभागृहाचे दोन तास फुकट गेले. एक लक्षात घ्या, आम्ही गप्प आहोत ह्याचा अर्थ असा नाही. सभापती आहेत ना त्यांनी उत्तरद्यावे. हे कशाला मधे बोलतात. ह्यांना तुम्ही परमिशन दिली होती? मी सभागृहाचा मान ठेवतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्या ज्या सुचना मांडायच्या आहेत, त्या सुचना आपण पानव्हाईज मांडा. दुसऱ्याही सदस्यांना बोलण्याची संधी द्यायची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, आपण मला परमिशन दिली आणि मी बोलतोय. माझ्या भाषणामध्ये दुसऱ्या कोणत्याही सदस्याने बोलले नाही पाहिजे. सन्मा. सदस्य चौहाण साहेब ऐवढा वेळ बोलत होते तेव्हा आम्ही मधे बोललो का? मी सभापती साहेबांना प्रश्न विचारतो की सबसिडीचा अर्थ काय? त्यांनी उत्तर द्यावे. हे कशाला मधेमधे बोलतात. विषयच येणार नाही मग आम्ही कशाला बोलतो. सभापती साहेबांनी सबसिडी म्हणजे काय त्याचा खुलासा करावा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मी कोणालाही इंटरअप करत नाही किंवा एक व्यक्ती बोलत असेल तर आम्ही उठत नाही. पण मॅडम सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी हा शब्द वापरला आहे की तुम्हाला ॲन्टीचेंबरमध्ये घेऊन फटके मारतील. तर फटके मारणारा कोण? आणि फटके खाणारा कोण? हे पहिले क्लिअर करा.

**मिलन म्हात्रे :-**

ते सगळ्यांना माहित आहे. आपण खाली बसा.

**रिटा शाह :-**

आज बजेटची सभा चालु आहे. कोणाची मजाक चालु आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

मजाक बिलकुल चालु नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, इनके भाषणका अेन्ड है या नही है। दुसरे किसको बोलनेका मौका भी आप नही दे पा रही है। बोलनेका नियम है या नही है।

**मिलन म्हात्रे :-**

अभी तो मेरे भाषण का स्टार्ट है। स्थायी समिती के सभापती का जवाब आने दिजीए।

**रिटा शाह :-**

म्हणजे कोणाच्या मनात काय आहे आणि कोणी काहीही बोलायचे का?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

ॲन्टीचेंबर मे जाने तक हिम्मत नही वह किसको मारेगा?

**मिलन म्हात्रे :-**

फालतु बाते मत करो.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आपको बाते करते हुए बहोत बार देखा है।

**मिलन म्हात्रे :-**

आप किसके हिम्मत को चॅलेन्ज मत करो। समय आनेपर सग मालूम पडेगा। उस टाईम आप शहर मे रहो।

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, आपण त्यांना बोलायला किती वेळ देणार?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण रुलिंग द्या. आपले सदस्य चुकीचे शब्द वापरत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मुद्दामुन विषयाचे विषयांतर केले जाते. सभापती साहेबांना उत्तर देऊ द्या. त्यांचे उत्तर ऐकण्यासाठी मी उभा आहे. सबसिडीचा अर्थ मला समजावून सांगावे.

**मा. सभापती :-**

सबसिडीचा अर्थ सांगतो. तुम्हाला स्कुटर घ्यायची आहे आणि तुम्ही ती स्कुटर घेतली. ती स्कुटर महिनाभर चालवण्यासाठी त्याला पेट्राल लागते आणि त्या पेट्रोलचा अर्थसहाय्य देणे म्हणजे आपण बससेवा सुरू केलेली आहे. ती बससेवा सुरळीत चालली पाहिजे. आपला तोटा होईल किंवा ना तोटा होईल त्याला अर्थसहाय्य केले नाहीतर ती बससेवा बंद होईल. आपणाला नागरिकांना सुविधा द्यायच्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही फक्त एवढेच बोला तुम्हाला कळतय तर त्याचा अर्थ विचारु नका.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी असे बोललो नाही सबसिडीचा अर्थ......

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी तुम्हाला एकच प्रश्न विचारतो, तुम्हाला ह्याच्यातले काय कळत नाही असे तुम्हाला वाटते का? तुम्हाला कळते की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

मलाही कळते आणि तुम्हालाही कळते. फक्त एवढेच सांगा की, सबसिडीचा अर्थ दान आहे. सबसिडीचा अर्थ अनुदान आहे आणि ही रक्कम तुम्ही परतावा दिली आहे. ही परताव्याची रक्कम दिली आहे. हे आपण सांगा. ही तीन करोडची रक्कम आपण परत घेणार की नाही?

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर मॅडम, सबसिडी ही आता आपल्या महाराष्ट्र गर्व्हरमेंट किंवा ऑल ओव्हर इंडियाचे सर्व सबसिडी काढत चालले आहेत आणि आपण येथे देत आहात. ह्याची मला भिती वाटते.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही तेच बोलतोय. ह्याच्यामध्ये तीन करोड रुपयाचा फरक पडत आहे.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

बी.ई.एस.टी. नको एस.टी. नको. आपल्याला काही नको.

**मिलन म्हात्रे :-**

बी.ई.एस.टी. देत होते तर ह्यांनी घेतले नाही. ती फुकट देत हेती.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

एकही पैसा न घेता त्या लोकांनी जर बस चालवायची असेल तर चालवू द्या, नाहीतर बंद कराव्यात. सबसिडीचा विषयच नको. कोणालाही सबसिडी देता येणार नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स साहेब जे बोलले त्यांच्या मताशी आम्ही सहमत आहोत.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

गर्व्हरमेंट सबसिडी बंद करत आहे आणि आपण येथे सबसिडी देत चाललो आहोत. का, तर आपल्याकडे पैसे जास्त आले आहेत का?

**मिलन म्हात्रे :-**

वाद हाच आहे. तीन करोड रूपयाचा वाद आहे.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

दहा लाख रूपये खर्च करून अहवाल घेतला त्यावर त्या समितीने आपल्याला काय उत्तर दिले की, आपण बस चालवू शकत नाही. महानगरपालिका बस चालवू शकत नाही किंवा कुठलीही संस्था ही सेवा चालवू शकत नाही. ज्यांना पाहिजे तर ते भाड्याने आपण त्यांच्याकडून भाडे घेउ शकतो. आपण भाडे घ्या ना. सबसिडी कशाला देता?

**मिलन म्हात्रे :-**

आपण आपले पैसे लूटवायचे आणि त्यांनी मजा मरायची. तीन करोड रूपयाचा फ्रॉड आहे.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

आपण त्यांना पैसे कशाला देता.

**रतन पाटील :-**

हा जनतेचा पैसा आहे आणि जनतेचा पैसा लुटवायचा आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

बी.ई.एस.टी. फुकट मिळत होती.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

कसली सबसिडी?

**मिलन म्हात्रे :-**

बी.ई.एस.टी. फुकट मिळत होती. पण तत्कालिन मा. महापौर मॅडम त्यांना भेटल्या नाही.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

ह्या विषयी त्याचा विरोध मी केलेला आहे. अजुन किती माणसे ह्याचा विरोध करतील. सबसिडी देता येत नाही. त्यांच्याकडून आपण किलोमिटर मागे भाडे घेउ शकतो असे आपण त्यांना दिलेले आहे. आपण सबसिडी देउ शकत नाही.

**महेंद्रसिंग चौहान :-**

उस वक्त सभी पार्टी के सदस्य का.........

**मिलन म्हात्रे :-**

नही, नही हमारा सपोर्ट नही है। बी.ई.एस.टी. फुकट मिल रही है। आप लोगोने महानगरपालिका को नुकसान मे डाला हुआ है। बी.ई.एस.टी. फ्री मिल रही थी। बी.ई.एस.टी. के सभापती आगे भी गए थे। मगर आप लोगो ने आपके नेता के नाद मे लगके यह महापालिका को खर्चे मे और खड्डे मे डाला है। आप लोग उसके जिम्मेदार हो। गए साल का एक करोड अभी का दो करोड ऐसा आप लोगो के आने से तीन करोड रूपया का लॉस है।

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

मा. महापौर मॅडम, आपण सदर विषयावर विचार करावा. सबसिडी द्यायचे का?

**मिलन म्हात्रे :-**

सबसिडी द्यायला आमचा विरोध आहे आणि आमचा विरोध नोंदवून घ्या.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

आपण त्यांच्याकडून भाडे घेणार आहोत जर त्यांना चालवायचे नसेल तर उद्या बसेस बंद करा. प्रायव्हेट गाड्यांनी भाडे ठरवलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ती बससेवा बंद करून टाका. तुमच्यावर स्ट्रेचकॅरेट परमिटसुद्धा आलेले नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आपल्या महानगरपालिकेला जर एका महिन्यामध्ये नउ लाख रूपये नुकसान होत असेल आणि जर घराचे कोणी टॅक्स भरले नाहीत तर आपण लगेच जउन लॉक करतात म्हणजे एका बाजुने फायदा करता आणि एका बाजुने तोटा करता म्हणजे नक्की महानगरपालिकेत काय चालले आहे?

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

ह्याचा अर्थ आपण चुकीचे करता आणि परिवहनचे पैसे खिशात जातात. जर परिवहन लॉसमध्ये जाते तर ह्याचा अर्थ हा आहे. पैसे येणे आहे की, पैसे देणे आहे? देणे आहे तर मी खुल्ला आरोप करतो की, ते पैसे खिशात जाणार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

एका महिन्याला नउ लाख रूपये नुकसान आहे आणि आपल्या इथल्या लोकांचीच त्याच्यामध्ये बंदरपाठ आहे अजुन स्ट्रेचकॅरेट परमिट आलेले नाही. आर.टी.ओ चा परमिशन नाही. एखादा मोठा अपघात झाला तर प्रॉब्लेम होणार आहे. आमच्याकडे माहितीच्या अधिकारात सगळे कागदपत्र आलेले आहे. विशिष्ट वेळी आम्ही ते कागदपत्र बाहेर काढू. गेल्या वर्षी एक करोड रूपयाचे अनुदान झाले आणि ह्यावर्षी दोन करोड रूपये असे मिळून तीन करोड आणि आपण सरळ म्हणता येईल की, अनुदान दिले आहे. सबसिडीचा अर्थ काय? जी सबसिडीची रक्कम तुम्ही कधीही परत घेउ शकत नाही. ह्याच्यामध्ये परतावा आहे. नुकसान यांनी केलेले आहे. महापालिकेच्या सदस्यांचा त्यावेळीही विरोध होता. आपल्याला बी.ई.एस.टी. फुकट मिळत होती आणि पूर्ण मुंबईपर्यंत आपण जाउ शकत होतो. महापालिकेचा एक पैसा लागणार नव्हता.

**रतन पाटील :-**

त्यावेळेस काय सांगितले...........

**मिलन म्हात्रे :-**

ह्यांच्या बोलण्याला आमचे समर्थन आहे. सन्मा मॉरस रॉड्रीक्स साहेबांचा उगीच जीव जळत नाही. त्यांनी सगळे प्रयत्न केले होते. बी.ई.एस.टी. चे अध्यक्ष श्री. चेंबुरकर आले होते. संपूर्णपणे त्यांना हॉनर केले आणि त्यांच्यबरोबर आम्ही फिरलो. तीन दिवसामध्ये आपल्याकडे बी.ई.एस.टी. चालू होणार होती. फक्त महापालिकेचा एक ठराव आणि महापालिकेची एन.ओ.सी. त्यांना हवी होती. हे आपण नाकारले. इथल्या पुढाऱ्यांच्या अनाठायी हट्टामुळे ते नाकारले आणि आज आपण हे लॉस खातोय आणि ह्यापुढे सुद्धा खाउ. आपल्याकडे सी. आर. टी. चा रिपोर्ट आहे की, प्रत्येक महापालिकेची परिवहन सेवा लॉसमध्ये चालली आहे. तरी आपण ती रिस्क घेतली. त्यांच्या रिपोर्टकरिता दहा लाख रूपये आपण खर्च केले आणि परिवहनची बस सेवा सुरू झाली नाही. पाच रुपयाचे तिकिट फाडले नाही आणि सहा सात लाख रूपये तुमच्या पुढाऱ्यांच्या वाढदिवसा पाई महानगरपालिकेचे नुकसान झाले. हे चौदा लाखाचे नुकसान आपण सहन केले तर का, तुमचे पुढाऱ्याचा वाढदिवस आहे. पण लोकांनी किती सहन करायचे. आज भाडेवाढ किती आहे? पाण्याची वाढ आहे. सगळ्या गोष्टीची वाढ आहे. लाईटवाले ही हैराण करत आहेत. पुढच्या पानचे वाचन करा. मार्गस्थ फी चा हा प्रकार काय आहे? पैसे घेउन कोणाला मार्गस्थ लावणार? पावणेपाच करोड रूपये मार्गस्थ फी.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

आयुक्त साहेब, मी विचारलेल्या प्रश्नावर आपण न्याय द्यावा की, कसे काय करावे?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मेहरबानी करून ही सभा आहे आणि आम्हाला तुमच्याकडून रुलिंग पाहिजे. हे सर्व सदस्य स्थायी समितीमध्ये आहेत. मागच्या वेळेला मी जेव्हा उभा राहीलो तेव्हा मला बसवले गेले होते की, आपण स्थायी समितीचे सदस्य आहात त्यामुळे आपण ह्याच्यावर भाष्य करू नये. त्यावेळी हे सन्मा. सभागृह नेते लिओ कोलासो साहेब असताना त्यांनी मला सांगितलेले आहे. त्यामुळे जे सदस्य स्थायीमध्ये आहे त्यांनी मेहेरबानी करून खाली बसावे. त्यांचे मत, ओपिनियन त्यांनी द्यावे.

**लिओ कोलासो :-**

आम्ही सभागृहात बोलू नये का?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही त्यांना व्यक्तीगत दोष देत नाही. सभा जर लवकर संपवायची असेल तर आम्ही आमचे मत मांडून मा. महापौर मॅडम तुमच्याकडून रूलिंग मागतोय. अन्यत्र कोणाला बोलू देउ नका. नंतर ज्यांचे भाषणआहे त्यांनी करावे. ते सुद्धा त्यांचे रिफ्लेक्शन झालेले आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, एका नगरसेवकाने किती बोलायचे?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदया, मुझे दोबारा बोलने का मौका दिजीए।

**रतन पाटील :-**

किती बोलायचे म्हणजे? शहराच्या विकासासाठी संपूर्ण दिवस कमी आहे. ह्यांनी सत्ताधारी पक्षानेच बोलायचे का?

**मिलन म्हात्रे :-**

प्रत्येक लेखाशिर्षकावर सगळ्यांना बोलायल संधी दिली जाते.

**आसिफ शेख :-**

सत्ताधारी पक्षाने बोलायला सुरूवात केली तेव्हा त्यांनी प्रशासनाला काही सुचना दिल्या काही कान टिचक्या दिल्या आणि आता हे स्वतः ज्यापद्धतीने याठिकाणी संभाषण करत आहेत त्याचा अर्थ ह्याठिकाणी काय घ्यायचा?

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, आपल्या ज्या बसेस चालू आहे. त्या बसेस ठेका पद्धतीने चालू आहे. तर साहेब, सबसिडी हा एक वेगळा भाग आहे आणि जर ठेका पद्धतीने नसते व आपल्या डिपार्टमेंटली जर असते तर सबसिडी ही कोणासाठी, तर पब्लिकसाठी सबसिडी अमाउंट देता येईल. आता कॉन्ट्रॅक्ट सिस्टमने असताना सबसिडी देण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. तरी मला वाटते आपण सबसिडी देण्यापेक्षा आपण सबसिडी हा शब्द कॅन्सल करावे आणि मी आपल्याला असे निवेदन करतो की, सबसिडी देउ नये ह्याच्यासाठी मी ठराव मांडत आहे आणि हा ठराव सभागृहाने मंजुर करू ही सबसिडी कॅन्सल करावे असे मी आपल्याला या ठिकाणी विनंती करत आहे.

**मॉरीस रॉड्रीक्स :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मार्गस्थ फी हा प्रकार काय आहे ते आपण आम्हाला समजावून सांगितले तर बरे होईल. कारण आम्ही या विषयामध्ये पूर्णपणे अज्ञानी आहोत आणि स्थायी समितीला काय झाले ते आम्हाला माहित नाही. मार्गस्थ फी जवळ जवळ पावणेपाच करोड रूपये आहे. एस्कॉट फी कुठल्या नियमाने घेणार? आपल्याला परवानगी मिळाली आहे का? शासनाने मंजुरी दिली का? जर तुम्हाला मार्गस्थ फी साठी अलॉव्ह करतील तर टोलवाल्यांनी टोल का घ्यावा? येथून घोडबंदरचा टोल आहे, तेथून मुंबईचा टोल आहे आणि वसईच्या पुढे हायवेवर टोल आहे. आपण मार्गस्थ फी आकारण्याकरिता आपल्याला शासनाने परवानगी दिली का? कारण मी काही स्थायी समितीमध्ये नाही. आपण जर शासनाची मंजुरी घेतली असेल तर त्याचा विचार करा आणि जर मंजुरी नसेल तर पावणे पाच करोड रूपयाचे पूर्णपणे बजेटवर परिणाम होणार आहे. ही लहान रक्कम नाही. कोण अधिकारी आहेत त्यांनी खूलासा करावा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, याठिकाणी सन्मा. स्थायी समितीचे सभापती श्री. तुळशीदासजी म्हात्रे साहेब ह्यांनी सन २००५-०६ सुधारित व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रक आज याठिकाणी मा. महासभेसमोर सादर केलेले आहे. खरोखरच त्यांना जेवढे धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहे. एक अशी म्हण आहे की, छोटे मिया तो छोटे मिया, बडे मिय्या सुभान अल्ला, छोटे मिया कोण? तर छोटे मिय्या आमचे माजी सभापती श्री. मोहनजी पाटील साहेब त्यांनी जेव्हा अर्थसंकल्प सादर केला तेव्हा........

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य आपण स्थायी समिती सदस्य पदाचा राजीनामा का दिला? त्याचा खुलासा पहिले करा.

**आसिफ शेख :-**

२८२.९८.४९ चा अर्थसंकल्प होता आणि आता सन्मा. विद्यमान बडे मिय्या म्हणजे सन्मा. सभापती तुळशीदासजी म्हात्रे ह्यांनी ३५२.७३.३८ लाखाचा ह्याठिकाणी बजेट सादर केले आहे. खरोखरच त्यांना धन्यवाद द्यावयासे वाटते. सुंदर, सगळ्यांशी सुसंवाद साधून तसेच अधिकारी वर्गाबरोबर चांगला सुसंवाद साधून याठिकाणी त्यांनी चांगला बजेट, अर्थसंकल्प सादर केलेला आहे. सन्मा. भाजपाचे जे सदस्य ज्यांनी आता सभात्याग केला. खरोखरच त्यांनी याठिकाणी सभेमध्ये चर्चेत सहभाग घ्यायला पाहिजे होता. परंतु, त्यांचे पहिल्यापासुनच असे आहे की, कथनी वेगळी आणि करनी वेगळी आहे. बोलतात एक आणि करतात वेगळे. स्थायी समिती म्हटले तर स्टँडींग कमिटी म्हणजे अंडरस्टँडींग कमिटी असते. परफेक्ट अंडरस्टँडींग ही स्टँडींग कमिटीमध्ये असते. सगळ्यांशी सुसंवाद साधून चांगली कामे होत असतात आणि सर्वच ठराव बहूतेक करून सर्वानूमते मंजुर होत असतात. परंतु, ते सदस्य स्थायी समितीमध्ये असताना वेगळे बोलतात व मा. महासभेमध्ये आल्यानंतर वेगळे बोलतात. वारंवार असा अनुभव आपल्या सगळ्यांना आलेला आहे आणि लोकांनाही असाच अनुभव आलेला आहे की, त्यांची भुमिका कशी आहे? 'कथनी वेगळी आणि करनी वेगळी' असते. सन्मा. सदस्य चौहाण साहेबांनी त्या संदर्भात आपल्या संभाषणात विस्तृतपणे सांगितलेले आहे. तर या ठिकाणी मी पुन्हा स्थायी समिती सभापती ह्यांना धन्यवाद देतो की, खरोखरच त्यांनी एक चांगला बजेट ह्याठिकाणी सादर केला आहे. पुर्वी आमची कल्पना अशी होती की, निळे सागर, हिरवे डोंगर, स्वच्छ सुंदर मिरा भाईदर. ही संकल्पना घेउन आम्ही.......

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम हे काय चालले आहे? आम्ही बजेटच्या विषयावर बोलत आहोत. आमच्या मुद्यावर आम्हाला विश्लेषण पाहिजे. त्यांना जे सांगायचे आहे त्यांनी ते नंतर सांगावे. ते सत्ताधारी आहेत. जे काही दिवे लावायचे आहेत ते त्यांनी लावले आहेत. आता त्यांनी बोलायचे नाही.

**आसिफ शेख :-**

ही संकल्पना घेउन, आमचे आदरणीय प्रथम नगराध्यक्ष कार्यसम्राट गिल्बर्टजी मेंन्डोन्सा साहेब ह्यांच्या नेतृत्वाखाली याठिकाणी आम्ही सर्व काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस सर्व सहकारी मित्र पक्षांनी या गेल्या चार वर्षात या शहराचा अक्षरशः कायापालट केलेला आहे आणि लोकांनी याठिकाणी...........

**मिलन म्हात्रे :-**

म्हणून ते सहकारी बोलले तुम्हाला काय पाहिजे? पालट केलेले आहे, कायापालट केलेले नाही.

**आसिफ शेख :-**

पहिले भाईंदर काय होते आणि आता भाईंदर शहर हे कसे आहे? याठिकाणी जमिन - आसमानचा फरक झालेला आहे. आपले नातेवाईक म्हणा, मित्रमंडळी म्हणा ते जेव्हा बाहेरुन आपल्या शहरात येतात तेव्हा त्यांच्या तोंडूनच आपल्याला चांगले ऐकायला मिळते. हे आपण खरोखर मान्य केले पाहिजे आणि विरोधी पक्षानेही मान्य केले पाहिजे की, खरोखरच याठिकाणी मिरा भाईंदर शहराचा जो विकास झालेला आहे. जसे फ्लाय ओव्हर म्हणा, रस्ते म्हणा, गटारे म्हणा, स्ट्रीट लाईट म्हणा शहराच्या सौंदर्यकरणात मोठ्या प्रमाणात आपण भाग घेतलेला आहे. असे असताना देखिल विरोधकांनी...........

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मार्गस्थ फी बद्दल काय? आम्हाला त्याच्यावर अजुन रूलिंग मिळालेले नाही. मी खाली बसलो नाही. तुम्ही हे असे शॉर्टकट मारून चालणार नाही. ह्यांना खाली बसवा आणि कायद्याचे बोला. त्यांच्या पक्षाच्यावतीने संपूर्ण स्थायी समितीला त्यांचे सभापती होते. त्यांनीच सभा चालवलेल्या आहेत.

**आसिफ शेख :-**

तर मला या ठिकाणी अर्थसंकल्पाच्या बाबतीत ज्या सुचना करायच्या आहेत. तर आपण कृपया माझ्या सजेशनवर लक्ष केंद्रित करावे. पान क्र. १६ वर गणवेश व पावसाळी साहित्य खरेदी संदर्भात आपण कृपया कर्मचाऱ्यांना वेळोवेळी पावसाळ्यामध्ये जास्तीत जास्त मदत करता आली पाहिजे. तर आठ लाखावरून जर कृपया दहा लाख रूपये केले तर बरे होईल.

**शुभांगी नाईक :-**

सफाई कर्मचारी किती आहेत?

**आसिफ शेख :-**

त्याचप्रमाणे पान क्र. २२ वर मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचे बंदोबस्त करणे. तर आज संपुर्ण शहरात कुत्र्यांचे फारच त्रास होत आहे. म्हणजे रस्त्यावरून चालणे मुश्किल होत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम माझ्या विषयाचे काय झाले?

**शुभांगी नाईक :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख एवढी तरतुद केलेली आहे तर सफाई कामगार किती आहेत?

**मिलन म्हात्रे :-**

मार्गस्थ फी चे काय झाले?

**आसिफ शेख :-**

पण आता आपण कायद्याच्या चौकटीत बसून, जास्तीत जास्त मोकाट, पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त कसा करता येईल तिथे लक्ष दिले पाहिजे. तसे आपण योग्य ती कार्यवाही करायला पाहिजे. पान क्र. २४ वर आपण प्रभाग व्हाईस चांगली तरतुद केलेली आहे. त्याचप्रमाणे पान क्र. २७ व २८ वर याठिकाणी खेळाचे साहित्य, दुरूस्ती आणि खरेदी त्याच्याकरिता एक लाख रूपयाची तरतुद केलेली आहे तर आपण तिथे दोन लाख रूपये तरतुद करावी. त्याचप्रमाणे साफसफाईकरिता लागणारे साहित्य....

**मिलन म्हात्रे :-**

मार्गस्थ फी चे काय झाले? ती कोणाला मार्गाला लावणार आहे?

**आसिफ शेख :-**

त्याचप्रमाणे अनधिकृत बांधकाम हे हटविणेकामी आपण सहा लाखाची तरतुद केलेली आहे ती पुर्ण वापर करण्यात यावी. त्याचप्रमाणे पान क्र. ३२ वर जे आपण प्रभाग समिती निधी आहे त्याबाबत मी सन्मा. आयुक्त साहेबांना विशेष करून धन्यवाद देईन. जेव्हापासुन आयुक्त साहेब हे आपल्या मिरा भाईंदर परिसरात आले आणि आयुक्त पदाचा चार्ज घेतला व शिर्डी येथून आल्यामुळे त्यांच्या मनात चांगली कल्पना होती की, मिरा भाईंदर शहरात आपण चांगले काम केले पाहिजे आणि ते आल्याबरोबर प्रभाग समिती स्थापन करून त्यांना सक्षम करण्यासाठी आणि प्रभाग स्तरावर चांगले काम व्हावे यासाठी त्यांनी प्रभाग अधिकाऱ्यांना आणि प्रभाग समितींना अधिकार प्रदान केले आणि त्यावर तातडीने दोन दोन करोड रूपये असे आठ करोड रूपये आपण मागच्यावेळी मंजुर केले. परंतु, आपण बघतोय दिवसेंदिवस प्रभाग समितीमध्ये कामाचा ताण, लोकांची गाऱ्हाणी-तक्रारी ह्या वाढत चाललेल्या आहेत आणि निधी कमी पडत आहे. आम्ही मागच्यावेळी आमची जेव्हा सभा झाली तेव्हा आम्ही एक ठराव करून पाठविला की, प्रत्येक समितीला आपण सात - सात करोड रूपये

द्या. जर सात करोड रूपये जमत नसतील तर किमान आपण पाच पाच करोड रूपये दिले तर वीस कोटी रूपयाची प्रभाग समितीकरिता तरतुद करावी. आठ करोड रूपयाऐवजी आपण त्याठिकाणी वीस करोड रूपयाची तरतुद केली तर योग्य होईल. त्यामुळे ज्या नव्याने आपल्या समित्या स्थापन झालेल्या आहेत. आरोग्य समिती, शिक्षण समिती, क्रीडा व समाजकल्याण समिती आणि गलिच्छ वस्ती निर्मूलन सुधारणा समिती.....

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, मी बोलत असताना आपण मला बसायला सांगितले आणि हे काय लावले आहे? सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलत असताना बसा सांगितले आणि हे जे असे चालले आहे ते असे चालणार नाही. आपण प्रत्येकवेळी असे का करता? मग मला का आपण बसायला लावले? सन्मा. सदस्य मध्ये कशाला बोलता? सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलत होते ना, त्यांना बोलू द्या. त्यांचे वक्तव्य चालू आहे तर त्यांना बोलू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

सत्ताधाऱ्यांनी बजेट मांडलेले आहे. म्हणजे तुम्ही सर्व सदस्य उभे राहून बोलता म्हणजे तुम्हाला बजेट मान्य नाही.

**आसिफ शेख :-**

ह्या ज्या समित्या स्थापन केल्या आहेत. त्यांना पंचविस लाख रूपये निधी दिला आहे तर पंचवीस लाखऐवजी पन्नास पन्नास लाख रूपये जर आपण निधी उपलब्ध करून दिला तर त्या सभापतींना देखिल चांगले काम करता येईल. त्याचप्रमाणे नव्याने शिक्षण मंडळ स्थापन होत आहे. तर शिक्षण मंडळाकरिता ही दोन दोन करोड रूपयाची तरतुद करण्यात यावी. आपल्या वाचनालयामध्ये सर्व समाजाची नविन नविन पुस्तके आणण्यात यावीत.

**मिलन म्हात्रे :-**

सगळं सोडून अधिकाऱ्यांची स्थुती करता आणि हे पाहिजे ते पाहिजे असे ही बोलता.

**आसिफ शेख :-**

अशा तऱ्हेने आपले बजेट पूर्ण झालेले आहे. सर्वांचे या ठिकाणी अभिनंदन करतो. विशेषतः तुळशीदास म्हात्रे स्थायी समिती सभापती व सर्व स्थायी समिती सदस्य ह्यांचे आभार व्यक्त करतो की, त्यांनी एक चांगले बजेट सादर केलेले आहे आणि येथून पुढे आपल्याला शहराचा चांगला विकास करायचा आहे. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र!

**मिलन म्हात्रे :-**

मार्गस्थ फी चे पावणे पाच करोड रूपये जे दाखवले आहे.....

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की,......

**हॅरल बोर्जिस :-**

सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पावर भाष्य करण्याच्या आधी, अर्थसंकल्पामध्ये काही दूरूस्त्या सुचवायच्या आहेत. सन्मा. सर्व सदस्य........

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आता महानगरपालिकेमध्ये विषयाला सुरूवात झाली की, लाखो करोडो रूपयाचा विषय आहे. लाखो करोडो रूपयाची उलाढाल. परंतु, आपल्या महानगरपालिकेमध्ये कुत्र्यांच्या इंन्जेक्शनचा बंदोबस्त नाही. एखादा गरीब माणूस असेल, झाडू कामगार असेल, नालेसफाई करणारा माणूस असेल तर त्याने साडे तीनशे रूपयाचे इंन्जेक्शन घ्यावे का? आज मुंबई महानगरपालिकेमध्ये अर्ध्या किंमतीमध्य ते इंन्जेक्शन मिळतात आणि आपल्या महानगरपालिकेमध्ये मिळत नाही. टेम्बा हॉस्पीटलमध्ये गेल्यावर इंन्जेक्शन नाही. प्रायव्हेटमध्ये गेल्यावर साडे तीनशे रूपयाचे इंन्जेक्शन आहे. गरीब माणसे कुठून इतके पैसे आणणार? फक्त कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. फक्त तेवढेच वाक्य बोलले म्हणजे कुत्र्यांचा बंदोबस्त झाला का?

**हॅरल बोर्जिस :-**

कृपया सभागृहाला मी विनंती करतो की, पान व्हाईस अर्थसंकल्पावर ज्या दुरूस्त्या सुचवित आहे तर कृपया, सर्व सभासदांना मी विनंती करतो की, आपण लक्ष द्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

आमची मंजुरी आहे. पण प्रत्येक पक्षाच्या एका सदस्याला बोलू द्या. म्हणजे सभा लवकर संपेल. तुमच्या पक्षातला कोणीतरी एकाला बोलू द्या. आम्ही एकजण बोलायला तयार आहोत. पान क्रमांक कॉल करा आम्ही मुद्दे काढले आहेत. आमच्या सुचना हरकती ज्या काही मांडायच्या आहेत त्या घ्या. आम्हाला मान्य आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन २००६-०७ चे अंदाजपत्रक सादर झालेले आहे. त्यामध्ये पान क्र. ७ वर.....

**मिलन म्हात्रे :-**

सभागृह नेते, पान क्र. १ पासून सुरू करा. आम्हाला बोलायचे आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

पान क्र. ७ वर जमेच्या बाजुला, सन्मा. सदस्य मी मा. महापौरांची परवनगी घेउन बोलतोय.

**रतन पाटील :-**

पान क्र. १ पासुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

हे काय चालले आहे? पान क्र. १ पासून घ्या.

**रतन पाटील :-**

पान क्र. १ पासून घ्या म्हणजे पटपट काम होउन जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही मुद्दे काढलेले आहेत. पान क्र. १ वर सर्व पक्षाच्या एकेका सदस्यांना बोलून झाल्यानंतर पान क्र. २ चा पुकारा करा. आम्ही लोक तयार आहोत. सभा लवकर संपेल. आम्हाला काय वाद घालायचा नाही. आपण आमच्या सुचना घ्या आणि स्थायी समितीमध्ये आमचा कोणताही सदस्य नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, सभागृहामध्ये आपण भरपूर वेळ घेतलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही वेळ घेतलेला नाही. येथे डायरीवरून दोन तास गेले.

**हॅरल बोर्जिस :-**

मला दहा मिनिटाची संधी मा. महापौर मॅडमने दिलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

असे नाही. आपणच सांगितले की, पान व्हाईस घेण्यात यावे. अशी आपलीच सुचना आहे. एवढ्याला तीन पाने झाली असती.

**रतन पाटील :-**

संपूर्ण वेळ घ्या. कारण बजेटवर संपूर्णपणे तुम्हीच बोलणार आहात. आपण आमच्या सुचना घ्या नंतर मग तुम्हीच बोलत रहा. पाहिजे तर आम्ही जातो. ठराव तुम्हीच मांडा. आम्ही जातो.

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, पान क्र. ७ वर जमेच्या बाजूला.

**मिलन म्हात्रे :-**

नाही, नाही. हे आम्ही मांडू देणार नाही. मग तुम्ही बोलायचे नाही. तुम्ही खाली बसा. माझे बोलणे चालू आहे. माझ्या हरकती मांडलेल्या नाहीत. आम्ही तुम्हाला मंजुरी दिली. तुम्ही बोललात की, पान व्हाईज घेण्यात येते आहे हे आम्ही मान्य केले. आपण पान क्र. १ वरून घ्या.

**रतन पाटील :-**

आमच्या सुचना आहेत. त्या आमच्या सुचनाही आम्ही मांडू.

**हॅरल बोर्जिस :-**

मा. महापौर मॅडम, अंदाजपत्रकावरील माझ्या ज्या दुरूस्त्या आहेत. त्या दुरूस्त्या मी सभागृहासमोर मांडत आहे. पान क्र. ७ वर एकूण २२ हेड जमेच्या बाजूला दिलेले आहे. त्यामध्ये अधिकाऱ्यांनी कृपया ह्याच्यावर थोडेसे लक्ष द्यावे. अधिकाऱ्यांना विनंती करतो जमेच्या बाजूला २३ हेड टाकून त्याच्यावर अतिवृष्टी नूकसान भरपाईपोटी सात कोटी रूपये जमेच्या बाजूला करा.

**मिलन म्हात्रे :-**

आपण सुचना मांडत आहात आणि सत्ताधारी ही तुम्ही, सभागृह नेते तुम्ही, सत्ता तुमची, परिवहन तुमचे, वाहन तुमचे, तरी तुमच्या सुचना. मा. महापौर मॅडम, माझे भाषण अजुन संपलेले नाही. मी खाली बसणार नाही.

**हॅरल बोर्जिस :-**

आपली मागणी आहे नउ कोटी रूपयाची पण आपण सात कोटी रूपये अंदाजित धरतोय.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ४ मध्ये आयुक्त साहेबांनी स्थायी समितीला खोटी माहिती दिलेली आहे. त्याच्यात फिगर चूकीचे दिलेले आहे.

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, मी फक्त दहा मिनिटे सभागृहाचे घेतलेले आहे. कृपया, मी बोलताना मला मध्ये डिस्र्टब करू नका. आपण बोला. अर्धा तास बोला.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला पान क्र. १ पासून बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपल्याला सुचना मांडण्याकरिता वेळ दिलेला होता. आपल्या पान व्हाईज ज्या सुचना असतील त्या सुचना आपण नंतर मांडा. सभागृह नेते पान व्हाईज सुचना मांडत आहे त्यांना सुचना मांडू द्या. आपण खाली बसा.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. १ पासून सुरू करा.

**मा. महापौर :-**

पान क्र. १ पासून आपण आपल्या सुचना मांडा. सन्मा. सभागृह नेते हे त्यांच्या सुचना मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम असे कसे होईल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण खाली बसावे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जसे इतिवृत्तांताचे वाचन करता तसे वाचन करा.

**हॅरल बोर्जिस :-**

त्याच्यानंतर जमेच्या बाजूमध्ये, पान क्र. ४ वर इमारत परवाना फी-विकास आकार, बाल्कनी बंदिस्त फी. ह्यामध्ये स्थायी समितीने बारा कोटी रूपयाचे अंदाज वर्तविले आहेत आपण एक कोटी रूपये त्याच्यात वाढ करतोय.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला चार कोटी रूपये, पन्नास कोटी रूपये एवढी वाढ करायची आहे. बोला आता काय बोलता ते? तुम्हाला त्या डी.एन.ए. ऑफीसरने दिलेले आहे. हे सर्व बिल्डरचे शासन चालू आहे. आमची पन्नास करोड रूपयाची मागणी आहे. तिथे पन्नास करोड रूपये करा. तुम्ही लोक येथे बिल्डर लोकांचे राज्य चालवता. कसली आली, बाल्कनी बंदिस्त फी? तुम्ही ह्याच्यावर लावू नका. सदन फी लावा. आमची पन्नास कोटी रूपयाची जी मागणी आहे ती तुम्ही करून घ्या.

**रतन पाटील :-**

पन्नास कोटी रूपये करा.

**मिलन म्हात्रे :-**

बिल्डर लोकांना आकारणी करायला तुमची हिंम्मत होत नाही. सहा रूपये नउ वर्षापासून चालले आहे. येथे पाण्याचे रेट वाढले. हाउस टॅक्सचे रेट वाढले. पन्नास करोडची तरतुद झाली पाहिजे.

**हॅरल बोर्जिस :-**

पान क्र. ५ परवाना विभाग - कारखाने दूकाने आर्किटेक्ट फी सर्व प्रकारचे परवाने फी ह्यामध्ये स्थायी समितीने दोन कोटी रूपये सुचविले आहेत. तर आपण तिथे पन्नास लाखाची वाढ करून अडीच कोटी रूपये ईतके करतोय. जमेच्या बाजूला एकंदर साडे आठ कोटीची जमा झाली आहे. आता आपण साडे आठ कोटी रूपयाचे विनियोग तुम्हाला दुरूस्त्या सुचवतोय. पान क्र. ३५ मध्ये संर्कीण मध्ये जो ६ क्रमांकाचा हेड आहे आपत्कालीन निवारण निधी त्याच्यात ६ (अ) करुन महापौर सहाय्यता निधी पंचवीस लाख रूपये करावे. पान क्र. ३६ मध्येच अंशदानमध्ये (अ) शाळा कॉलेज व इतर संस्थांना शैक्षणिक अनुदान देणेबाबत ह्यामध्ये स्थायी समितीने प्रोव्हीजन दिलेली नव्हती. मा. महासभा एक कोटी रूपयाचे प्राविधान करत आहे.

**रतन पाटील :-**

कशाला? मागच्या वेळी जे अनुदान दिले. त्याचा रिपोर्ट आहे का?

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्य मी तुम्हाला परत परत सांगतोय, मी मा. महापौरांची परवानगी घेतलेली आहे. मी बोलत असताना कृपया, मला इंटरफेअर्स करू नका. तुम्हाला जे बोलायचे आहे ते आपण नंतर बोला. तुमचे पुष्कळ ऐकले.

**मिलन म्हात्रे :-**

आपणच मध्ये उभे राहून बोलत आहात. माझे संपले नसताना बोलत आहात. तुम्हाला ह्या सुचना मांडायला अधिकार नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्या सुचना आपण नंतर मांडा. आपल्याला बोलण्याची संधी दिली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही तुमचेच बजेट सादर केले आहे. ह्याच्यात तुम्ही सुचना मांडत आहात म्हणजे सभापती साहेबांनी जे केल ते चुकीचे केले आहे असे तुमचे म्हणणे आहे का?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आमचे सदस्य आपली परवानगी घेउनच उठून बोलत होते.

**मिलन म्हात्रे :-**

आपण वाटेल तसे कराल. एक नंबर बोलतात तर एक नंबरपासून सूरूवात करायला काय झाले? सगळ्यांना आपआपल्या सुचना करू द्या. हे परत परत रिव्हीजन करत रहायचे का?

**हॅरल बोर्जिस :-**

पान क्र. ३२ मध्ये, सन्मा. प्रभाग समितीचे अध्यक्ष आसिफ शेख वक्तव्य करत असताना बोलत होते की आठ कोटी रूपये ही चांगली निधी आम्हाला दिलेली आहे. येथे आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे. अशी परिस्थिती होईल प्रभाग समिती निधी पोटी आठ कोटी रूपया ऐवजी दहा कोटी रुपये करावे. पान क्र. ३२ मी साडे आठ कोटी रूपयाची जी वाढ सुचविलेली आहे. त्या साडे आठ कोटीचे समोर खर्चाच्या बाजुला विनियोग देत आहे. त्याच्यानंतर विशेष समित्या ज्या आपण स्थापन केलेल्या आहेत. त्यामध्ये शिक्षण समितीला पंचविस लाख रूपये चारही समितीला पंचवीस पंचवीस लाख रूपये दिलेले होते. त्याच्या जागी शिक्षण समिती ७५ लाख, आरोग्य परिक्षण ४० लाख, क्रिडा समाजकल्याण - ४५ लाख, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती - ४० लाख. पान क्र. ४३ मध्ये स्मशान भुमिचा जो हेड आहे. स्मशानभूमी विकास खर्चाच्यानंतर त्याच ठिकाणी विद्युतवाहिनी हा हेड त्याच्यासाठी ५० लक्ष रूपयाची प्रोव्हीजन ठेवा. पान क्र. ४६ मध्ये उद्यान विकासासाठी एक कोटी पंचवीस लाख उद्याने विकास नविन बांधकामाचा जो हेड आहे त्याठिकाणी ७५ लाखाची स्थायी समितीने प्रोव्हीजन दिलेली आहे आणि आपण सव्वा कोटी रूपये करतोय. पान क्र. ५१ मध्ये मुख्य कार्यालयासाठी जनरेटर त्याच्यासाठी पन्नास लाख रूपयाची तरतुद आपण करत आहोत. ६ नंबरच्या नंतर हेड पाडून घ्या. पान क्र. ५१ वरच नविन स्ट्रीट लाईटचे प्रस्ताव बरेच पेन्डींग पडलेले आहेत. स्थायी समितीने त्याला गेल्यावर्षी मान्यता दिलेली होती. परंतु, ते काम निधी अभावी पेंन्डींग पडून होते. स्थायी समितीने दिड कोटी रूपयाची प्रोव्हीजन केलेली होती. आपण त्याच्यामध्ये १ कोटी २५ लाख रूपये वाढ करून ३ कोटी ७५ लाख रूपये एवढी तरतुद करत आहोत. नविन स्ट्रीट लाईट प्रस्तावअंतर्गत तीन मिटरच्या कमी रुंदीच्या ज्या गल्ल्या आहेत. त्याच्यातले बरेचसे प्रस्ताव पेंन्डींग पडलेले आहेत. पान क्र. ६० मध्ये वितरण व्यवस्था किरकोळ खरेदी दुरूस्ती ह्यामध्ये स्थायी समितीने २ कोटी ५० लाखाला प्राविधान दिले होते आणि मा. महासभा त्यात तीन कोटी रूपये वाढ करत आहे. अडीच कोटीच्या जागी तीन कोटी रूपये करतोय. पान क्र. ६२ अनु. क्र. १८ - शहरातील अस्तित्वातील जलवाहिन्यांचा सर्व्हे करणे. ह्याला दहा लाख रूपयाची स्थायी समितीने प्रोव्हीजन केली होती तर मा. महासभा पंचवीस लाखाची तरतुद करत आहोत. तसेच, त्या पानावर नविन जलवाहिनी टाकणेसाठी साडेपाच कोटीची प्रोव्हीजन स्थायी समितीने केलेली आहे आणि मा. महासभा त्याचे सहा कोटी रूपये करत आहे. मा. महापौर मॅडम, मी साडे आठ कोटी रूपयाची दूरूस्ती सूचविली आणि साडे आठ कोटी रूपयाचा विनियोग आपल्यासमोर दिला आहे. सन २००६-०७ चे अर्थसंकल्प मा. स्थायी समितीने मा. महासभेसमोर सादर केले असताना कोणतीही करवाढ नागरीकांवर न लादता अतिशय नियोजनबद्ध अशा पद्धतीचे या ठिकाणी अंदाजपत्रक सादर केलेले आहे. यामध्ये विशेष उल्लेख करावयाच्या बाबी म्हणजे आरक्षण मधल्या ज्या जागा आहेत, आरक्षण आराखड्यामधल्या ज्या जागा आहेत त्या अंमलबजावणीसाठी विशेष करून आरक्षण क्र. १६५, १६७, १०० ह्याच्यासाठी एकूण ७५ लाखाची अंदाजपत्रकामध्ये तरतुद दिलेली होती आणि विशेष करून आयुक्त महाशयांना धन्यवाद देईल. सुभाषचंद्र बोस मैदानाचे आरक्षण क्र. ९१ याच्यासाठी खास करून पन्नास लाखची वेगळी तरतुद आयुक्त साहेब आपण केली या बद्दल आपले आणि मा. महापौरांना धन्यवाद देतो. पान क्र.३३ वर प्राथमिक / माध्यमिक शिक्षणाच्या हेडखाली जो ५ नंबरचा हेड आहे - शालेय क्रिडा स्पर्धाकरिता सांस्कृतिक कार्यक्रम, मा. महापौर चषक/ मॅरॅथॉन स्पर्धा अशी दुरूस्ती करण्यात यावी. पान क्र. ३० वर अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटविणेकामी सहा लाखाची प्रोव्हीजन होती त्या ठिकाणी पंचवीस लाख रूपये करावे. त्यानंतर अंदाजपत्रकामध्ये विशेष नमुद करावयासाठी शिवार गार्डनचे जे टाउन पार्क आरक्षण क्र. २६२ ह्याच्यासाठी वेगळी ७५ लाखची तरतुद मा. महासभेने केलेली आहे. वाहन चालकाचे आरक्षण क्र. ६० विकसित असे जे महत्वाचे विकास आराखड्यातली आरक्षणांची अंमलबजावणी करायची आहे. त्यानंतर आपल्या महापालिकेच्या ज्या शाळा आहेत. मला असे वाटते की, जी आपल्या शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्या महापालिकेच्या मुलांना संगणक प्रशिक्षण प्रणाली सुरू करत आहोत. ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे आणि ह्यासाठी जवळ जवळ आपण अडीच कोटी रूपयाची तरतुद ह्या अंदाजपत्रकामध्ये आयुक्त महाशय दिलेले आहे. पुन्हा एकदा आपल्याला धन्यवाद देतो. फक्त ह्यापोटी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, संगणक शिक्षण २००६-०७ या शैक्षणिक वर्षामध्ये चालू करताना ज्या ज्या आवश्यक परवानग्या किंवा मंजुऱ्या असतील त्या आपण वेळोवेळी मंजुऱ्या घेतल्या तर आपण जी तरतुद केली आहे. त्याचा नक्कीच आपल्या मुलांना, महापालिकेच्या शाळेमध्ये शिक्षण घेत

असलेल्या मुलांना त्याचा नक्कीच फायदा होईल. मा. महापौर मॅडम विशेष म्हणजे उल्लेख करायाची बाब म्हणजे ५० एम.एल.डी. ची पाण्याची योजना कार्यान्वित झाल्यानंतर आजच्या स्थितीला आपला मंजुर ५० एम.एल.डी प्लस मागचा ३२ एम.एल.डी. असे ८२ ते ८६ एम.एल.डी. पाणी आपल्याला आज मिळत आहे. परंतू, शहराची भविष्यकाळाची वाढीव पाण्याची मागणी लक्षात घेता, मोरबे धरणाची आपण अर्थसंकल्पात तरतुद केलेली आहे. त्यासाठी ही आपल्याला धन्यवाद देतो आणि पुन्हा पुन्हा एकदा ह्या अंदाजपत्रकामध्ये ज्या ज्या सन्मा. सदस्यांनी दुरूस्त्या सुचवलेल्या आहेत त्या दुरूस्त्या विचारात घेउन सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास आणि सन २००५-०६ चे सुधारित मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६ रोजीचे प्रकरण क्र. २१३ सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकाच्या मंजुरीसाठी मी ठराव देत आहे.

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, त्या ठरावाला आमचा विरोध ह्याच्याकरिता आहे की, पान क्र. ६ वर लेखाशिर्षक १५ ऑडीट वसुली येणार होती आणि ह्याची तारीख २५/०१/२००३, १ जानेवारी २००३ ही आहे. ह्यामध्ये त्या त्यावेळचे अधिकारी म्हणजे आताचे एक्झीस्टींग श्री. अजित पाटील व मुख्याधिकारी, श्रीकांत मोरे, हरेश पाटील, विजय पाटील आणि शरद बेलवटे ह्यांच्याकडून काही रक्कमा पर्सनल तत्वावर वसुल करायचे आहे असे ह्या ऑडीटमध्ये शेरे आलेले आहेत. आता आजमितीस त्यांना मा. आयुक्त ह्यांनी चांगले काम केल्याबद्दल त्यांना पदोन्नती दिली, त्यांना वाढ दिलेली आहे पण एक कोटी ३४ लाख ९६ हजार इतकी वसुली ऑडीटची असुनसुद्धा आणि दुसरे पान माझ्याकडे आहे ह्याच्यामध्ये आपण अग्रीम रक्कम ही जवळ जवळ ३ करोड ४२ लाख ६५४ समथिंग म्हणजे जवळजवळ एकुण गेली चौदा वर्षापासुनची अग्रीम रक्कम अजून आपण परत घेतलेली नाही. त्याचा ह्या बजेटमध्ये कुठेही उल्लेख नाही. आमची अशी सुचना आहे की, आयुक्तांनी जो फसवा अंदाज दिला होता ऑडीट वसुली येथे जे पाच लाख रुपये दाखवले आहे. त्या ठिकाणी जवळजवळ चार करोड रूपये आपली वसुली झाली पाहिजे. हे ऑडीट रिपोर्ट आहेत. आपल्याला वाटल्यास नंतर प्रत्येक नगरसेवकांना महापालिकेने दिले पाहिजे. आम्हाला दिलेले नाही. कोणीतरी ऑडीटचे रिपोर्ट काढायला गेलो तर, सरळ नकार घंटा लावली पण माहितीच्या अधिकारामध्ये ऑडीट रिपोर्ट मिळालेले आहेत. हा ऑडीट रिपोर्ट दर तीन महिन्याला प्रशासनाने आपल्याला दिला पाहिजे. ह्या ऑडीट रिपोर्टची जी वसुली आहे. या महापालिकेच्या मा. महासभेमध्ये मी एक नगरसेवक, जिम्मेदार नगरसेवक महानगरपालिकेचा विश्वासक या नात्याने अशी मागणी आहे की, जे स्थायी समिती पुढे यायचे होते ते स्थायी समितीपुढे आले नाही. आज निदान पक्षाने हे सभागृहापुढे आणण्याचा मी प्रयत्न करत आहे. मा. महापौर मॅडम, जवळ जवळ चार करोड रूपयाचा हा मामला आहे. सरकारी कागद माझ्याकडे आहे. मी स्वतः म्हणतोय अशातला भाग नाही. जे प्रकरण ऑडीट रिपोर्टमध्ये क्लिअर कट म्हटले आहे अगदी शेवटपर्यंत म्हटले आहे. ह्याचा पूर्णपणे आम्ही अभ्यास केला. ह्याच्यावर प्वॉईंटस दिले आहेत आणि जिथे जिथे डीमार्क्ड केलेले आहे. प्रत्येक पानावर दहा लाख पंधरा लाख, नउ लाख अशा रक्कमा आहेत. या अधिकाऱ्यांकडून वसुल करायच्या आहेत. हे एवढे भयानक प्रकरण तत्कालिन नगरपालिका, महापालिकेचे आयुक्त आणि आताचे एक्झेस्टींग आयुक्त ह्यांनी तरी ह्या बजेटमध्ये ही माहिती आणायला पाहिजे होती. ते त्यांनी आणले नाही. सदर कागदपत्र चुकीची आहेत की, बरोबर आहेत. याबाबत सभागृहापुढे आपण रूलिंग द्यावे. ह्यामध्ये जी करोडची वसुली आहे ती का, केली नाही? आज हे अधिकारी आपल्याकडे कामावर कार्यरत आहेत पण महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करण्यामागे ह्यांचा मोठा सहभाग आहे. असा माझा स्पष्ट आरोप आहे. महापालिकेमध्ये हे जे काय चालले आहे, ह्याला भ्रष्टाचार म्हणावे. परंतु, मी तर असे बोलतोय की, सेंट्रल ऑडीटने ह्याच्यात क्लिअर कट अपहार असे म्हटलेले आहे. ही सुद्धा शब्दरचना ह्या ऑडीट रिपोर्टमध्ये आहे. जे त्यांनी ऑब्जेक्शन घेतले आहे. त्याच्यात ह्या रक्कमेचा अपहार झाल्याकारणाने या अधिकाऱ्यांकडून खाजगी वसुली करून घ्यावे. असे हे ऑडीट रिपोर्ट आणि त्याचे ताशेरे म्हणत आहेत. हे राज्य शासनाचे ताशेरे आहेत. मिलन म्हात्रेचे नाहीत. ह्या जर ऑडीट रिपोर्ट बद्दल आपण कुठली क्षमायाचना केली किंवा काय सुट दिली तर ह्याच्यामध्ये सर्वस्व आपण ह्या सभागृहामध्ये बसलेले सर्व नगरसेवक ह्याला जबाबदार असू कारण यामध्ये ५(१५) मध्ये ऑडीट वसुली या भाषेत फक्त ५ लाख रूपये आयुक्तांनी कुठल्या बेसवर दिलेले आहे. प्रशासनाने त्यांच्याकडून हे कागदपत्र दडवले का? का, आपले लेखा विभागाचे जे कोणी ऑडीटर आहेत. आपण एवढे मानधन अमुक तमुक देउन त्यांना आणले आहे. त्यांनी सभागृहाची मा. स्थायी समितीचे सभापती ह्यांची, स्थायी समितीमध्ये असलेले सर्व सदस्य ह्यांची आणि आपण स्वतः व आम्ही या सगळ्यांची दिशाभुल केलेली आहे. हा एवढा मोठा जो फिगर आहे. त्याचे नेमके तुम्ही सोक्ष मोक्ष काय लावता? माझी ह्याच्यावरती अशी सुचना आहे की १५ नंबर ऑडीट वसुलीची रक्कम गेल्या अनेक वर्षापासुन प्रशासनाने कुठल्या कारणानेही वसुल केली गेली नाही. ह्याची आपण वसुली करणार आहात का? तर ती वसुली करावी. या सभेनंतर त्याची कार्यवाही सुरू करावी. चार करोड हा फिगर येथे लिहावा आणि आपण ह्याच्यावर रूलिंग द्या की, ऑडीट रिपोर्ट आपल्याला मान्य आहे की, नाही किंवा ही जी वसुली आहे थकबाकी त्या डीपार्टमेंन्टच्या अधिकाऱ्याने उभे राहून आम्हाला बोलावे की,

हा खोटा रिपोर्ट आहे. मिलन म्हात्रे बोलतात ते आरोप खोटे आहेत. मा. महापौर मॅडम ह्या विषयावर आपण आपली रूलिंग द्या. जेवढे आतापर्यंत चीफ ऑफिसर गेलेत त्यांची ही नावे आहेत. जे जे त्याच्यावर एलिजेबल होते, जे जबाबदार आहेत. त्या अधिकाऱ्यांची त्याच्यात नावे आहेत आणि अधिकाऱ्यांची व आपल्या प्रशासनाची म्हणजे मुख्याधिकारी आणि प्रशासनाचे अधिकारी ह्या सर्वांची नावे आहेत. कालावधीही दिलेला आहे. लेखापाल म्हणून कोणी कोणी काय काय केलेले आहे. श्री. अजित भगवान पाटील - ०२/०९/८५ ते १९/०२/८८, श्री. श्रीकांत मोरे - २०/१२/८८ ते २०/०८/९४, श्री. हरेश पाटील २१/०८/९४ ते ०७/०४/९५, श्री. विजय पाटील - ०८/०४/९५ ते ३१/०३/९९, श्री. शरद बेलवटे - ०१/०४/९९ ते २७/०२/०२ ह्या कालावधीमध्ये ह्या लोकांकडून जी वसुली आहे ती व्हायची होती. दोन्ही सदनामध्ये ह्याची मागणी आपण दोन्ही लेखामध्ये दाखवलेली नाही. तर त्या लेखापुढे पाच लाखाच्या ऐवजी चार करोड रुपये इतकी रक्कम आपण दाखवावी अशी माझी आपल्याला विनंती आहे आणि मला ह्या विषयावर रूलिंग पाहिजे. आपला आलेख फार उंच आहे. आपण भरपूर प्रगती केलेली आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम.......

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला रूलिंग पाहिजे. हे बघा, ह्यायेथून विषयाला वाद फुटतो. आमचे बोलणे संपवायचे आहे. आपण मला रूलिंग दिलेले नाही. मी आपल्याला हे सर्व पुराव्यासहित दाखवतोय ह्याच्यावर जर आपल्याला गांर्भीय असेल तर आपण रुलिंग द्या. नसेल तर आम्हाला आमचा पुढचा मार्ग मोकळा आहे. आम्ही आपल्याला एक रिस्पेक्टेबल पर्सन, आपली खुर्ची मानाची आहे ह्या हिशोबाने हा प्रकार प्रशासनाने आपल्यासमोर आणायला पाहिजे होता. आपल्या बाजूला आयुक्त साहेब बसले आहेत त्यांनी हे आपल्या निदर्शनास आणयला पाहिजे होते की, प्रत्येक नगरसेवकाला हा ऑडीट रिपोर्ट द्यायचे हे काम त्याचे आद्यकर्तव्य होते. आदल्या सभेमध्ये ह्याच्यावर भरपूर उहापोह झाला. परंतु, हे रिपोर्ट अजूनपर्यंत आम्हाला मिळालेले नाहीत. आम्ही मिळवलेला आहे आणि आता हे तुमच्या पुढ्यात आणून दिलेले आहे. आता ह्याचा सोक्षमोक्ष तुम्ही लावा. अधिकाऱ्यांची रक्कम माफ करता का? की, त्यांच्याकडून वसूली करणार आहात? त्यांची जर रक्कम माफ केली तर महापालिकेचा चार - साडे चार पाच करोडच्या नुकसानीला आपण जिम्मेदार आहात. मी देखील जिम्मेदार असेल.

**मोहन पाटील :-**

हा विषय आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय आहे. आपण विषयाला फाटे फोडू नका.

**रोहीत सुवर्णा :-**

पण ही रक्कम ॲक्च्युअली पाच करोडच्या वर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

१५ नंबरचा शिर्षक काय आहे? ऑडीट वसुली ह्या विषयावर मी बोलतोय आणि त्याच्यामध्ये चार करोड रूपये करा अशी माझी मागणी आहे. ती पण रक्कम कमी आहे. आठवड्याभर आम्ही कॅल्क्यूलेटर घेउन बसलो आहोत आणि प्रत्येक अधिकाऱ्यांच्या नावाने वसुली दिलेली आहे. लिहा तुम्ही ते आम्ही माफ केले पाच लाख रूपयाची वसुली आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, इकडचे-तिकडचे अधिकारी, नगरसेवक जेलमध्ये जात आहेत. आम्हाला नाही या पापाला भागीदार बनायचे. अधिकारी जे आयुक्तांची स्तुती करता त्यांनी तुमच्यापासुन सगळं लपवून ठेवले आहे. ही सत्य परिस्थिती कशाला नाकारायची आणि मोहन पाटील साहेब मी तुमच्या चांगल्याचे बोलतोय. आपण कोण व्यक्तिगत दुश्मन नाही. इथे बिचारे जे बाकीचे नगरसेवक बसले आहेत त्यांचे ह्याच्याशी काही देणे-घेणे नाही. तेही लटकतील जर ह्याच्यावर ठराव मंजुर केला तर? सेंट्रल ऑडीटचे ताशेरे आहेत आणि ह्याच्यावर त्यांनी ओपिनियन दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

पण माझे म्हणणे असे आहे की, अंदाजपत्रकाची मंजुरी घेउन आपण जे बोलला आहात आणि त्यांनी त्यावर मंजुरीचा विषय मांडलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

वसुली याविषयावर मी बोलत आहे. परत एकदा मला बोलू द्या. ऑडीट वसुली ह्याच्यावर साहेब, तुम्ही आमची मंजुरी मागत आहात आणि पाच लाखाची आयुक्त साहेबांनी तरतुद केली आहे. अधिकाऱ्यांकडून तुम्हाला चार, साडेचार करोड रूपये वसुल करायचे आहेत आणि रिपोर्ट माझ्याकडे आहे त्याचे बोला. नियमाचे बोला. कायद्याचे बोला.

**आसिफ शेख :-**

पण ती प्रशासनाची बाब आहे. रक्कम वसुल करायचे हे बरोबर आहे आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत. पण ती प्रशासकीय बाब आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासकीय नाही. जर प्रशासकीय बाब असती तर? हे प्रकरण स्थायी समितीपासून ही लपवून ठेवले होते. ह्याच्यावर सगळ्या नगरसेवकांचा हक्कभंग आला पाहिजे. हे एवढे मोठे प्रकरण स्थायी समितीपुढे द्यायला पाहिजे होते. ह्या ज्या अग्रीम आहेत, त्या वसुल केलेल्या नाहीत. कुठल्या ठेकेदाराला दिले आहेत? जवळ जवळ चार करोडचा फिगर शेवटला येत आहे. हे आपल्या लेखा विभागाचे पत्र आहे आणि हे तुमच्यापासुन लपवून ठेवलेले आहे आणि नाही ते फिगर दिलेले आहेत. आणखीन एक आयुक्त साहेबांनी केलेली करामत मी तुम्हाला सांगतो, ह्या ह्याच्यामध्ये तुमच्याकडून जेव्हा त्यांनी हे स्थायी समितीला दिले त्यावेळी.........

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, सदर विषयाचा खुलासा अधिकारी करतील.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मला आणखीन एक मुद्दा सांगायचा आहे. आयुक्त साहेबांनी स्थायी समितीला दिलेले फिगर ह्याच्यात किती तफावत आहे हे आपणाला सांगतो. पान क्र. ३ आणि ४ यामध्ये एक बाजार लिलाव फी यामध्ये आयुक्तांचे अंदाज १६५ दाखवले आहे. पान क्र. ४ वर (क) - १ नगरपालिकेच्या मालमत्ता आणि उपयोगिता सेवा ह्यांच्यातुन मिळालेले महसुल आणि कर आकारणी व्यतिरिक्त इतर शक्ती. एक नंबर बाजार लिलाव आणि बाजार फी यामध्ये स्थायी समितीला जेव्हा अंदाजपत्रक सादर केले तेव्हा आयुक्तांचे अंदाज फक्त १६५ एवढे होते आणि जे तुमच्याकडे आता आले आहे त्याच्यामध्ये २१० आहे. म्हणजे आयुक्त साहेबांचे अंदाज बदलले का? आयुक्त साहेबांचा अंदाज हा कायम असतो स्थायी समिती ते बदलतात आणि मा. महासभेमध्ये आणखीन बदलतात. फायनल मा. महासभा करते. हे जे २१० दिलेले आहे. ह्यात ४५ लाखची जी काही दिशाभूल झालेली आहे. त्याची ॲडजेस्टमेंन्ट कुठे गेली? त्या ॲडजेस्टमेंन्टचे पहिल्यांदा आयुक्त साहेबांकडून उत्तर येउ द्या.

**जयंत पाटील :-**

खुलासा नंतर द्या, हरकत नाही. अध्यक्ष महाशय, खर म्हणजे अर्थ संकल्पावरील सभेला सर्व पक्षाने हजर राहायला पाहिजे. हजर असायला पाहिजे. असा एक संकेत आहे. हे शहर सुंदर व्हावे, सुदृढ व्हावे, इथल्या लोकांचे आरोग्य सुधारावे, रस्ते चांगले व्हावेत, गटार चांगले असावेत अशी सभागृहातील सर्व नगरसेवकांची भावना आहे. नगरपालिका ज्यावेळेस निर्माण झाली, त्यावेळेस कवी वृत्तीचे आमचे एक नगरसेवक आजही सभागृहामध्ये आहेत, श्री. लिओ कोलासो (सर), कारण बरेचसे नगरसेवक नविन आहेत. आयुक्त साहेब नविन आहेत, मा. महापौर मॅडम सुद्धा नविन आहेत. त्यांनी त्यावेळेस केलेली कविता आजसुद्धा मला आठवते आणि ते स्वप्न या शहरातील सर्व जनतेचे आहे, सर्व नगरसेवकांचे आहे.

हिरवे डोंगर निळे सागर,<br>
शुभ्र मिठागर<br>
सुंदर बनवूया, मिरा भाईंदर.

ही कविता सन्मा. लिओ कोलासो (सरांनी) त्यावेळेस केली होती. आज सुद्धा सर्वांची भावना तीच आहे. हे शहर सुंदर व्हावे, सुदृढ व्हावे. या इथल्या लोकांचे आरोग्याचे रक्षण व्हावे. अशी सगळ्यांची भावना आहे आणि ह्या गोष्टी करत असताना आज जगन्नाथाचा रथ ओढत असताना सर्वांचा हातभार लागावा अशी सगळ्यांची भावना आहे. ज्याने रामाच्या नावावर राज्य केले. ज्याने रामाचे नाव घेउन केंद्रामध्ये सरकार आणले. ते आज या सभागृहामध्ये नाही. रामाने ज्यावेळेस लंकेवर दोनवेळा स्वारी केली. त्यावेळेस सेतु बांधताना खारीचा सुद्धा वाटा लागला होता असे आपण म्हणतो. परंतु, हे रामाचे नाव घेणार ह्या सभागृहामध्ये नाही. याचे अतिशय दुःख होत आहे. कुठल्या कारणाने ते या सभागृहातून गेले हे अजुनपर्यंत कळलेले नाही. त्याचा फक्त नावाला विरोध होता. इतर गोष्टीला त्यांचा काही विरोध नव्हता. परंतु, सन्मा. सदस्य गजानन भोईर ह्यांचे नाव तिथे आहे. खर्चाच्या आणि जमेच्या बाजुला त्यांचा विरोध नव्हता. ह्याच गोष्टीला यांचा विरोध होता. असु दे. या शहरातील लोकांच्या आरोग्यासाठी काही सुचना मी येथे करत आहे. खरं म्हणजे आपला खर्च कमीत कमी कसा होईल हे आपण अगोदर पाहिले पाहिजे. आपण घेतलेले कर्ज पाण्यासाठी घेतले की, इतर गोष्टीसाठी घेतले. आमच्या स्थायी समितीमध्ये हा विषय आला होता. श्री. बेलवटे ह्यांनी त्याविषयावर चर्चा केली आहे. एम.एम.आर.डी.ए.च्या कर्जाचे आज आपण अकरा टक्क्याने व्याज देत आहोत. म्हणजे आपण जे मुद्दल देतो त्या मुद्दलीपेक्षा आपले व्याज जास्त जात आहे. ओरियन्टल बँकेने साडे आठ टक्क्याने पुन्हा कर्ज देउन त्याच्यावर इंटरेस्ट आकारणार तेव्हा अशा तऱ्हेने कर्ज जर आपल्याला घेता आले तर आपला बराचसा व्याज वाचेल. आजसुद्धा आपल्याला करोडो रुपये कर्ज रूपाने द्यायचे आहे. त्याच्यामुळे आपले प्रचंड खर्चामध्ये बचत होईल आणि तो वाचलेला पैसा इतर ठिकाणी आपल्याला त्याचा उपयोग करता येईल. आम्ही बऱ्याचशा ठिकाणी ज्या ज्या गोष्टींची मागणी केलेली आहे. स्थायी समितीचे अंदाज वर्तविले आहेत, जमिनीवरील इमारतीवरील कर ४० कोटी. मला वाटते, मघाशी आपण वाढवले आहे. प्रशासनाने ह्या गोष्टीकडे जर लक्ष ठेवले तर आपल्याला प्रचंड प्रमाणामध्ये कर मिळू शकेल. या शहरामध्ये इमारतींची खुप

प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे. अनधिकृत इमारती बांधकाम आपण टोटली बंद केले पाहिजे. आयुक्त साहेब, अनधिकृत इमारतींमुळे आपल्याला बेटरमेंट चार्ज मिळत नाही. शासनाचा एन.ए. च्या रुपाने जाणारा टॅक्स हासुद्धा शासनाला मिळत नाही. तर अनधिकृत बांधकाम कसे बंद करता येईल हे संपूर्णपणे पाहणे आपले काम आहे. त्या दृष्टीने आपण कडक पावले उचलायला पाहिजे. जाहिरातीवरील कर हा सुद्धा वाढवायला खुप चान्स आहे कारण आपले रस्ते वाढत आहेत. त्याप्रमाणे जाहिरातीवरील महापालिकेचा कर वाढला जाईल. बाजार लिलावाकडे आपण खास लक्ष ठेवायला पाहिजे. कारण बाजार इकडे आपले जे ठेकेदार आहेत ते एकोबा करून जो लिलाव केला जातो त्याकडे जर आपण लक्ष ठेवले तर आपल्याला बाजार लिलावामार्फत जास्त प्रमाणात किंमत मिळू शकेल व बाजार लिलावामध्ये आपला जास्त फायदा होउ शकेल. आपण त्याकडै खास लक्ष द्या. घनकचरा व्यवस्थापन हा शहरातील खूप मोठा बिकट प्रश्न आहे. डॉ. बावस्कर साहेब आले व गेलेही तरी काही झालेले नाही. चार करोड साठ लाखाची तरतुद आम्ही केलेली आहे. आपण ह्याकडे जातिने लक्ष द्या आणि आज हे जे डम्पींग ग्राउन्ड आपण शहरामध्ये चालवलेले आहे. ते बंद करुन टाका आणि घनकचरा निर्मूलनाकडे आपण तातडीने लक्ष द्या. या शहरामध्ये ज्या ठिकाणी जातो. त्या त्या ठिकाणी आम्हाला ह्या मागण्या ऐकाव्या लागतात. एक कोटी पस्तीस लाखची आपण तरतुद केलेली आहे. तरतुद चांगल्या तऱ्हेने आहे. ह्या तरतुदीचा लवकरात लवकर कसा वापर करता येईल ह्यासाठी आपण लक्ष द्यावे. आमदार निधी आपण फक्त पन्नास लाख रूपये एवढी रक्कम दाखवलेली आहे. आपल्या शहरामध्ये तीन आमदार आहेत. मा. मुझफ्फर हुसेन साहेब, मा. डावखरे साहेब आणि पालकमंत्री आहेत. आपला आमदार निधी वाढवायला पाहिजे. आपण त्यांना मागणी करा आणि हे जे आता गेले, मला वाटते त्याचा सहकारी पक्ष शिवसेनेवाले आहेत. त्यांचे खासदार येथे आहेत. फक्त आपण आमदार निधी दाखवली आहे पण खासदार निधी त्यांनी दाखवलेले नाही. खासदारांकडून आपल्याला निधी मिळत नाही का?

**आसिफ शेख :-**

खासदार निधी वापरत नाही. आपण नगरसेवक निधी वापरतो. खासदार निधी वापरतच नाही.

**जयंत पाटील :-**

आपल्याला त्यांच्याकडून निधी मिळाला पाहिजे. आपण तशी मागणी केली पाहिजे. आपण सभागृहाने मागणी केली पाहिजे आणि योगायोगाने सगळे आमदार आपले आहेत. प्रचंड निधी ह्या शहरामध्ये आला पाहिजे. मॅडम, ह्याची आपण नोंद घ्या. अग्निशमन दल हे अद्यावत व्हायला पाहिजे. अग्निशमन दलाला आपण अतिशय कमी तरतुद केली म्हणजे एखादे वाहन आखले तर पन्नास लाख रूपये असेच निघून जातील. तर अग्निशमन दलासाठी आपण एक करोडची तरतुद करावी. अशी मी आपल्याला विनंती करत आहे. २८ जुलै रोजी जो प्रलय झाला होता त्याची नोंद आपण घेतली नाही आणि आपत्कालिन निवारण निधीसाठी ५९ लाखची तरतुद आपण केलेली आहे. मला वाटते, त्याच्यात आता आपण वाढ केली आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, सन्मा. जयंत पाटील (दादा) साहेब आपण स्थायी समितीमध्ये सदस्य आहात. हे सर्व वाढ आपण स्थायी समितीमध्येच करायला हवे होते. इथपर्यंत यायला नको असे माझे म्हणणे आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य आपल्या म्हणण्याशी मी सहमत आहे. पण त्यांच्या नंतर जर मला काही ज्ञान आले असेल तर ते मांडायला काही हरकत नाही. मॅडम, या शहरामध्ये उद्याने व्हावीत. मघाशी मी कविता ह्याच्यासाठी वाचून दाखवली, हे शहर जर सुंदर करायचे असेल तर उद्याने आणि मैदाने ह्या दोन गोष्टी व्हायला पाहिजे. आपण तरतुद केलेली आहे. ७५ लाखाची तरतुद सार्वजनिक उद्यानाकरिता आहे. ही तरतुद कमी आहे. आपल्या ह्या शहरामध्ये उद्याने वाढायला पाहिजेत. तरच हे शहर सुंदर होईल. लोकांना श्वास घेता येईल. लोकांना त्याचा फायदा घेता येईल. भाईंदर पश्चिमेला फक्त एकच मैदान आहे. सुभाषचंद्रबोस मैदान पण भाईंदर पुर्वेला कुठल्याही तऱ्हेचे मैदान नाही. आपल्याकडे रिझर्वेशन आहे. मैदानासाठी आपण ५० लाखाची तरतुद केलेली आहे ती सुद्धा कमी आहे ती रक्कम एक करोड रूपये एवढी वाढवावी.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील (दादा) आपल्या वक्तव्यामध्ये डिस्र्टब करतो. बगीचे आणि उद्याने याचा ७५ लाखाचा जो उल्लेख केला त्यामध्ये आणखीन वाढ करा आणि भाईंदर पश्चिमेला हे जे आरक्षण क्रमांक दिलेले आहे त्याच्यामध्ये ९० क्रमांकाचे जे आरक्षण आहे त्याचा देखील ह्यात समावेश करावा असे मी मा. महापौरांना विनंती करतो.

**जयंत पाटील :-**

आपली सुचना चांगली आहे. मैदाने आणि उद्याने शहरात व्हायला पाहिजे. टी.व्ही वर जेव्हा कपिल देव ह्यांचे निवेदन चालू होते व ते बोलत होते ते पाहिले. जेव्हा ते पहिल्यांदा ऑस्ट्रेलियामध्ये गेले आणि त्यांनी विमानातुन ऑस्ट्रेलियामध्ये पाहिले तर जिथे - तिथे त्यांना मैदान दिसत होती. अशा तऱ्हेचे मैदाने आपल्या शहरात व्हायला पाहिजे. आपल्या शहरात खुप खेळाडू तयार होत आहेत त्यांना सुविधा मिळण्यासाठी,

आयुक्त साहेब मी एकदा चर्चेमध्ये असे बोललो होतो त्यावेळी आपण बोललात की, आपल्या भाईंदर पुर्वेच्या लोकांना सुभाषचंद्र बोस मैदानावर खेळायला पाठवा. त्या गोष्टी शक्य नसतात. त्या ठिकाणी मैदाने व्हायला पाहिजे. आपण प्रत्येक वर्षी महापौर चषक भरवतो तर आपण त्या गोष्टीकडे जास्त लक्ष द्या. ह्या माझ्या सुचनांचा आपण विचार करावा आणि जरूर त्याप्रमाणे कार्यवाही करावी. अशी मी आपल्याला विनंती करतो. जय हिंद!

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आजच्या २००६-०७ च्या बजेटवर सर्व पक्षाच्यावतीने अतिशय चांगली चर्चा झालली आहे आणि अजुन पुढे होणार आहे. हसत खेळत सर्व पक्षाचे सभासद, सदस्यांनी सहभाग घेतलेला आहे. फक्त बी.जे.पी. सोडून सर्व पक्षाचे सदस्य या ठिकाणी आहेत. मा. महापौर मॅडम, मी आपल्याला असे सुचित करत आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये स्मशान भूमी अनेक ठिकाणी आहे. काही स्मशानभूमीमध्ये विकास कामाची चांगली गती आलेली आहे. काही चांगली विकास कामे झालेली आहेत. जोगर्स पार्क सारख्या ठिकाणी आणि बंदरवाडी स्मशानभूमी अतिशय सुशोभित झालेली आहे. मी आपल्याला सांगतो नवघरची स्मशानभूमी आणि गोडदेवची स्मशानभूमी अजुन देखिल वाईट अवस्थेमध्ये आहे आणि आपल्या ह्या बजेटमध्ये स्मशानभूमीसाठी दहा लाखाची तरतुद केलेली आहे. मा. महापौर मॅडम, दहा लाखामध्ये ह्या दोन्ही स्मशानभूमी व इतर ह्या वर्षामध्ये जी काही कामे निघणार आहेत तर दहा लाखाच्या तरतुदीमध्ये काही होणार नाही. स्मशानभूमीच्या तरतुदीमध्ये वाढ करावी आणि नवघरची स्मशानभूमी आणि गोडदेवची स्मशानभूमी महानगरपालिकेने त्वरीत सुशोभित करण्याचे काम हातामध्ये घ्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य नलावडे साहेब ते बी.ओ.टी. तत्वावर दिले आहे. आदर्श सेवा मंडळ ते तयार करत आहेत. आपला त्याच्याशी संबंध येत नाही. आपले जे स्मशान आहे त्यासंबंधी आपण बोला. नवघर स्मशानाच्या येथे आम्ही परवाच्या दिवशी गेलो होतो. आणि ते अतिशय चांगले स्मशान झाले आहे. सन्मा. सदस्य नलावडे साहेबांनी ते पाहिले नसेल. चांगल्या तऱ्हेने त्याचे डेव्हलपमेंट चालू आहे.

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, मी ते पाहिले आहे आणि अजुनही ते काम करण्याची आपल्याला आवश्यकता आहे ते काम झाले पाहिजे. कारण गेल्या तीन वर्षापासून आपली ह्या विषयावर चर्चा चालू आहे. तसेच, मा. महापौर मॅडम, आपण भरपूर विकास कामावर लक्ष दिलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका विकास कामामध्ये आघाडीवर आहे. आज तीन चार वर्ष झाली. जेसल पार्क ते भाईंदर वेस्ट सब-वेसाठी या महानगरपालिकेमध्ये प्रत्येक बजेटवर आपण चर्चा करतो. परंतू अजुनपर्यंत सबवेसाठी आपण कुठल्या प्रकारचे काम केले आहे ह्याची ह्या सभागृहाला कल्पना मिळालेली नाही. आज छोट्या छोट्या गाड्यांसाठी आपल्याला पुलाचा वापर करावा लागतो. सर्वांना फिरून यावे लागते. लवकरात लवकर सब-वे व्हावा असे या महानगरपालिकेची आणि येथिल जनतेची इच्छा आहे. हे फार महत्वाचे काम आहे. त्यानंतर मा. महापौर मॅडम, मी आपल्याला सांगू इच्छितो की, बांधकाम विभाग अतिशय चांगले आहे. तसेच, बाकीचे सगळे विभाग चांगले आहेत. परंतू, टॅक्स विभागाचा जर आपण विषय घेतला तर टॅक्सवर कमीत कमी दहा दिवस लागतील. एवढ्या त्याच्यामध्ये त्रुटी आहेत. आज टॅक्सचा भरणा करताना, मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लोकांना अतिशय मोठ्या प्रमाणामध्ये त्रास होत आहे. गेल्यवर्षी जर नाव बरोबर आले असेल तर दुसऱ्या वर्षी त्या नावामध्ये बदल होतो. आज आपल्या येथे संगणकीकृत झालेले आहे. प्रत्येक वेळेला प्रत्येक वेळेला प्रत्येक ठिकाणी अशी माहिती मिळते आणि ह्याच्यामधून भ्रष्टाचाराला वाव मिळत आहे. टॅक्स विभागामध्ये जे काही अधिकारी आहेत, ते ॲक्टीव्ह नाही. मार्च संपल्यानंतर ते ॲक्टीव होतात. नाईक साहेब असताना हे काम अतिशय चांगल्या प्रकारे चालू होते. मार्च अगोदर सगळा भरणा होत होता. कमिशनर साहेब, आपण टॅक्स विभागावर पूर्णपणे लक्ष द्यावे. टॅक्स विभाग हा खरोखरच अतिशय मागासलेला दिसतोय. आज मिरा भाईंदर शहरातील सर्व सामान्य जनता हैराण झालेली आहे. टॅक्स भरताना तीन-तीन, चार-चार वेळा काम सोडून टॅक्स भरायला यावे लागते. आज वीस टक्के टॅक्स भरणा केलेला असताना देखील काही बिल्डींगचे कनेक्शन जबरदस्तीने कापले जातात. आम्ही सदस्य या नात्याने मा. महापौर मॅडम सांगू इच्छितो की, या शहरामध्ये जर ऐंशी टक्के टॅक्स भरणा होत असेल तर बिल्डींगचे एकही कनेक्शन आम्ही कापू देणार नाही. असे करणे चुकीचे आहे. लोकांना हैराण करण्याचे हे काम आहे. ज्या तीन-चार व्यक्तींचा सोसायटीमध्ये टॅक्स भरणा जर बाकी असेल तर त्यांच्यावर महानगरपालिकेने कार्यवाही करावी. त्या अधिकाऱ्यांने त्यांच्यावर कार्यवाही करावी पण संपूर्ण त्या सोसायटीला हातामध्ये घेउन त्यांना त्रास देण्याचे काम महानगरपालिकेचे जर अधिकारी करत असतील तर आम्ही सदस्य या नात्याने त्यांना माफ करू शकत नाही. असे झालेले आहे. आपण प्रत्यक्षात पहा. ऐंशी टक्के भरणा केलेला असतानाही सोसायटीचे कनेक्शन कापलेले आहे. ते कनेक्शन परत ज्वॉइंट करताना त्याच्यामध्ये आपल्याला भ्रष्टाचार दिसुन येईल. पावती फाडलेली दिसत नाही. अशाप्रकारे टॅक्स विभागामध्ये सर्व आंधळा कारभार चाललेला आहे. आपण निच्छितपणे डोळे झाप करून चालणार नाही. ह्या महानगरपालिकेतील रहीवाशांना न्याय मिळाला पाहिजे. अशा काही त्रुट्या आहेत. त्याप्रमाणे आज शहरात

स्मशानभुमी वगैरे सगळं आहे. मिरा भाईंदर शहरामध्ये सर्व जातीधर्माचे लोक रहात आहेत. आज पर्यंत येथे अतिशय गुण्यागोविंदाने जनता रहाते. नवघर स्मशान भूमी आहे त्याच्या पाठीमागे कबरस्तानचे रिझर्व्हेशन प्लॉट आहे. मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, तिथे कबरस्तानचे रिझर्व्हेशन आहेत आणि आर. डी. शिंदे साहेब असताना ती जागा हस्तांतरित करून घेण्यासाठी गेले. तीन वर्षापासुन त्यांनी मागणी केलेली होती. त्या जागेचे पैसे भरले. आज ती कबरस्तानची जागा रिझर्व्हेशन असताना त्या ठिकाणी सी.आर.झेड. कसा लागला? सी.आर.झेड. लागलेला आहे आणि भाईंदर पुर्वेमध्ये बोरी समाज, मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात असताना त्यांना आज तिथे जागा नाही. त्यांना सगळीकडे वणवण फिरावे लागत आहे. त्यांच्याकडे जर कुठला एखादा मुद्दा असेल तर मिरारोडच्या येथील स्मशानभूमीत घेतला जात नाही. साहेब, ह्या ठिकाणी असा प्रकार घडतो म्हणजे त्यात आपल्या शहराचा अपमान आहे. जर एवढे विकसित होत नसेल तर उद्याला मोठा भयंकर प्रकार ह्या शहरामध्ये नामुष्कीला येउ शकतो. तो समाज निच्छितपणे आपल्या महानगरपालिकेकडे मोर्चा घेउन येण्याच्या तयारीमध्ये आहे आणि एवढ्या छोट्या कामाकरिता आपल्या महानगरपालिकेमध्ये वाद होउ शकतो. म्हणून कमिशनर साहेब, आपण तिथे लक्ष देउन निश्चितपणे ह्याच्यावर पाठपुरावा करावा आणि ह्या बजेटमध्ये तरतुद करुन त्यांना न्याय द्यावा. एवढेच मी आपल्याला सांगू इच्छितो.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छितो की, सन २००२-०३, २००३-०४ आणि २००४-०५ या वर्षामध्ये सर्व साधारण करामध्ये जी तफावत दाखवलेली आहे. तर आपल्याकडे अधिकारी हे सक्षम नाहीत का? का, आपण कुठे कमी पडतोय? प्रशासन कमी पडतोय का? ह्या मध्ये तफावत का? की, आयुक्त साहेबांचे अंदाज खोटे ठरले का? एवढी तफावत का झालेली आहे? ह्याचा खुलासा करून द्यावा आणि नाट्यगृहासाठी आपल्याकडे जागेचे आरक्षण आहे की नाही?

**हॅरल बोर्जिस :-**

सन्मा. सदस्या तरतुद ठेवली आहे.

**शुभांगी नाईक :-**

मग नाट्यगृह होणार कधी? नाट्यगृह बांधायला सुरूवात करा. मुर्हूत करुन टाका आणि लवकरात लवकर नाट्यगृह होउ दे. मला खुलासा करुन द्या की करामध्ये एवढी तफावत का?

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही जे बोललो त्याच्यावर रूलिंग वगैरे, काय पद्धत? मा. महापौर मॅडम, याबाबत नाही अधिकाऱ्यांनी खुलासा केला किंवा नाही, तुम्ही रूलिंग दिली?

**शुभांगी नाईक :-**

करामध्ये एवढी तफावत का? त्याचा अगोदर खुलासा करा.

**सुधीर नाकाडी :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी जो खुलासा विचारला आहे, त्या संबंधी अशी माहिती आहे की, सन २००१ साली महाराष्ट्र शासनाचे मुख्य लेखापरिक्षक स्थानिक विधी लेखा ह्यांनी जे ऑडीट केले होते ते सन १९८५ ते २००२ म्हणजे महापालिका स्थापन होईपर्यंत त्यांनी हे असे विषेश ऑडीट करावे याकरिता येथूनच तत्कालिन नगरपालिकेने गर्व्हरमेंटला पत्र लिहिले होते. त्याच्यानंतर त्यांनी ऑडीट करून रिपोर्ट सादर केला होता. त्यांनी ज्या रक्कमा सांगितल्या आहेत त्या रक्कमा सध्या आक्षेपाधिन आहेत आणि त्याचे कम्प्लाईन्स अजुन दिलेले नाही. त्या कम्प्लाईन्स दिल्यानंतर जर त्यांनी कम्प्लाईन्स अमान्य केलेतर त्या रक्कमा संबंधितांकडून वसुल करायच्या आहेत आणि जर त्या त्यांनी मान्य केल्या तर ते त्यातुन वजा होतील. त्याच्यानंतर ए.जी. चा जो रिपोर्ट सध्या २००२ ते २००४ या दोन वर्षात त्यांनी ऑडीट रिपोर्ट सादर केलेला आहे. त्याचा अहवाल प्राप्त आहे तो अहवाल आणि ह्या वर्षाचा ॲन्युअल रिपोर्ट हे दोन्ही रिपोर्ट मागील मा. महासभेमध्ये मा. प्रफुल्ल पाटील साहेब व मिलन म्हात्रे साहेबांनी सांगिते होते त्याप्रमाणे स्थायी समितीपुढे मा. सचिवांनी त्याचे वाचन केलेले आहे. तो अहवाल स्थायी समितीसमोर येईल व त्यांच्यानंतर प्रशासन अहवाल आणि जमा खर्चाचा ताळमेळपत्रक ह्याच्यासह प्रत्येक सदस्याच्या घरी पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

पण आता आपण फक्त पाच लाख रुपयाची वसुली दाखवत आहात, त्याचे बोला. वसुली ही योग्य आहे का अयोग्य?

**सुधीर नाकाडी :-**

ऑडीट वसुली जी आहे ती मागील जुन्या काळातील होती ती तशीच आहे आणि फक्त कॅरीफॉरवर्ड झालेली आहे. ह्या वर्षी ऑडीटमधुन आपण जी काही वसुली जमा करणार आहोत त्यावेळेला आपण ते जनरल फंडामध्ये जमा करतो.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे म्हणणे आहे की, चार करोड पन्नास लाख रूपये दाखवा आणि आपण पाच लाख रुपये दाखवले आहे. हा जो डीफरन्स आहे मी म्हणतोय ते अयोग्य आहे आणि आपण म्हटलेले योग्य आहे का?

**सुधीर नाकाडी :-**

आपण जे चार कोटी पन्नास लाखाचे म्हणता तर चार कोटी पन्नास लाख ही आक्षेपाधन आहे. ती रक्कम सगळी वसुलपात्र नाही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, गेल्या पंधरा वर्षापासुन तेच चालले आहे. मी वर्ष वाचुन दाखविली.

**सुधीर नाकाडी :-**

त्याचे कम्प्लेसींग अजून दिलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

या रिपोर्टमध्ये आपल्या चीफ ऑफीसरने सह्या ही केलेल्या नाहीत. अधिकाऱ्यांच्या सह्या नाहीत. यांनी हा देखील आक्षेप घेतला आहे.

**सुधीर नाकाडी :-**

तेच आक्षेप आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्या चीफ ऑफीसरने सही केली नाही. ज्यादिवशी आमच्या सारखे लोक जाउ पुढे तर जातील मग ते बाराच्या भावात. पण ते आम्हाला जायचे नाही. आमचे म्हणणे असे आहे की, या बजेटमध्ये आपण साडेचार करोड रुपयाची वसुली ठेवा. ऑडीट वसुली ठेवा. हे मान्य नसेल तर तसे आपण आम्हाला सांगा की, हे आम्हाला मान्य नाही.

**सुधीर नाकाडी :-**

साडे चार करोड रूपये वसुल करायला आमची हरकत नाही पण अजुन आक्षेपार्ह आहे.

**मिलन म्हात्रे :-**

समजा उद्या तीन महिन्यात झाले तर?

**सुधीर नाकाडी :-**

कम्प्लाईन्स झाल्यानंतर वसुली होणारच आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

ही प्रोव्हीजन आहे. हे अंदाजपत्रक आहे. आयुक्तांचे अंदाज, स्थायी समितीचे अंदाज, मा. महासभेचे अंदाज, तसा आमचा अंदाज आहे. पुढच्या तीन महिन्यात जर काही गडबड झाली तर वसुली होईल का होणार नाही? एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याने ह्याच्यावर कार्यवाही केली........

**सुधीर नाकाडी :-**

अंदाजीत प्रोव्हीजन नसली आणि वसुली झाली त ती हेडलाईन आहेच ना. हेड तर ओपन आहेच ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्यात तुम्ही हे टाका आणि आणखिन ओपन करा. पाचाचे साडे चार करा एवढेच ओपन करा. बाकी मी काही बोलत नाही आणि ते नसेल तर तसे कळवा की आम्ही करु शकत नाही. तो ओपन कसा करायचा तो आम्ही करु. तेवढे करा. जमेची बाजू आहे आणि आम्ही काही महानगरपालिकेच्या नुकसानीचे बोलत नाही. अधिकाऱ्यांचे वसुल करायचे आणि आपल्या ट्रेझरीत टाकायचे. हे अधिकारी वसुल करणार आहेत.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी जो मागच्या वसुलीचा आपल्याकडे प्रश्न उपस्थित केलेला आहे. तर त्या विषयानुसार ऑडीट हे किती साली झाले आणि त्या ऑडीटचा आता रिपोर्ट काय आलेला आहे आणि त्या ऑडीटरने आपल्याला काय रिपोर्ट दिलेला आहे आणि त्या ऑडीटरचा रिपोर्ट आल्यानंतर आपण त्याच्यावर काय अंमलबजावणी केलेली आहे? वसुली करणार की, ती वसुली केली नाही म्हणून त्यांना सस्पेंन्ड करण्यात येणार आहे? असे काही नमुद केले असेल की, नाही? इतके वर्षापासुन बचत होत आहे आणि ह्या बजेटमध्ये चार करोड पन्नास लाख रूपये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांच्या म्हणण्यानुसार ते यायला पाहिजे होते. ते का आले नाही? हे चुकीचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

१० जानेवारी, २००३ ला हा रिपोर्ट दाखल केलेला आहे आणि आता आपण २००६ मध्ये आहोत.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य आपण आता जो खुलासा केला त्याचे ऑडीट किती साली झाले?

**मिलन म्हात्रे :-**

सन २००३ साली ऑडीट झाले. साहेब, माझे दुसरे काही म्हणणे नाही. विरोधी पक्षनेते ह्यांची जी मागणी आहे त्याला माझे स्वतःचे अनुमोदन आहे. त्यांना मी बोलतो, त्यांचे मला अनुमोदन आहे. प्रश्न असा आहे की, विरोधी पक्षनेते आहेत त्यांनी बरोबर म्हटलेले आहे. १० जानेवारी, २००३ ला आपल्याला हा रिपोर्ट मिळाला. मग आलेले अधिकारी कमिशनर वगैरे जे कोणी कॅफो वगैरे आणले. प्रतिनियुक्तीवर एवढे अधिकारी आणले. हे अधिकारी अकार्यक्षम आहेत का? ह्यांनी कधी पाने चाळून बघितली का, तर नाही. हा रिपोर्ट

आमच्या कोणत्याही सदस्याला दिला आहे. का ते विचारा. सत्ताधारी पक्षातील नगरसेवकांना दिलेला आहे का ते विचारा. तो रिपोर्ट का दिला नाही. हे पब्लीक डॉक्युमेंन्ट आहे आणि आम्ही असे म्हणतो की, पुढच्या तीन महिन्यात जर वसुली झाली तर तुम्हाला काय नुकसान आहे?

**परशुराम पाटील :-**

आता जे आपण स्थायी समितीला देणार आहात तर ते स्थायी समितीसमोर यायला पाहिजे होते, त्यांना तो अहवाल दाखवायला पाहिजे होता. स्थायी समितीसमोर द्यायला पाहिजे होते की, एवढी रक्कम पेंन्डीग आहे आणि ती ह्या ह्या अधिकाऱ्यांकडून येणे बाकी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला रिपोर्ट दिलेला नाही.

**परशुराम पाटील :-**

ह्या स्थायी समोर दिलेला आहे की, कोणत्या स्थायी समितीसमोर दिलेला आहे?

**सुधीर नाकाडी :-**

अगोदरच्या ही स्थायी समितीला दिलेला आहे आणि आता ही द्यायचा आहे तो सचिवांकडे आहे.

**परशुराम पाटील :-**

आता दिला का?

**सुधीर नाकाडी :-**

आता दिलेला आहे तो सचिवांकडे आहे.

**परशुराम पाटील :-**

आताचे बजेट पास झाल्यानंतर आपण देणार आहात का?

**सुधीर नाकाडी :-**

तो ॲन्युअल रिपोर्ट असतो.

**परशुराम पाटील :-**

साहेब आपण तो अगोदरच द्यायला पाहिजे होते. आता आपण बजेट मंजुर करणार आणि स्थायी समितीला केव्हा देणार? मग ही अशी परंपरा वर्षानुवर्षे चालू राहणार. सरकारी काम आणि वर्षभर थांब.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीची जेव्हा मॅरेथॉन चर्चा चालू होती त्यावेळी आपण हे सर्व द्यायला पाहिजे होते

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, सदर विषय हा स्थायी समितीसमोर आला होता आणि अहवालची प्रत सभा चालू असताना देणार असे सांगितले होते. तसेच, मागे मी आरोग्य विषयी उपोषणाला बसली होती. त्याचाही अहवाल नंतर गायब झाला. अशा ऑडीट रिपोर्टचा अहवाल आपण आम्हाला स्थायी समोर चर्चेला देणार असा विषय जरुर होता. परंतु, तो अहवाल आजपर्यंत आम्हाला दिलेला नाही आणि त्या विषयावर आजपर्यंत कुठलीही चर्चा झालेली नाही. हे कशाला लपवालपवी चालली आहे. आता परत पेपरात वाचले की प्रभागाचा ही अहवाल गायब झालेला आहे. म्हणजे मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये अहवाल नेमके कोणी चोरी करतो? हा महत्वाचा विषय आहे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, ह्या ठिकाणी ऑडीट रिपोर्टची तारिख सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी सांगितली. १० जानेवारी, २००३ आणि आता जानेवारी, २००६, ओलांडून गेलेले आहे. त्यानंतर त्या रिपोर्टचा जो खुलासा महापालिकेच्यावतीने शासनाला सादर करायचा असतो तो रिपोर्ट सादर केलेला आहे की नाही आणि त्या अहवालात जे दोष दाखविलेले आहेत त्याचा खुलासा आपण केला किंवा नाही आणि त्यांच्याकडून काय उत्तर आले? तर ते उत्तर आल्यानंतर आपण करू असे सांगता. तोपर्यंत ज्या अधिकाऱ्याकडून वसुली व्हायची आहे. ते अधिकारी रिटायर्ड होतील आणि त्यांचे पेन्शस, फंड सर्व देउन आपण मोकळे व्हाल मग काय करत बसणार. ह्याला जबाबदार कोण राहणार? आयुक्त साहेब, जवळ जवळ पैसे कधी वसुल होणार? आज ह्या गोष्टीला तीन वर्ष झाले आणि आज आपण ऑडीटरकडून पूर्ण निर्णय घेतलेला नाही की, ॲक्शन वगैरे काय करायचे आहे? असे आपण किती वर्ष घालवणार. परत पुढच्या तीन-चार वर्षातील काही दोष असतील. तर आपण सांगता की, पुढे जे ऑडीट होणार आहे २००४ पर्यंत, त्याचा रिपोर्ट आल्यानंतर सादर करू वगैरे तर मागील जो रिपोर्ट आला आहे त्याचे काय झाले? हे सर्व रिपोर्ट दाबले जात आहेत. ह्यात प्रशासनाला एकमेकाला पाठीशी घालणे असा काय प्रकार आहे का? या गोष्टी सभागृहात विचार होणे गरजेचे आहे ह्या गोष्टीला सर्व सदस्य जबाबदार राहतील. मा. महापौर मॅडम, त्यासाठी जे असेल ते त्याकरिता आपण स्ट्रीक्टली प्रशासनाला वॉर्निंग द्यावी आणि तशाप्रकारे अहवाल घेउन त्याची वसुली होत असेल तर वसुल करण्याचे आपण आदेश द्यावेत. नसेल होत तर त्याचे अमाउंन्ट कशातऱ्हेने वर्ग केलेले आहेत. त्याची ही माहिती लवकरात लवकर मिळवून द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

या अहवालात एक परिच्छेद वाचून दाखवतो. नोंद वहीच्या संदर्भात मुख्याधिकारी ह्यांचे तसेच लेखांतर्गत लेखापरिक्षक ह्यांचे कोणतेही नियंत्रण नसल्याचे दिसून येते. महत्वाचे नोंद व्यवहार, नियंत्रण न राखल्याने आर्थिक घोटाळा होण्याचा जास्तीत जास्त शक्यता निर्माण झाल्याचे आढळून येत आहे. संबंधित अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्याधिकारी ह्यांचे खुलासे घेणे व त्याबाबतचे वरील त्रुटींची पुर्तता करुन लेखापरिक्षकांना दाखविण्यात याव्यात. पोच ३८ नंबर प्वाईंट. हा विशेष लेखापरिक्षक अहवाल प्राप्त झाल्याची तारीख कळवावी. अनुपालन या विशेष लेखापरिक्षण अहवालाचा परिपूर्ण अनुपालन अहवाल विथ प्रॉफीट मुंबई स्थानिक लेखाअधिनियम १९३० चे कलम १०(१) नुसार महानगरपालिकेच्या मान्यतेच्या कराचे प्रतीसह सदरचा अहवाल प्राप्त झाल्यापासून चार महिन्याच्या आत कार्यालयात पाठवावा. हे आदेश मुख्यलेखापरिक्षक स्थानिक विधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई ह्यांच्या हस्ते तुम्हाला मिळालेले आहे. व २४/१२/२००३ ह्या तारखेला त्यांची सही झालेली आहे. ही शेवटची कॉपी आहे. त्यांनी चार महिन्यात तुमच्याकडे अहवाल मागितले होते आणि हा २००३चा किस्सा आहे. आता आपण २००६ मध्ये आहोत. प्रतिनियुक्तीवर आलेले श्री. नाकाडी साहेब आहेत. त्यांनी ह्याच्यावर काय कार्यवाही केली? चार महिन्यात त्यांनी तुमच्याकडे अहवाल मागितला आणि ते स्थायी समितीला सादर करत आहेत. त्यांच्या उत्तरात ते कुठेच बोलले नाही की, सन्मा. मुख्यलेखापरिक्षक ह्यांना मी अहवाल पाठवला आहे असे आणि अहवाल पाठवला असेल तर तो पटलावर ठेवा. स्थायी समितीला तुम्हाला अहवाल द्यायचा नाही.

**सुधीर नाकाडी :-**

तो जो स्पेशल ऑडीटचा रिपोर्ट आहे. त्याच्याबद्दल कम्प्लाईन्सचे सांगितले होते. तो सन १९८५ ते २००२ सालचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

चार महिन्यात तुम्ही तो सगळा अहवाल द्यायला पाहिजे होता.

**सुधीर नाकाडी :-**

चार महिन्यात अहवाल द्यायचा होता. पण चार महिन्याच्या आत त्याचे अनुपालन करुन मा. महासभेच्या ठरावाने तो अहवाल द्यायचा होता.

**मिलन म्हात्रे :-**

बरोबर आहे. त्यात तुम्हाला कोणी अडवले होते.

**सुधीर नाकाडी :-**

त्याच्यानंतर कम्प्लाईन्स होऊन तत्कालीन जे लेखापाल आहेत त्यांनी अजूनपर्यंत ते कम्प्लाईन्स केलेले नाही. त्याच्याशिवाय ते देता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तीन वर्षे.

**सुधीर नाकाडी :-**

तीन वर्षे झाले. पण त्यांनी कम्प्लाईन्स केल्याशिवाय ते ठेवता येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आणखीन किती, सहा वर्षे घेणार का? जर आपण मनामध्ये आणले ना, आपण एक स्पेशल ऑफीसर आहात. आपल्याला येथे प्रतिनियुक्तीवर कशाला आणले आहे? गाड्या-घोड्या सर्व दिले आहे. आम्हाला येथे भ्रमनिराश करायला, आमची दिशाभूल करायला आपल्याला येथे प्रतिनियुक्तीवर आणलेले नाही.

**सुधीर नाकाडी :-**

सन १९८५ ते २००२ पर्यंतचा सतरा वर्षाचा रेकॉर्ड आम्हाला दिला पाहिजे की नाही?

**मिलन म्हात्रे :-**

त्यावेळेचे आमच्या स्टाफची जी लोक आहेत. त्यांच्या ज्ञानापेक्षा तुमचे ज्ञान चांगले म्हणजे तुम्ही हायर कॅटेबिरीचे आहात म्हणून तुम्हाला येथे आणले आहे. ह्याचा फायदा आम्हाला काहीच नाही. कळले का? तुम्हाला कोकण भुवनला जायला किती वेळ लागतो? त्यांना अडचण आहे का? त्यांनी तुम्हाला रेकॉर्ड का दिला नाही? तुम्ही कधी मागणी केली?

**सुधीर नाकाडी :-**

पत्राने त्यांच्याकडे वेळोवेळी मागणी केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण त्या पत्राचा उल्लेख करा. तारीख व्हाईस माहिती द्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, आमचे अधिकारी आपल्याला उत्तर देत आहेत. तर आपण त्यांना बोलू तरी द्या. त्यांचे बोलणे चालू असताना तुम्ही त्यांना मध्येच थांबवून आपले बोलणे सुरु करता.

**मिलन म्हात्रे :-**

नाही. आपण मिसगाईड करु नका. मला त्या पत्रांची तारीख पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला तारीख मिळेल. पण अधिकाऱ्यांना बोलायची संधी द्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे आपण बोला.

**सुधीर नाकाडी :-**

आपल्याला माहिती पाहिजे ना. तर आपण याबाबत काय काय कार्यवाही केली आहे. त्याची झेरॉक्स प्रत देतो.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा. हे पानपट्टीचे दुकान नाही. ही मा. महासभा आहे. येथे विषयपटलावर ठेवा. तुम्हाला वेळ हवा असल्यास आम्ही थांबू. आपण आमच्याकडून मंजूरी घेता?

**सुधीर नाकाडी :-**

आज विषयपटलावर हा विषय नाही तर त्याची माहिती कशी घेऊन येणार?

**मिलन म्हात्रे :-**

कसे काय? हा लोडवर आहे. आम्हाला पाच लाखाची मान्यता द्यायची आहे. माझे ते ऑब्जेक्शन आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

तारीख लेकर उनके पास भेजो।

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यावर आम्ही मतदानाची मागणी करणार.

**रतन पाटील :-**

नाहीतर तो विषयच काढून टाका.

**मिलन म्हात्रे :-**

विषय कशाला काढून टाका? म्हणजे व्याजाची वसुली काढून टाकायची. नाही, ह्या सभेमध्ये आम्ही येथे मतदानाची मागणी करणार आहोत. या पाच लाखाचा काहीतरी सोक्षमोक्ष आजच्या सभेमध्ये लागला पाहिजे. आमची मागणी साडेचार करोड रुपयाची आहे. आणि आपण पाच लाख रुपये बोलत आहात. ह्याच्यावर आम्हाला उत्तर पाहिजे की, पाच लाख रुपये कुठच्या हिशोबाने आले? म्हणजे भविष्यातल येणं आपण नाकारता का, नाही. आपण एकीकडे आपले अधिकारी लिहून देतात की बँकेच्या पास बुकाचे ठिकाणे नाहीत, चेक बुकाचे ठिकाणे नाही. त्यावेळच्या तात्कालीन मुख्याधिकाऱ्यांच्या सह्या नाही. लेखाधिकारी जे कोण नेमले होते त्यांच्या सह्या नाही. आणखी काय-काय नाही तेही आपल्याला सांगतो. आमचे विरोधी पक्षनेते बोलले ते बरोबर आहे. अधिकारी रिटायर्ड झाल्यानंतर आपण जप्त्या काढणार का? जप्ती घ्यायलासुध्दा त्यांच्याकडे काही नाही, सगळं बेनामी असते. काका, पुतण्या, मामा, भाचा सर्व त्यांच्यावर असते. ती लिस्टसुध्दा माझ्याकडे आहे. वाटल्यास देतो.

**शरद बेलवटे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, पान क्र.५ ऑडीट वसुली असा जो लेखाशिर्षक आलेला आहे. ॲक्चुअली ॲडीट वसुली असा मुळातच लेखाशिर्षक नसतो. आपल्याकडे ऑडीटने ज्या क्वेरीज काढल्या होत्या. त्यात कोणाचे दोन रुपये कमी भरणा झालेले होते. मालमत्ता कर, उदा. पाणी कर ह्या रिसीट बनवायला हव्या होत्या. त्या-त्या डिपार्टमेन्टने ती पाणी वसुली अशी न दाखवता ऑडीट वसुली दाखवलेली आहे. म्हणून ते लेखाशिर्षक निर्माण झालेले आहे आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, जे पाच हजार रुपये दाखवलेले आहे. जे एफ.जी.चे ऑडीट झालेले आहे. त्याच्यात छोट्या-मोठ्या किरकोळ अशा रिकव्हऱ्या दाखवलेल्या आहेत. त्यामुळे पाच हजार रुपये ते दाखवलेले आहे. परंतु, ते पाच लाख रुपये नाही. ॲक्च्युअली आपण जी ऑडीट वसुली म्हणून दाखवतोय ती तशी दाखवायला नको. तसे लेखाशिर्षक का निर्माण करावे लागले आहे. कारण ती जी रिसीट रिकव्हरी ज्या लेखाशिर्षकाखाली पाहिजे होती तशी न करता ऑडीट वसुली म्हणून दाखवली गेली. पाण्याचे जे दोन रुपये कमी भरले आहेत. पाण्याचे जे वसुलीतुन जवळजवळ दोन रुपये कमी भरणा झालेला होता त्याच्यावर ऑडीटरने आक्षेप घेतला.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे महानगरपालिकेचे जे येणं होतं ते आपण दाखवले आहे. प्रत्येक डिपार्टमेन्टने माझे दोन रुपये आहे, माझे पाच रुपये आहे, माझे पन्नास रुपये आहे, माझे शंभर रुपये आहे. असे इज इक्वल टू पाच हजार रुपये.

**शरद बेलवटे :-**

परंतु, ते त्या-त्या लेखाशिर्षकाखालीच यायला पाहिजे होते.

**मिलन म्हात्रे :-**

आपण मला सांगा, आपण सगळ्यांची स्तुती केली. फार चांगला अर्थसंकल्प आला आहे आणि हा लेखाशिर्षक चुकीचा आला आहे असे आपणच बोलत आहात. आता मला सांगा, मी तुम्हाला ही वसुली दाखवलेली आहे ह्या वसुलीचे काय? आमचे म्हणणे एकच आहे की, तिथे पाच हजार रुपये नको तिथे साडेचार कोटी करा. या साडेचार करोड रुपयाचे काय? मा. महापौर मॅडम, आपण या विषयावर रुलिंग द्या. त्या ज्या रक्कमा दिलेल्या आहेत त्याच्याबद्दल कोण काहीच बोलत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

खुलासा केलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

याबाबत मा. महापौर मॅडमचे रुलिंग पाहिजे. सभागृह नेते दिशाभूल करु नका. महानगरपालिकेच्या वसुलीचे बोला. माझे म्हणणे आहे साडेचार करोड रुपये आणि आपण म्हणता पाच हजार रुपये.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्हालासुध्दा वेळ द्या. आम्हाला सुचना मांडायच्या आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडमच्या परवनानगीने बोलतोय, प्रकरण क्र. १०० मा. स्थायी समितीने नव्याने शिफारस केलेले मिरा भाईंदर महानगरपालिकेचे २००५-०६ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.

**रतन पाटील :-**

सभागृह नेते साहेब, आपण जरा थांबा. आम्हाला सुचना मांडायच्या आहेत.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आम्हालाही ह्या विषयावर चर्चा करायची आहे. आम्ही कधीपासून हात उंच केला होता. आम्हालादेखील बजेटच्या विषयावर बोलायचे आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर साहेबा, आम्हाला बजेटवर बोलायेच आहे. अजून आमच्या बऱ्याचशा सुचना बाकी आहेत.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, मी हात उंचावलेला होता. आम्हालाही बजेटवर बोलायचे आहे.

**रतन पाटील :-**

आपण कशाला एवढी घाई करता. आम्हाला बोलू द्या. आम्हाला वेळ द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, माझा ठराव वाचून झाल्यानंतर सन्मा. सदस्यांना बोलण्यासाठी आपण वेळ द्यावी.

**रतन पाटील :-**

आपण ठराव नंतर मांडा. आपल्याला ठराव मांडायला आम्ही भरपुर वेळ देऊ. पहिल्यांदा सगळ्यांना आपल्या सुचना मांडू द्या आणि त्या ठरावामध्ये सगळ्यांच्या सुचना घ्या.

**शशिकांत भोईर :-**

सभागृह नेते साहेब, आम्हालाही बजेटवर बोलायचे आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य तुमच्यावतीने मी मा. महापौरांना विनंती केली आहे की, माझा हा ठराव मांडून झाल्यानंतर आपल्याला बोलण्याची संधी देतील.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, पण आपण ठराव मांडत आहात.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याला घाई कसली आहे? अगोदर चर्चा होऊ दे.

**शुभांगी नाईक :-**

आपण ठराव मांडत आहत पण आम्हाला काही सुचना मांडायच्या आहेत.

**शशिकांत भोईर :-**

आम्हाला बजेटच्या विषयावर बोलू द्यायचे नाही का? मॅडम, हा ठराव झाल्यानंतर आमच्या सुचना केव्हा घेणार आहात? आजपर्यंत जेवढे हेड ठेवले आहे त्याच्यावर ह्या लोकांनी काय कार्यवाही केली आहे? हेड देतात आणि नंतर दुसऱ्या ठिकाणी पैसे फिरवले आहे.

(सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. १०० चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपण सगळ्यांना बोलण्याची संधी देणार आहात ते आम्हालाही माहिती आहे. आपण जर ठराव मंजूर करुन घेत असाल आणि आमच्या सुचना घेत नसाल तर मग आपण आम्हाला सभेकरिता आमंत्रित करण्याची गरज नव्हती. आपणच करायचे होते.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर, सदरचा ठराव मतदानाला टाकावा.

**रतन पाटील :-**

एका बाजुला आपण आम्हाला सहकारी पक्ष बोलता आणि दुसऱ्या बाजुला ही अशी विरोधी भूमिका. आम्हाला बोलायला द्या. आमच्या सुचना समजून घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला बजेटच्या विषयावर बोलायला द्या. हे जे ठराव मांडले जात आहेत त्याच्यावर माझी सुचना आहे. ती सुचना ऐकून घ्या. कारण आपण आम्हाला बोलण्याची संधी दिली नाही.

(सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. १०१ चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**परशुराम पाटील :-**

सदर विषयाला अनुमोदन देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमची मतदानाची मागणी आहे. ठराव मतदानाला टाकावा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला अर्थसंकल्पावर बोलायचे आहे, आपण आम्हाला अर्थसंकल्पावर बोलायला संधी द्या.

(सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. १०२ चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला मी अनुमोदन देत आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठराव मांडायला सभागृहाचा विरोध नाही. उत्पन्नाच्या ज्या वाढीव बाबी आहेत त्याबद्दल हे सभागृह विरोध करणार नाही. पण ज्या सुचना मांडायच्या आहेत त्याकरिता आम्हाला बोलायला द्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी विचारलेल्या प्रश्नाला आपण अजून रुलिंग दिलेले नाही.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, २००६-०७ या अर्थसंकल्पामध्ये राई, मोर्वा, मुर्धामध्ये आपण सी.आर.झेड.चे आरक्षण ठेवले आहे. या सी.आर.झेड.च्या आरक्षणामुळे तिथला विकास आज तुटलेला आहे. कोणी त्याच्यामध्ये बांधकाम करु शकत नाही आणि त्याच्यामुळे ह्या अर्थसंकल्पामध्ये आपण काय तरतुद केली आहे का? तसा लेखी व्यवहार आपण केलेला आहे का?

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, ठराव मांडलेले आहेत, त्याच्यामध्ये दुरुस्त्या घेतलेल्या आहेत. त्या दुरुस्त्यांसह ठराव सभागृह नेते ह्यांनी मांडलेला आहे. सुचक सभागृह नेते आहेत आणि अनुमोदक विरोधीपक्ष नेते आहेत. सन्मा. सदस्यांच्या सुचना घेतल्या आहेत.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण खुलासा करावा. सी.आर.झेड.चा जो प्रकार आहे. त्याचे एक, दोन आणि तीन प्रकार आहेत आणि जर सामान्य माणसांना बांधकाम करायचे असेल तर यामुळे त्यांची अडचण निर्माण होते. आपण या संदर्भामध्ये काय खुलासा करु शकाल का?

(सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. १०३ चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर महोदया, आमच्या मुद्यावर आपण रुलिंग काय दिले?

**अनंत पाटील :-**

अर्थसंकल्पामध्ये आपण नोंद घ्या. ज्या खाड्या आहेत त्या खाड्यांचीही त्याच्यामध्ये नोंद घ्या. गेल्यावेळेला खाड्या खोदण्याचे शिर्षक होते आणि ह्यावेळेला खाड्या खोदायचे शिर्षक नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपण मांडलेल्या प्रश्नावर ऑडीटरने खुलासा केलेला आहे. तरीसुध्दा आयुक्त महोदयांनी त्या संबंधित ऑडीटरची संपूर्ण माहिती मागवून आपल्याला सादर करावी.

**मिलन म्हात्रे :-**

आमची जी साडेचार करोडची सुचना आहे त्याचे काय केले? पाच हजार बरोबर आहे की, आमची सुचना चुकीची आहे. ह्याचे रुलिंग द्या. बाकी आम्हाला काही नको. त्यांनी तीन चार वर्ष काही केले नाही. त्यांच्याकडुन आमची काही अपेक्षा नाही. आमची दिशाभूल केलेली आहे. म्हणून सगळ्यांची चुक सुधरविण्याचा हा प्रयत्न आहे. आपण ह्यांच्या पापाला भागीदार राहू नये. आम्ही तर राहणार नाही. मी साडेचार कोटी रुपयाची जी वाढ आपल्याला सांगितलेली आहे, ती वाढ अपेक्षित आहे. हे अंदाजपत्रक आहे आणि तो अंदाज आहे. पुढे तीन महिन्यात जर तुमची वसुली झाली तर ती रक्कम आपण कोणत्या शिर्षकाखाली टाकणार? मी जे सुचवले आहे चार कोटी ही रक्कम आणि दिलेले पाच हजार याबद्दल आपले रुलिंग मला पाहिजे.

**मा. महापौर :-**

संबंधित विषयाची माहिती मागवून घेण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या लोडला आपण रक्कम अंतर्भुत करा. ही रक्कम अंतर्भुत करणार की नाही फक्त एवढे सांगा. हो किंवा नाही. मॅडम, आपली रुलिंग फक्त एवढी द्या की आमची सुचना आपण मान्य केली का नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण आपल्या सुचना दोन मिनिटात मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण आमच्या रुलिंगचे काय करता? ह्या विषयावरआपण रुलिंग काय दिले? मी जे बोलतोय ते बोला ना. हो किंवा नाही. काही तरी उत्तर द्या. मॅडम, आपण माईक वर करा आणि आम्हाला स्पष्टपणे रुलिंग द्या. ते झाकुन ठेवू नका. नसेल तर मला रुलिंग द्या की, तुमचा विषय फेटाळतोय किंवा नाही, करता येणार किंवा नाही ते असे बोला.

**मा. महापौर :-**

जी वसुली केली जाईल ती ह्याच्यामध्ये अंतर्भुत केली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, असे नाही. मी काय म्हणतोय आता आपण प्रोव्हिजन करायचे आहे. आपण असे म्हणाल का की, एक करोड कशाला? आपण सगळ्या फिगर देतोय ना. सभागृह नेत्यांनी फिगर दिले. मी तुम्हाला साडेचार करोडला फिगर दिलेला आहे. आपण त्याच्यावर बोला ना, साडेचारचे चार नाही तीन करोड होतील, अशी काहीतरी रक्कम द्या. पाच हजार आहे आणि ह्याच्यामध्ये लाखात वाटप आहेत. प्रत्येक पानावर दहा-दहा, नव्वद-नव्वद लाख रुपये आहेत. हे जे रेडमार्क, यलो मार्क केले आहे, ह्याच्यामध्ये सगळ्या वसुली आहेत. कमीतकमी एका लाखाच्या खाली नाहीत आणि दहा-दहा लाखाच्या वर आहेत. हे मी गर्व्हमेंटचे डॉक्युमेंट्स दाखवतो. माझी एवढीच विनंती आहे की, तो लोड वाढवा. पाच हजाराच्या ऐवजी साडेचार करोड करा.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेबांनी ह्या विषयावर खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी नगरपालिकेचे जे ऑडीट झालेले आहे त्या ऑडीटच्या संदर्भामध्ये जी साडेचार करोड रुपयाची वसुली अपेक्षित आहे आणि अपेक्षित वसुली करायची आहे. त्याबाबत आपल्या अंदाजपत्रकामध्ये त्याची तरतुद करावी अशाप्रकारचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांना सांगु इच्छितो की, नगरपालिकेच्या वेळेला जे काही ऑडीट झालेले आहे. त्या ऑडीटचे कम्प्लाईन्स करण्याचे काम चालू आहे. आपण जरी इतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बाबतीमध्ये पाहिले तर असे जवळजवळ २५-२५ आणि ५०-५० वर्ष पूर्वीचे ऑडीटदारांचे कम्प्लाईन्स करण्याचे काम शासनाने हाती घेतलेले आहे. परंतु, ज्या काही कायद्यामधल्या तरतुदी आहेत, त्या कायद्यामधल्या तरतुदीच्या बाबतीमध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी सन्मा. सभागृहाच्या निदर्शनामध्ये आणून दिलेले आहे. चार महिन्यामध्ये त्याचे कम्प्लाईन्स करायला पाहिजे. परंतु, चार महिन्यामध्ये कम्प्लाईन्स झालेले नाही. अजूनपर्यंत त्या ऑडीटचा कम्प्लाईन्स झालेला नाही. त्याची पुर्तता चालू आहे. त्याच्यावर जे शक काढलेले आहे किंवा जी वसुली दाखवलेली आहे. त्या वसुलीच्या बाबतीमध्ये प्रशासनाकडून त्याचा खुलासा केला जाईल. तो खुलासा जर योग्य असेल तर ते स्विकारतील. जर अयोग्य असेल तर ते म्हणतील वसुली करा. म्हणून साडेचार कोटी रुपये सगळेच वसुली होतील अशातला भाग नाही.

**रोहित सुवर्णा :-**

अपेक्षित रक्कम दाखवा.

**मा. आयुक्त :-**

अपेक्षित रक्कम कसे दाखवता येईल. त्याचे अजून कम्प्लाईन्स झालेले नाही तर ते आपण अपेक्षित कुठून दाखवणार.

**रोहित सुवर्णा :-**

एका बाजूला आपण बोलता की, आम्ही कम्प्लाईन्स केलेले नाही. चार महिन्यामध्ये कम्प्लाईन्स करायला पाहिजे होते. म्हणजे एवढी रक्कम अपेक्षित आहे. आपण वसुल करु शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, आपण असे बोलता ना की, आम्ही वसुली करु हे बरोबर आहे. मी तुम्हाला कुठे बोललो की साडेचार करोड रुपये आपण करा. मी सुचना दिलेली आहे. तुम्ही असे करा. आम्ही करु शकत नाही. रुलिंग देऊन टाका. विषय संपला आणि जर अपेक्षित असेल साडेचार नाही तीन करा. तीन नाहीतर अडीच करा, अडीच नाहीतर चार करा. चार नाहीतर सव्वाचार करा. काहीतरी करा. नाहीतर सरळ आम्ही हा ठराव मतदानाला टाकतोय. मतदान घ्या. यसच्या बाजुने तुम्ही रहा नोच्या बाजुने आम्ही राहतो. विषय संपला. मी कुठे काय बोलतो. शेवटी न्यायबळ आम्ही आहोत आणि आम्हाला ह्याला मंजूरी द्यायची आहे आणि ज्यादिवशी मार पडतो त्यावेळी कोणीही जवळ नसते. जमीन द्यायला कोण येत नाही. हा भाईंदरचा इतिहास आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापोर साहेबा, या विषयावर आपण परवानगी द्याल अशी अपेक्षा करुन मी बोलतोय, की सभागृहामध्ये अत्यंत वैचारिक मुद्दा सभागृहाच्या निर्णयासाठी उपस्थित झालेला आहे. या मुद्यामध्ये दोन गोष्टी सांगितलेल्या आहेत की, मुळ बजेटमध्ये आयुक्तांनी त्यांचे दिलेले वसुलीचे आकडे स्थायी समितीने ॲज इटीज घेऊन आपल्या मा. महासभेपुढे आणले आहे. दुर्देवाने म्हणा, मी किंवा सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आम्ही स्थायी समितीमध्ये नाहीत. यामुळे आम्हाला बोलण्याची संधी या सभागृहामध्ये प्राप्त झाली. सुरुवात सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांनी केली. त्यांनी सरकारी ऑडीट अगदी संपूर्ण कागदपत्रासहित आणून आपल्यापुढे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. आणि यामुळे सभागृहामध्ये अशी एक भयानक भिती पसरविलेली आहे की, जर माझे आकडे या बजेट मंजूरीमध्ये घेतले नाही तर तुम्हाला सगळ्यांना बघून घेईन म्हणजे काय की, तुमच्या सगळ्यांची मेंबरशीप रद्द होईल.

**मिलन म्हात्रे :-**

आपण विषयांतर करु नका. बघून घेतलेली नाही.

**लिओ कोलासो :-**

आपण मला बोलू तरी द्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आम्हाला जे रुलिंग देतील ते आम्हाला मान्य आहे.

**लिओ कोलासो :-**

मी काही चुकीचे बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण चुकीचे बोलून सभागृहाचे वातावरण बिघडवू नका. मी जे नियमानुसार रुलिंग मागितली आहे त्यांनी ती रुलिंग द्यावी.

**लिओ कोलासो :-**

ठिक आहे. मा. महापौर साहेबांनी रुलिंग चार मिनिटाने द्यावे की, दहा मिनिटांनी द्यावे हा ही विषय आहे. परंतु, मा. महापौरांना रुलिंग देण्यासाठी सत्ताधारी पक्षाची भूमिका मा. महापौर साहेबांकडे व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे. साहेब व्हॉट अबॉव सेक्युरिटी त्यांच्याबद्दल बोला. जे चार कोटी रुपये आम्ही प्रपोझ केले आहे त्याच्या रिकव्हरीबद्दल बोला.

**लिओ कोलासो :-**

आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य चार कोटी रुपयांचे सांगत आहेत ते सब्जेक्ट टू कन्डीशन. ऑडीट त्या-त्याप्रमाणे वसुली दाखवलेली आहे. ऑडीट पॅरे हे संबंधित कर्मचाऱ्याला आज किंवा काल किंवा गेल्या चार वर्षात कळवायला पाहिजे होते. ते कळवले गेले आहेत की नाही, हा ह्या सभागृहाच्या विचाराचा भाग राहील. त्यांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे का? त्या ऑडीट प्वॉईंटमधून शासनाला एक्सेप्ट झाले. महापालिकेला एक्सेप्ट झाले तर चार कोटी काय, चार पैसेसुध्दा या बजेटमध्ये आपल्याला मिळणार नाही. म्हणून याठिकाणी मा. महापौर साहेबा मी आपल्याला विनंती करतो की, त्यांनी जिव्हाळ्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांच्याशी आम्हीही सहमत आहोत. आमचे प्रशासन, आमचे अधिकारी, आमचे कर्मचारी महापालिकेचे कुठलेही काम करताना अशा प्रकारच्या लांड्यालबाड्या करु नये. त्यांनी भष्ट्राचार करु नये. हे त्यांनी थांबवले पाहिजे.

म्हणून ही ऑडीटची प्राविधान आहेत. परंतु, जोपर्यंत एखाद्या विवक्षित कर्मचाऱ्याबद्दल त्यांचे ऑडीट कम्प्लाईन्स एक्सेप्ट किंवा रिजेक्ट होईपर्यंत निर्णय लागलेला नाही. म्हणून आयुक्त साहेबांनी बजेट सादर करताना जे काही आकडे या जमेच्या शिर्षाखाली दाखवलेले आहेत. ते ह्या सभागृहाला मान्य आहे व उर्वरित सब्जेक्ट टू पुर्तता करुन जर समजा, पाच लाखाऐवजी पन्नास लाख झाले किंवा चार कोटी जर निघणार असेल तर ते पैसे पुन्हा आपल्याला रिॲप्रोप्रिएशनच्यावेळी पुन्हा फेरबजेटची मागणी करुन विशेष सभा घेऊन ते आपल्याला अंदाजपत्रकात समाविष्ठ करण्याची संधी आहे. म्हणून आयुक्त साहेबांनी, स्थायी समितीने जे बजेट केलेले आहे आणि बजेटमध्ये जी आकडेवारी दिलेली आहे ती बरोबर आहे. त्याप्रमाणे बजेट मंजुर व्हावे त्यासाठी मी ह्या बजेटचे समर्थन करत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण रिकव्हरीचे काय? मा. महापौर मॅडम, आपण मला रिकव्हरीबद्दल रुलिंग द्यायचे आहे. मी जी अमाऊंट सांगितली आहे ती तुम्हाला मान्य आहे का? कारण आयुक्तांनी दीडचा दिला होता आणि स्थायी समितीने पाच हजार रुपये केले म्हणजे त्याच्यावर स्थायी समितीमध्ये उहापोह झालेला आहे. स्थायी समितीचे स्पष्ट मत झालेले आहे. आयुक्त साहेबांनी दीड हजार रुपये सांगितले आम्ही पाच हजार रुपये केले. म्हणजे हे जे प्रस्ताव आहेत ते सगळे प्रस्ताव आमच्याकडे आले. त्यानंतर आम्ही तुम्हाला सगळं सांगितलेले आहे. हे जे नंतर आयुक्त सहेबांनी आमच्या समोर द्यायला पाहिजे होते ते दिले गेले नाही. आपण ही रक्कम स्विकारत असाल तर होय सांगा, नसेल तर नाही असे सांगा. आमची काही जबरदस्ती नाही. जबरदस्ती बिल्कुल नाही. आपण म्हणता आणि जर उद्या रिकव्हरी निघाली तर त्याला जिम्मेदार कोण?

**लिओ कोलासो :-**

त्यांच्यामधूनच निघेल ना.

**मिलन म्हात्रे :-**

कोणाकडून?

**लिओ कोलासो :-**

असे कसे दुसऱ्यांकडून निघणार?

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्या लोडमध्ये वसुलीचा शिर्ष ठेवला पाहिजे. श्री. बेलवटे बोलतात की, ते चुकून ठेवले आहे. स्थायी समितीने त्याच्यात अमेन्डमेन्ट केले आहे. म्हणजे श्री. बेलवटे ह्यांनीसुध्दा स्थायी समितीला सांगितले नाही की, हे चुकीचे आले आहे आणि दीड हजाराचे पाच हजार रुपये स्थायी समितीने केले. ही दिशाभूल केलेली आहे. हे आपण बोला. असे काय आपण बोलता? हे जे मी बोलतो ते टेक्नीकल आहे. आयुक्त साहेबांचे अंदाज दीड हजार रुपये आहेत आणि स्थाय समितीने त्याचे पाच हजार रुपये केले. त्यावेळी त्या सभेला श्री. बेलवटे हे उपस्थित होते. त्यांची उपस्थिती मी बघितलेली आहे आणि त्यावेळी श्री. बेलवटे ह्यांनी सांगितले नाही का? की हे लेखाशिर्षक चुकीचे आलेले आहे आणि आता बोलतात की, हे लेखाशिर्षक चुकीचे आलेले आहे. मी हे म्हणत नाही की लेखाशिर्षक चुकीचे आलेले आहे तर लेखाशिर्षक हे बरोबर आहे. आपण जे पाच हजार रुपये दाखवलेले आहे तिथे साडेचार हजार रुपये करा. ही माझी सुचना आहे. नसेल तर तुम्ही हा विषय मतदानाला टाका. साडेचार करोड रुपये करा. महानगरपालिकेच्या आर्थिक फायद्याचे बोलत आहोत. चार करोड करा नाहीतर दोन करा, एक करा. काहीही करा. तुम्ही काहीच करणार नाही तर आम्ही ठराव मतदानाला टाकू. आपण त्याच्यावर मतदान करा. आम्ही नाही कुठे बोलतोय.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय की, ऑडीट रिपोर्ट म्हणजे फायनल रिपोर्ट नाही. त्यांनी आक्षेप घेतलेले आहे आणि अजूनही आक्षेप सिध्द झालेले नाही. ज्या कर्मचाऱ्यांवर आक्षेप घेतलेला आहे. त्यांनी हा ऑडीट रिपोर्ट मान्य केलेला नाही. आणि त्याच्यावरसुध्दा हायकोर्ट आहे. जिथंपर्यंत कोर्ट सांगत नाही की, हे ह्याच्यामध्ये दोषी आहेत. तिथंपर्यंत आपल्याला ह्याच्यामध्ये समाविष्ठ करुन घेता येत नाही. तर हे जे आयुक्तांनी अंदाज केलेले आहेत तेच बरोबर आहेत. कारण ही हायर ॲथोरिटी ऑडीटमध्ये नाही. त्यांनी जे आक्षेप केलेले आहेत ते समोरच्याने एक्सेप्ट केले पाहिजे की, मी ह्याच्यामध्ये गुन्हा केला आहे किंवा नाही. त्या ऑडीटवर बोलण्यासाठी त्याला अजुन पूर्ण संधी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

अजूनपर्यंत तीन वषे लेखी स्वरुपामध्ये आलेले नाही. आणि ऑडीट ही सुपीरियर बॉडी आहे.

**मिलन पाटील :-**

ऑडीटरने जो आक्षेप घेतलेला आहे त्याबाबत माहिती देण्याकरिता किंवा आपली बाजु मांडण्याकरिता त्या कर्मचाऱ्याला संधी मिळणार आहे आणि जर कर्मचाऱ्यांनी तसे......

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला या विषयावर रुलिंग पाहिजे. आपण कशाला एवढा वेळ लावतो?

**मिलन पाटील :-**

तसे केले असेल तर ऑडीटच्या पुढेसुध्दा कोर्ट आहे, हायकोर्ट आहे आणि हायकोर्टाने निर्णय दिला की हे अपात्र आहेत.ह्यांनी गुन्हे केले आहेत ह्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा व ह्यांच्याकडून वसुली करा. तेव्हाच आपल्याला ती रक्कम येऊ शकते. त्याच्यानंतरच आपण वसुल करु शकतो. आपल्याला फुगीर बजेट नको. आपल्याकडे जे आहे तेच आहे.

**मिलन म्हात्रे :-**

वसुली करायली बाकी आहे. आपण नाही कसे बोलणार? तुम्ही ती चुकीची मंजुरी दिलेली आहे.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य आपण बोलताना आम्ही शांत बसलो होतो ना? आता मी बोलत आहे तर आपण गुपचूप बसा.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्या प्रश्नावर आम्हाला रुलिंग पाहिजे. तुमचे रुलिंग नको.

**मिलन पाटील :-**

आपल्याला रुलिंग देतील ना.

**मिलन म्हात्रे :-**

आपण कशाल मधे बोलता? होय किंवा नाही ते त्यांनी सांगावे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**मिलन पाटील :-**

हे ऑडीटचे रिपोर्ट आहेत आणि ऑडीट म्हणजे हायर ॲथोरिटी नाही. ऑडीटर जेव्हा रिपोर्ट करतील तेव्हाच ते करतील.

**मिलन म्हात्रे :-**

हे तुमचे मत आहे. शासनाचे नाही.

**मिलन पाटील :-**

रुलिंग मागून हे कोर्टात जाणार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

ते तुमचे मत आहे.

**मिलन पाटील :-**

जेव्हा हे सिध्द होईल तेव्हा आम्ही समाविष्ठ करुन घेऊ. हायकोर्टाचे जेव्हा आदेश होतील तेव्हा आमच्या कर्मचाऱ्यांकडून आयुक्त साहेब ती रक्कम वसुल करुन घेतील आणि आमच्या कर्मचाऱ्यांना त्यांची बाजु मांडण्याकरिता पूर्ण संधी मिळालेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला त्या ऑडीटच्या रिपोर्टमध्ये अडकवायचे नाही. तुम्ही अडकाल. तुम्ही स्थायी समितीमध्ये मंजुरी दिलेली आहे. मा. महापौर मॅडम, मला आपल्याकडून रुलिंग पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आपल्याला रुलिंग दिलेले आहे. तरी आपले समाधान होत नाही. आपल्याला आयुक्त साहेब व मीसुध्दा रुलिंग दिलेले आहे. त्या विषयावरचा खुलासा केलेला आहे. आपण खाली बसून घ्यावे. सन्मा. सदस्य रतन पाटील आपले विचार आपण मांडावे.

**मिलन म्हात्रे :-**

रुलिंग आयुक्त साहेब देत नाही. मा. महापौर मॅडम आपण नियम वाचून घ्या. रुलिंग द्यायचे अधिकार तुमचे आहेत. आयुक्त साहेब रुलिंग देत नाहीत. आयुक्त साहेबांनी ह्यावर फक्त माहिती द्यायची आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण सांगा की कर्मचाऱ्यांवर आरोप सिध्द झाल्यावर ही रक्कम समाविष्ठ करण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपले अंतिम रुलिंग काय आहे ते आम्हाला सांगा.

**मिलन पाटील :-**

कर्मचाऱ्यांवर आरोप सिध्द होतील तेव्हा ही रक्कम समाविष्ठ करण्यांत येईल. आणि कर्मचाऱ्यांना अजून पूर्ण संधी मिळालेली नाही की, त्यांनी हे खरोखर केले आहे की नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, आपले रुलिंग काय आहे ते सांगा. आपण ही रक्कम समाविष्ठ करणार आहात की नाही?

**मिलन पाटील :-**

हा दडपणाचा विषय आहे. सन्मा. सदस्य आपली दिशाभूल करुन आपल्यावर दउपण आणत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

कसले दडपण? तुमच्यावर दडपण, त्यांच्यावर दडपण नाही.

**मिलन पाटील :-**

मॅडम, ह्याच्यात काही वावग नाही. त्याच्यात काही नाही. आरोप सिध्द झाला की, कर्मचाऱ्यांकडून आपण वसुली करु शकतो.

**मिलन म्हात्रे :-**

असु दे ना. हे तुमचे ओपिनियन आहे, माझे नाही. मॅडम, आपण मला रुलिंग द्या. मी जी सुचना दिली आहे ती महापालिकेच्या आर्थिक फायद्याची आहे. मी जे फिगर दिलेले आहेत पाच हजाराचे साडेचार कोटी रुपये करायचे आहे. त्यबद्दल आपले रुलिंग द्या की, हे करता येणार नाही. आम्हाला अमान्य आहे.

**मा. महापौर :-**

लेखाशिर्षकाखाली दिलेली जी रक्कम आहे ती रक्कम त्याच्यात नमुद केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पाच हजार रुपये? एवढी रक्कम योग्य आहे का? मॅडम, आपले अर्धवट रुलिंग चालणार नाही. ही पाच हजाराची रक्कम योग्य आहे का? तेवढे सांगा आणि आम्ही सांगितलेले अयोग्य आहे. हे बोलायला आपल्याला उशीर का लागतो? बोला ना योग्य आहे असे. मी जे फिगर सांगितलेले आहे त्यापेक्षा आपण जे पाच हजार रुपये दिले आहे ते योग्य आहे. बस, मला आणखीन काही नको आणि नसेल तर मान्य करा, कन्सीडर करा.

**मा. महापौर :-**

ती रक्कम योग्य आहे की नाही याबाबत खुलासा मागवून घ्ह्ेण्यांत येईल.

**मिलन म्हात्रे :-**

आपण आम्हाला या सभेमध्ये रुलिंग देत आहात ना.

**मा. महापौर :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मग कसे काय? आज बजेट मंजूर करायचे आहे. सही द्यायची आहे नाहीतर आपणही सन्मा. सदस्य गजानन भोईर सारखे सुळी चढवायला मोकळे व्हाल.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. १००, १०१, १०२, १०३, १०४ व १०५ ठराव सर्वानुमते मंजूर.

**मिलन म्हात्रे :-**

आपण हे ठराव मतदानाला टाकावे. सर्वानुमते मंजूर नाही. आमचा विरोध आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, मला बोलायला पाच मिनिटे देण्यात यावीत.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, ह्या सर्व ठरावांना आमचा विरोध आहे. विरोधाची नोंद करुन घ्या. प्रोसिडिंगला नोंद झाली पाहिजे आणि प्रोसिडिंगमध्ये कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करायचा नाही. आमच्या दोन नगरसेवकांचा विरोध आहे हे नोंदवून घ्या. आणि ह्यांचे जे कोणी आहे त्याचा सपोर्ट आहे. हे ठराव सर्वानुमते घ्यायचे नाही. आमच्या दोन्ही सदस्यांच्या नावाने विरोध नोंदवा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपला विरोध नोंदवून घेण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र. १०० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००५-०६ चे सुधारित व २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६ रोजीचे प्रकरण क्र. २१३)

**ठराव क्र. ९३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००५/२००६ सुधारित व सन २००६/२००७ चे मूळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरण पत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. २१७ दि. ०१/०३/२००६ विचारात घेवून व शासनाचे नियमानुसार जकातीची रक्कम कायम करुन मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह २००५/२००६ चे सुधारित व सन २००६/०७ चे मूळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदापत्रकाचा तपशिल पुढील प्रमाणे.

२००६/२००७

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्पन** | ''अ'' अंदाजपत्रक | २८६६०.२३ | - | **खर्च** | ''अ'' अंदाजपत्रक | २७२१०.२८ |
| | ''ब'' अंदाजपत्रक | ९७८.४० | | | ''ब'' अंदाजपत्रक | ११७८.४० |
| | ''क'' अंदाजपत्रक | ६३२१.४५ | | | ''क'' अंदाजपत्रक | ७५३६.२३ |
| | वृक्षप्राधिकरण | १६३.३० | | | वृक्षप्राधिकरण | १९५.०० |
| | **एकुण** | **३६१२३.३८** | | | **अखेरची शिल्लक** | **३६११९.९१** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १०० :-**

विकास आकाराचे दर व भोगवटा दाखला प्राप्त न करता रहिवास व्याप्त इमारतीसाठी दंडनिय शुल्क निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. ९४ :-**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ प्रमाणे विकास आकार रक्कम वसूल करणेबाबत अधिनियमातील तरतूद दि. १०/०८/९२ पासून लागु झालेली आहे. तत्कालीन नगरपारिषद कालावधीत ठराव क्र. ७४ दि. ०५/०८/९२ च्या विशेष सभेद्वारे ठरविलेल्या दरानुसार विकास आकाराची रक्कम तीन टप्प्यात वसूल करण्याचे निश्चित करण्यात आले होते.

४) बांधकाम नकाशे मंजूर करतेवेळी - २५%
५) बांधकाम प्रारंभपत्र देते वेळी - २५%
६) भोगवटा दाखला देते वेळी - ५०%

तद्नंतर सदर ठरावात बदल करुन सर्वसाधारण सभा दि. ०९/११/९३ ठराव क्र. २९२ अन्वये विकास आकार रक्कम वसुली बाबत सुधारीत धोरण ठरविण्यात आले. सदरच्या धोरणानुसार विकास आकर रक्कम ही तीन टप्प्या मध्येच वसूल करावयाची आहे.

१) बांधकाम नकाशे मंजुर करते वेळी - जमिनीचा पुर्ण विकास आकार तसेच बांधकाम क्षेत्राचा ५०% देय विकास आकार.
२) बांधकाम प्रारंभपत्र देते वेळी - बांधकाम क्षेत्राच्या ५०% रक्कम.
३) जोत्याचे प्रमाणपत्र - उल्लेख केलेला नाही.

तद्नंतर नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र. १०६(अ) दि. ३०/०३/९८ नुसार विकास आकाराचे सुधारीत दर निश्चित करण्यात आले ते खालील प्रमाणे आहेत.

१) जमिनीचा विकास - रु. ३०/- प्रती चौ.मी.
२) निवासी बांधकाम क्षेत्र - रु. ६०/- प्रती चौ.मी.
३) औद्योगिक बांधकाम क्षेत्र - रु. ९०/- प्रती चौ.मी.
४) वाणिज्य बांधकाम क्षेत्र - रु. १२०/- प्रती चौ.मी.

सदर दर हे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ 'अ' ते 'ल' प्रमाणे कमाल दर आहेत. या सुधारीत दरास शासनाने पत्र क्र. टीपीएस/१२९८/७५६/प्र.क्र.१६०/९८/नवि-१२, दि. २७/१०/९८ अन्वये मंजूरी प्राप्त असून दराची अंमलबजावणी १ नोव्हेंबर १९९८ पासून अंमलात आलेली आहे.

तत्कालीन नगरपारिषद कालावधीत वास्तुविशारद मे. गुप्ते वढावकर असो. यांनी दि. २७/०४/९८ रोजी मा. शासनाकडे निवेदन सादर करुन बांधका नकाशे मंजुर करताना विकास आकाराची रक्कम नगरपरिषदेकडून वसुल करण्याचा आग्रह करण्यात येत आहे. याबाबत हरकत उपस्थित केली होती. सदर निवेदन वजा पक्रीया अनुषंगाने शासनाने पत्र क्र. टीपीएस/१२९८/७७७/नवि-१२, दि. ०२/०६/९८ अन्वये विकास आकाराची रक्कम बांधकाम प्रारंभपत्र देण्याच्या वेळीच आकारण्यात यावी तसेच बांधकाम नकाशा मंजुर करतेवेळी विकास आकाराया वसुली बाबतीत तक्रारी येणार नाहीत याची दक्षता घ्यावयासाठी कळविण्यात आले होते. त्यामुळे विकास आकाराची रक्कम ही बांधकाम प्रारंभपत्राच्यावेळीच वसुल करणे क्रमप्राप्त ठरलेव त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

शासनाच्या आदेशाप्रमाणेच्या विकास आकार वसूलीबाबतच्या धोरणामुळे नगरपरिषद/ महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नावरही परिणाम होत आहे. म्हणून प्रशासकिय ठराव क्र. १६५, दि. ०९/०७/२००२ अन्वये विकास आकार रक्कम वसूली बांधकाम नकाशे मंजुर करताना एकरक्कमी वसूल

करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सद्यस्थितीत याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. सन २००२-०३ पासूनचा विकास आकार रक्कम वसुलीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सन | जमा विकास आकार (रु. कोटी) |
|---|---|---|
| १ | २००२-०२ | ४.१० |
| २ | २००३-०४ | ६.०० |
| ३ | २००४-०५ | ४.५८ |

सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात विकास आकार रक्कम वसुली या शिर्षाखाली रु. १२ कोटी वसुल करणे प्रस्तावित आहे. प्रशासनाने मा. स्थायी समितीस रु. ७ कोटी तरतुद ठेवण्याचे प्रस्तावित केले होते. सद्य स्थितीत माहे फेब्रुवारी २००६ अखेर रु. ६.६ काटी इतकी रक्कम वसुल झालेली आहे.

याबाबत खालील प्रमाणे मंजुरी मिळाल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ अपेक्षित आहे.

१) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम - १२४ 'अ' ते 'ल' च्या तरतुदप्रमाणे विकास शुल्क आकारणीची तरतूद शासनाने दि. १०/०८/१९९२ पासून अंमलात आणलेली आहे. त्यामध्ये विकास शुल्काचे दर मुंबई महानगरपालिका वगळता उर्वरीत महानगरपालिकेसाठी खालील प्रमाणे आकारावयाचे आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | नियमाप्रमाणे दर रुपये प्रती चौ. मी. | | महानगरपालिकेने लागू केलेले दर रुपये प्रती चौ. मी. |
|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | |
| १ | जमीन विकास शुल्क | २० | ६० | ३० |
| २ | रहिवासी बांधकाम | ४० | ६० | ६० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | ६० | ९० | ९० |
| ४ | वाणिज्य बांधकाम | ८० | १२० | १२० |

मा. आयुक्त सो. यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे हद्द मुंबई शहरालगत असल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये मुंबई महानगरपालिकासाठीचे विकास आकाराबाबतचे दर मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी प्रस्तावित करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

त्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ 'अ' ते 'ल' च्या तरतुदीप्रमाणे विकास शुल्क आकारणीची तरतुद शासनाने दि. १०/०८/९२ पासून अंमलात आलेली आहे. त्यामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या अभिकारितेतील क्षेत्रासाठीचे विकास शुल्काचे दर खालील प्रमाणे आकारायचे आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | नियमाप्रमाणे दर रुपये प्रती चौ. मी. | | महानगरपालिकेने लागू केलेले दर रुपये प्रती चौ. मी. |
|---|---|---|---|---|
| | | किमान | कमाल | |
| १ | जमीन विकास शुल्क | ४० | १०० | ३० |
| २ | रहिवासी बांधकाम | १०० | २५० | ६० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | १५० | ३७५ | ९० |
| ४ | वाणिज्य बांधकाम | २०० | ५०० | १२० |

वरिल प्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या अभिकारितेतील क्षेत्रासाठीच्या विकास आकाराच्या दराचा व मिरा भाईंदर महानगरपालिकेने लागू केलेल्या विकास आकाराच्या दराचा विचार करता खालील प्रमाणे विकास आकाराचे दर निश्चित करणे आवश्यक वाटते.

| अ.क्र. | प्रस्तावाचा तपशिल | मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी प्रस्तावित दर रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|
| १ | जमीन विकास शुल्क | १०० |
| २ | रहिवासी बांधकाम | १५० |
| ३ | औद्योगिक बांधकाम | २२५ |
| ४ | वाणिज्य बांधकाम | ३०० |

२) मिरा भाईंदर शहरासाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीनुसार इमारतीचे बांधकाम पुर्ण केल्यानंतर भोगवटा दाखला घेणे आवश्यक असून भोगवटा दाखल्याशिवाय इमारती रहिवास व्याप्त करता येत नसतानाही बरेच विकासक / वास्तुविशारद भोगवटा दाखला घेत नाहीत तसेच भोगवटा दाखल्यापुर्वी इमारत रहिवास व्याप्त करतात. भोगवटा दाखल्यापुर्वी इमारत रहिवास व्याप्त केल्यास त्यासाठी दंडात्मक कारवाई करणेबाबत धोरण निश्चित करणे उचित वाटते. आर्थिक दंड म्हणून विकास आकाराप्रमाणे प्रती चौरस मीटर रु. ६०/- रहिवास वापरासाठी, रु. १२०/- प्रती चौरस मीटर वाणिज्य वापरासाठी व रु. ९०/- प्रती चौरस मीटर औद्योगिक वापरसाठी अशाप्रमाणे दंडाची आकारणी निश्चित करणे आवश्यक आहे.

३) तसेच सन २००६-०७ च्या आर्थिक वर्षासाठी विकास आकाराच्या रक्कमेत वाढ अपेक्षित आहे. त्यासाठी यापुर्वीच्या तात्कालीन नगरपरिषदेच्या सर्व साधारण सभेतील ठराव क्र. ७५, दि. ०५/०८/९२ प्रमाणे बंदिस्त बाल्कनीसाठी शुल्क दंडणिय शुल्क म्हणून रु. ५००/- प्रती बाल्कनी निश्चित केलेली आहे. यामध्ये सुधारणा करुन जमिनीच्या बाजारी दराप्रमाणे प्रिमियम रक्कम (प्रती चौ.मी.) आकारुन बंदिस्त बाल्कनी साठी शुल्क आकारणे योग्य होईल.

वरील प्रमाणेचे बदल करण्यास व विकास आकाराबाबत मा. शासनाकडे मंजुरीसाठी शिफारस करण्यासाठी ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १०१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००५-०६ चे सुधारित व २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६ रोजीचे प्रकरण क्र. २१४)

**ठराव क्र. ९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे प्रथम सन २००५/२००६ सुधारित व सन २००६/२००७ चे मूळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरण पत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. २१८ दि. ०१/०३/२००६ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह २००५/२००६ चे सुधारित व सन २००६/०७ चे मूळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदापत्रकाचा तपशिल पुढील प्रमाणे.

**२००६/२००७**

| **उत्पन** | | | | **खर्च** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ''ब'' अंदाजपत्रक | ९७९.४४ | - | | ''ब'' अंदाजपत्रक | ११७८.४० |
| | ''अ'' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | २००.०० | | | अखेरची शिल्लक | १.०४ |
| | **एकुण** | **११७९.४४** | | | **एकुण** | **११७९.४४** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १०२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००५-०६ चे सुधारित व २००६-०७ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६ रोजीचे प्रकरण क्र. २१५)

**ठराव क्र. ९६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००५/२००६ सुधारित व सन २००६/२००७ चे मूळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरण पत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. २१९ दि. ०१/०३/२००६ विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह २००५/२००६ चे सुधारित व सन २००६/०७ चे मूळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदापत्रकाचा तपशिल पुढील प्रमाणे.

२००६/२००७

| उत्पन | | | - | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वृक्षप्राधिकरण | १६३.३० | | | वृक्षप्राधिकरण | १९५.०० |
| | ''अ'' अंदाजपत्रकातून हस्तांतरण | ३१.७० | | | | -- |
| | **एकुण** | **१९५.००** | | | **एकुण** | **१९५.००** |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १०३ :-**

मार्गस्थ दाखला फी आकारणी बाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६ रोजीचे प्रकरण)

**ठराव क्र. ९७ :-**

मुंबई प्रां्तिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १४७ नुसार त्वरीत निर्यात करावयाचा जकातपात्र माल महानगरपालिका क्षेत्रातून प्रवेश नाक्यावरुन निर्गमन नाक्यावर जाताना लेखी परवानगी नि परागमन पास प्रदान करुन संबंधिकाकडून मार्गस्थ दाखला फी (एस्कॉर्ट) आकारणी बाबतची तरतुद समाविष्ट आहे. तद्नुरुप मिरा भाईंदर महानगरपालिकेने प्रारुप जकात नियमावलीत नियम क्र. १७(२) अन्वये मार्गस्थ दाखला फी आकारणी करणेची तरतुद प्रस्थावित केलेली आहे. उक्त जकातीचे प्रारुप नियम मा. महासभेच्या मंजुरीकरीता सादर केलेले आहेत.

प्रारुप जकात नियामवलीबाबत मा. महासभेच्या मंजुरीस अधीन राहून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून जकात पात्र माल घेऊन त्वरीत निर्गत होणाऱ्या वाहनांवर खालील प्रमाणे मार्गस्थ दाखला फी (एस्कॉर्ट) आकारणी करणे बाबत ही सभा मंजुरी देत आहे.

| वाहनाचा प्रकार | तीन चाकी टेंपो | चार चाकी टेंपो | लॉरी | कंटेनर |
|---|---|---|---|---|
| आकारण्यांत येणारे दर | रु. १० /- प्रति वाहन | रु. २५/- प्रति वाहन | रु. ८०/- प्रति वाहन | रु. १००/- प्रति वाहन |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १०४ :-**

विशेष हस्तांतरण फी मध्ये वाढ करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६ रोजीचे प्रकरण)

**ठराव क्र. ९८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासकिय ठराव क्रमांक २९, दि. ०३/०५/२००२ प्रमाणे मालमत्ता हस्तांतरण करण करिता निवासी रु. ५००/-, बिगर निवासी रु. १,०००/- विशेष हस्तांतरण फी आकारण्यांस मंजुरी देण्यांत आलेली होती. दि. ०१/०४/२००६ पासून निवासी रु. १,०००/-, बिगर निवासी रु. १,५००/- अशी विशेष हस्तांतरण फी मध्ये वाढ देण्यांस मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६, ठराव क्रमांक २२१ ने शिफारस केलेली आहे.

मा. स्थायी समितीच्या शिफारशीप्रमाणे यापुढे दि. ०१/०४/२००६ पासून निवासी रु. १,०००/- बिगर निवासी रु. १,५००/- अशी विशेष हस्तांतरण फी मध्ये वाढ देण्यांस सभा मंजुरी देत आहे. तसेच वारसा हक्काने नावांत बदल होणाऱ्या मालमत्तांना हस्तांतरण फी आकारु नये.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १०५ :-**

कॅपिटेशन फी मध्ये वाढ करणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२००६ रोजीचे प्रकरण)

**ठराव क्र. ९९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. ७४, दि. १८/०२/२००५ प्रमाणे सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे कॅपीटेशन फी आकारण्यांस मंजूरी देण्यात आलेली होती. यापुढे दि. ०१/०४/२००६ पासून सोबत जोडलेल्या कॅपीटेशन फी मध्ये वाढ देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, आपले सगळे ठराव मंजूर झालेले आहेत हे मला माहिती आहे. आपल्याला फार घाई आहे कारण त्यांच्या प्रश्नांचे उत्तर देताना आपण आम्हाला वेळ दिलेला आहे. स्थायी समितीच्या बैठकीमध्ये बऱ्याचशा चर्चेमध्ये आम्ही भाग घेतलेला आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्यांचा विषय काय आहे ते आम्हाला कळू दे. कारण सभा कामकाज संपलेला आहे आणि हे कोणत्या नियमाखाली विषय घेत आहेत ते सांगा. ही विशेष प्रिव्हिलेज आहे, विशेष सुचना आहे, काय आहे? ते तर समजू द्या.

**रतन पाटील :-**

सुचना आहे.

**लिओ कोलासो :-**

आपण सुचनेची नोटीस दिलेली आहे का?

**रतन पाटील :-**

दिलेली आहे. मा. महापोर साहेबांना तसे पत्र दिलेले आहे. जे ठराव आहात त्या ठरावाच्या संदर्भात जी चर्चा झालेली आहे. त्यात महापालिकेच्या उत्पन्नाच्या संदर्भात ज्या बाबी आहेत त्याचे मा. महापौरांना पत्र दिलेले आहे. ठरावानुसार ज्या उत्पन्नाच्या बाबी आहेत त्या बाबींच्या अनुषंगाने मी बोलत आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, आपण ज्या आता सुचना देणार आहात त्या सुचना शहराच्या विकासाच्या दृष्टीने विकास व्हायचा असेल तर.......

**रतन पाटील :-**

शहराच्या विकासाच्यादृष्टीने मी बोलत आहे. अविकासाच्यादृष्टीने मी कधीही बोललो नाही. आपण स्थायी समितीमध्ये जी सभा घेतली त्याचे आपण सभापती असतानासुध्दा तिथे जे बोललो ते विकासाच्या दृष्टीनेच बोललो आणि आपण सभापती असताना जी चार-पाच दिवस सभा चालली त्या संदर्भात फक्त बोललो असेल तर मी. आपल्या स्थायी समितीच्या सदस्यांनी सांगावे की, उत्पन्न वाढीच्या संदर्भात कोण बोलले आहे. आमचा बोलायचा अधिकार आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपल्याला धन्यवाद. आपल्या ज्या सुचना मांडायच्या आहेत त्या आपण मांडा.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण स्थायी समितीमध्ये चार दिवस बोललात आणि अजून काय बोलायचे बाकी आहे.

**रतन पाटील :-**

तिथे तो विषय आला नाही.

**केशव घरत :-**

कुठला विषय आहे?

**रतन पाटील :-**

सन २००५-०६......

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य हे स्थायी समितीच्या चर्चेमध्ये होते. त्यांनी उत्पन्न, खर्च सगळ्यांचा आढावा घेतलेला आहे. त्यांना ज्या सुचना मांडायच्या आहेत त्या लेखी स्वरुपात त्यांनी द्याव्यात. आणि कृपया मॅडम आपण त्या सुचना स्विकाराव्यात. सन्मा. सदस्य उत्पन्न वाढीबाबत ज्या आपल्या सुचना आहेत त्या सुचना आपण लेखी द्याव्यात.

**रतन पाटील :-**

मॅडम, आपण मला बोलायला द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रतनजी पाटील ह्या सभागृहामध्ये आता आपण उत्पन्नाच्याबाबीवर बोलणे संयुक्तीक होणार नाही.

**रतन पाटील :-**

आपली अशी दादागीरी चालणार नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, ह्याच्यावर कायदेशीर आक्षेप आहे.  जर एकदा ठराव पास झाला व आपण विधीवतरित्या मंजूर केला.  आता आपण सन्मा. सदस्यांची सुचना सभा संपल्यानंतर घ्या.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपले म्हणणे काय आहे? आम्हाला बोलू देता की,......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला दिलेल्या वेळेमध्ये आतापर्यंत बोलून झाले असते.

**रतन पाटील :-**

होय. म्हणूनच बोलतोय ना. तर सदस्य मधे कशाला आक्षेप घेतात? आम्ही बोलतोय ना.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, शिक्षण क्षेत्रातील श्यामराव मोरेश्वर पाटील ह्यांना देवाज्ञा झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या दुःखाचा ठराव आम्ही ह्या येथे मांडत आहे. तरी सर्वांनी दोन मिनिटे शांत उभे रहावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

हे काय चालू आहे?

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, जर आम्हाला बोलायला दिले नाही तर आम्ही विरोध दर्शविणार.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, शोकप्रस्ताव दिलेला आहे. कृपया सभागृहाला दोन मिनिटे स्तब्ध राहण्याची विनंती करा.

**रतन पाटील :-**

आम्हाला आमच्या सुचना द्यायच्या आहेत. अन्यथा आम्ही विरोध दर्शवू का?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आपण आपल्या सुचना लेखी द्या. आता शोकप्रस्ताव सभागृहासमोर ठेवला आहे. कृपया आपण शांत रहा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, शोकप्रस्तावामध्ये मी आज रोजी मच्छीमार कृती समितीचे आणि अखिल महाराष्ट्राच्या मच्छीमारांचे झुंझार नेते भाई बंदरकर (माजी आमदार) ह्यांचे दुःखद निधन झाले. त्याचप्रमाणे आपल्या महापालिका सेवेतील सन्मा. सहाय्यक संचालक, नगररचनाकार श्री. दिलिप घेवारे ह्यांचे बंधूसुध्दा दोन आठवड्यापूर्वी निरवसले. तर त्यांना हे सभागृह श्रध्दांजली वाहत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

आमचे मिरा रोडमधले कॉंग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ता श्री. ऑस्टीन ह्यांचे वडील शुक्रवारी मरण पावले ह्यांच्या दुःखाचा ठराव मी मांडत आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. ०८ चे कॉंग्रेसचे अध्यक्ष भिकाजी तुकाराम लाड ह्यांचेदेखील हृदयविकाराच्या आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचा देखील मी याठिकाणी शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच स्वर्गीय मोहन नारायण भोईर ह्यांचे गुरुवार दि. ०८/३/२००६ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झालेले आहे. आपल्या सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे ह्यांचे ते भावोजी होते. तसेच, यशवंत जनार्दन पाटील (काका) राई ह्यांचेदेखील हृदयविकाराने दि. २२/०२/२००६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचादेखील शोकप्रस्ताव मी या ठिकाणी मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

स्थायी समितीचे माजी सभापती मॉरस रॉड्रीक्स ह्यांच्या सासु ज्युली ॲन्थोनी गोम्स ह्यांचे दुःखद निधन झाले. त्याबद्दल ही सभा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**दुःखवटा ठराव क्र. १०० :-**

शिक्षण क्षेत्रातील श्यामराव मोरेश्वर पाटील ह्यांना देवाज्ञा झालेली आहे. मच्छीमार कृती समितीचे आणि अखिल महाराष्ट्राच्या मच्छीमारांचे झुंझार नेते भाई बंदरकर (माजी आमदार) ह्यांचे दुःखद निधन झाले. त्याचप्रमाणे आपल्या महापालिका सेवेतील सन्मा. सहाय्यक संचालक, नगररचनाकार श्री. दिलिप घेवारे ह्यांचे बंधूसुध्दा दोन आठवड्यापूर्वी स्वर्गवासी झाले. मिरा रोडमधले काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ता श्री. ऑस्टीन ह्यांचे वडील शुक्रवारी मरण पावले. प्रभाग क्र. ०८ चे काँग्रेसचे अध्यक्ष भिकाजी तुकाराम लाड ह्यांचेदेखील हृदयविकाराच्या आजाराने दुःखद निधन झाले. तसेच मोहन नारायण भोईर ह्यांचे गुरुवार दि. ०८/३/२००६ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झालेले आहे. तसेच, यशवंत जनार्दन पाटील (काका) राई ह्यांचेदेखील हृदयविकाराने दि. २२/०२/२००६ रोजी दुःखद निधन झाले. त्याचप्रमाणे स्थायी समितीचे माजी सभापती मॉरस रॉड्रीक्स ह्यांच्या सासु ज्युली ॲन्थोनी गोम्स ह्यांचे दुःखद निधन झाले. त्याबद्दल ही सभा शोकप्रस्ताव मांडत आहे. त्या सर्वांच्या कुटूबीयांच्या दुःखात ही सभा सहभागी असून त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहात दोन मिनिटे शांतता राखण्यात आली.)

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग तसेच पत्रकार बंधू आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली असून आपणा सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ३.१० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**